# संवाद

अन्नपूर्णा परिवाराचे त्रैमासिक

मार्च २०२२














## महिला दिन विशेषांक



अन्नपूर्णा परिवार
नर्मदा बचाओ
ब्रँच - ०८
गटप्रमुख- जयश्री जाधव
सेंटर नंबर -१५८९४
गटप्रमुख- सुगराबी पाठवा
सेंटर नंबर -१३६८१
ब्रँच -२
गटप्रमुख - पुष्पा नादार
सेंटर नंबर -३१०५७
गटप्रमुख - संगिता जाधव
सेंटर नंबर -८१२४
67161
Yogita shankar sutar
sunanda DHAPATE
rupali kasabe
Sushma Naik
maya niwangune
shobha choudhar
Manisha Gadre
Manisha Liman
Vaishali mane
Rupali Tanaji Wadkar
Kamal kavaldar

# अनुक्रमणिका


* संपादकीय — *सुरेश धोपेश्वरकर*

* पहिले किताब, फिर बाकी सब...
स्त्रीशिक्षण आणि आधुनिक संकल्पनांचा गुंता — *संध्या नरे-पवार*

* आंतरजातीय / धर्मीय विवाह : सुदृढ विकासाचा पाया — *विनया मालती हरि*

* भारतातल्या स्त्रिया आणि राजकारण — *डॉ. स्मिता शहापूरकर*

* स्त्री–शिक्षणामुळे विस्तारणारी क्षितिज — *प्रा. मीरा कुलकर्णी*

* महिलांची मायांगाची दुखणी — *डॉ. कामाक्षी भाटे*

* ‘नर्स’ परिचारिका — *प्रमिला भगत कांबळे*

* स्त्रियांवरील अत्याचार व त्यावरील उपाय — *सौ. स्मिता वाजेकर*

* एक आई म्हणून
मला कसा समाज हवा आहे? — *वासंती प्रसाद ताठे*

* सौदा तनामनाशी — *लीला शहा*

* एन. डी. पाटील एक बुलंद
आवाज और सामाजिक परिवर्तन — *वृषाली मगदूम*

* अन्नपूर्णा परिवार — *अंजली पाटील*



**संपादकीय मंडळ**

- **डॉ. मेधा पुरव-सामंत**
- **कॉ. सुरेश धोपेश्वरकर**
- **वृषाली मगदूम**
- **अंजली पाटील**
- **बाळासाहेब पिसाळ**



**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९ ई प्लॉट नं १८, कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७


**संपादकीय**

## अस्वस्थ जगाचे वर्तमान

*— सुरेश धोपेश्वरकर*

यंदाच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनी सर्व जगातील महिला अस्वस्थ आहेत.

युक्रेनच्या प्रश्नांवरून युरोपात युद्धाचे ढग जमा होत आहेत. अमेरिकेच्या माहितीनुसार रशियाने दीड लाख सैन्य युक्रेनच्या सीमेवर तैनात केले आहे. पूर्व युरोपीय देशातील ज्या देशांच्या सीमा युक्रेनच्या जवळआहेत.त्या देशामध्ये अमेरिका आणि नॉर्थ ॲटलाटिक ट्रीटी ऑगनायझेशन (नाटो) अंतर्गत २७ राष्ट्राच्या फौजा रशियाच्या कथित आणि संभाव्य आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी युक्रेनच्या सीमा नजीक तैनात करण्यात आल्या आहेत. अमेरिका, युरोपियन युनियन, (ई. यु.) मधील २७ राष्ट्रे आणि रशिया हे सर्व देश अण्वस्त्र सज्ज देश आहेत. सध्याचे आपले जग अनेक वेळा बेचिराख करण्याचे सामर्थ्य या अण्वस्त्रामध्ये आहे; म्हणून जग आणि जगातील महिला आणि नागरिक चिंतेत आहेत, अस्वस्थ आहेत.

युद्धाच्या संभाव्य बातम्यामुळे, सैन्याच्या हालचालीमुळें, जगभर शेअर मार्केट कोसळत आहेत. खनिज तेलाच्या भावानी उसळी मारली आहे. मर्यादित स्थलांतरास सुरुवात झाली आहे. भारताचे २० हजार नागरिक युक्रेन मध्ये शिक्षण आणी रोजगाराच्या निमित्त सध्या रहात आहेत. जर्मन, फ्रान्स, या युरोपियन युनियनच्या राष्ट्राच्या अध्यक्षांनी रशियाच्या अध्यक्षाशी चर्चा केली पण अद्याप चर्चा किंवा वाटाघाटी यशस्वी झालेल्या नाहीत. अमेरिका आणि रशिया याच्या अध्यक्षामध्ये थेट वार्तालाप होईल आणि युद्ध टळेल असा एक आशावादी सूर युद्धाचे काळेकुट्ट ढग जमा झाल्यावर सुद्धा आळविले जात आहेत.

ऑलॅम्पिक सामान्याच्या उद्घाटनाचे निमित्त साधून रशियाने चीन बरोबरचे संबंध दृढ केले आहेत. एकमेकांना सहकार्य करण्याचे वचन देऊन आश्वासित केले आहे. १९९१ मध्ये सोव्हिएत रशियाचा विघटना नंतर १६ नवे

देश निर्माण झाले त्या पैकी युक्रेन हा एक देश आहे.

अमेरिकेच्या नेतृत्त्वाखाली नाटो करार दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धाच्या काळात तयार करण्यात आला आणि त्याला तोंड देण्यासाठी वॉर्सा करार रशियाच्या नेतृत्त्वाखाली पूर्व युरोपातील राष्ट्रानी एकत्र येऊन केला.

१९९१ साली सोव्हिएत युनियनचे विघटन झाले. १६ नवे देश जागतिक भूगोलामध्ये निर्माण झाले. पूर्व युरोपातील राष्ट्र काही काळ स्वतंत्र राहिली आणि नंतर युरोपियन युनियनच्या प्रकल्पामध्ये सामील झाली. १९९५ ते २००५ साला पर्यंत ही सामिलीकरणाची प्रक्रिया सुरू राहिली. २०१० नंतर नाटो करारानुसार युरोपियन युनियनच्या फौजा या पूर्व युरोपमध्ये पसरू लागल्या.

जर्मनी आणि रशियामध्ये तेल आणि नैसर्गिक वायु पुरविण्याविषयी (नॉर्थ स्ट्रीम) उत्तर विभागात पाईप लाईन टाकण्याचा प्रकल्पास चालना मिळाली, ब्रिटन युरोपियन युनियन मधून (ई. यु.) हल्लीच बाहेर पडला आहे. रशियाकडून खनिज तेल आणि नैसर्गिक वायु खरेदी करण्याऐवजी अमेरिकेकडून घ्यावा असे अमेरिकेचे जर्मनी आणि अन्य युरोपियन देशावर दडपण आहे. त्यामुळे खनिज तेल, नैसर्गिक वायु या इधनांच्या किमतीवर या सर्व युद्ध सदृश्य परिस्थितीचा प्रभाव पडत आहे; पडणार आहे अगदि आपल्या भारतावर सुद्धा पडणार आहे.

करोनामुळे लादलेल्या विविध देशाच्या अर्थव्यवस्था युद्धजन्य परिस्थितीमुळे अधिकच तणावाखाली येणार आहेत.

करोना काळात अमेरिका आणि युरोपियन देशातील आपल्या देशांतील रिझर्व्ह बँकेप्रमाणे असलेल्या मध्यवर्ती बँकांनी अर्थ व्यवस्थेमध्ये जादा चलन सोडून (सैल मुद्रा धोरण) आपापल्या राष्ट्राच्या अर्थव्यवस्था तगवून ठेवल्या आहेत. परंतु आता अमेरिका आणि युरोपियन युनियन देशाच्या मध्यवर्ती बँकांनी चलनवाढ आणि परिणामी होणारी भाववाढ रोखण्यासाठी अर्थव्यवस्थेतील रोखता (LIQUIDITY) २०२२ पासुन टप्प्याटप्याने कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी व्याजदर वाढतील. आजच जगामध्ये सर्व देशाच्या अर्थव्यवस्थामध्ये कर्जाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण २५० ते ३०० टक्क्यापर्यंत पोहचले आहे. वैयक्तीक नागरिक, कंपन्या आणि देशांची सरकारे कर्जामध्ये आकंठ बुडालेली आहेत. ज्याप्रमाणे युक्रेनच्या सीमेवर खरी अणूअस्त्रे टिकटिक आवाज करत आहेत त्याचप्रमाणे सर्व जगाच्या देशामध्ये कर्जाचा बॉम्बसुद्धा टिकटिक करीत आहे.

त्यामुळे भू-राजकीय आणि भू-आर्थिक अशी दोन्ही संकटे एकाच वेळेस जगातील सर्व देशांना आणि जनतेला घेरत आहेत. **म्हणून जग अस्वस्थ आहे.**

आपला भारत देश हा जगाचा भाग आहे. करोना हा साथीचा रोग ज्याप्रमाणे सर्व खंडात आणि देशात पसरला त्याप्रमाणे युद्धजन्य परिस्थिती, त्या मधून निर्माण होणारी जीवघेणी शस्त्रास्त्र स्पर्धा सर्व देशांत पसरेल. विकासाकरिता आधीच तुटपुंजी असलेली वित्तीय साधन सामुग्री (पैसा-भांडवल पुंजी) शस्त्रात्र निमिर्तीसाठी वळविली जाईल. म्हणून जगभरच्या कष्टकरी महिला आणि पुरुष युद्धाच्या विरोधी असतात. शांतताप्रिय असतात. आर्थिक विकासासाठी आणि विकासामधून निर्माण झालेल्या संपत्तीचे समन्यायी वाटप होण्यासाठी जगामध्ये शांतता असणे ही पूर्व अट असते.

जगामध्ये ज्या प्रमाणे तेलासाठी, नफ्याच्या वाढीव दरासाठी, आर्थिक विषमता वाढविणाऱ्या आर्थिक धोरणाच्या रक्षणासाठी लष्करी गटबंधना मार्फत राष्ट्र राष्ट्रामध्ये ध्रुवीकरणाच्या प्रक्रीयेला चालना दिली जात आहे, त्याप्रमाणे आपल्या देशात धर्म जाती भाषा या वरून ध्रुवीकरणाच्या प्रक्रीयेस चालना राज्यकर्त्या वर्गाकडून सत्ताधारी पक्षाकडून दिली जात आहे.

पाच राज्याच्या निवडणूकीमध्ये विषम विकास कां? बेरोजगारी कां? शेतकऱ्यांना हमी भाव देणार किंवा नाही? आर्थिक विषमता कां वाढत आहे? बड्या कार्पोरेट उद्योग धंद्यांना कर्ज माफी, सर्व सवलती देता, मग ग्रामीण आणि शहरी गरीबाच्यासाठी असलेल्या सवलती कमी आणि बंद का करता? शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पर्यावरण रक्षण स्वस्त दरात घरे यासाठी पुढील पाच वर्षात काय करणार यावर बोला असा जन आक्रोश निर्माण होऊ नये म्हणून धर्म-जाती, प्रांत, भाषा याचा सर्वसामान्य जनतेत फूट पाडण्याकरिता मताच्या ध्रुवीकरणातुन सत्ता मिळविण्याचा कार्यक्रम राबविण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे मंत्री सध्या मशगूल आहेत.

सार्वजनिक क्षेत्र विकून देशाचा जमा खर्चाची तोंड मिळवणी. आत्मघातकी धोरण केन्द्र सरकार राबवत आहे. २२,८४२

कोटी रुपयाचा घोटाळा अे. बी. जी. शिप बिल्डीग सुरत गुजरात या जहाज बांधणी कंपनीनी केला आहे.

भांडवली बाजाराचे (नॅशनल स्टॉक Exchange NSE) चा कारभार हिमालयातील योगी त्याच्या ऋग्वेद, यर्जुवेद, सामवेद या आद्याक्षराच्या इमेल Site वरून नियंत्रित करीत आहे. साधू बैरागी धर्म संसद भरवून अल्पसंख्य समाजाला दरडावत आहेत.

कर्नाटकामध्ये शाळा महाविद्यालयामध्ये गणवेशाच्या पाठी मागे दडून धार्मिक ध्रुवीकरण आणि हिंसाचार घडवून आणला जात आहे.

महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरू याचे व्हाटसअॅप विद्यापीठातील जत्पक (ट्रोल्स) चारित्र्य हनन करीत आहेत.

महात्मा गांधीचा खून करणाऱ्या नथुराम संप्रदायाचे लोक त्याच्या स्मारकासाठी घोषणा करीत आहेत. परंतु पंतप्रधान नरेन्द्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि अन्य मंत्री या मुद्द्यांवर गप्पगार आहेत. नथुरामी प्रवृत्तीला अयोध्येच्या मर्यादा पुरषोत्तम, धर्नुधारी रामाने रक्षण करावे म्हणून साकडे घालत आहेत.

जगातील आणि आपल्या देशांतील अस्वस्थ करणाऱ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर यंदाचा आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा ''संवाद''चा अंक आम्ही आपणांस सादर करीत आहोत.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनी अन्नपूर्णा परिवाराच्या सर्वसभासदानी, वस्ती प्रतिनिधीनी, कर्मचाऱ्यांनी पुढील संदेश घराघरात आणि समाजात न्यावा अशी अन्नपूर्णा परिवार आणि 'संवाद'चे संपादक मंडळ यांच्यातर्फे विनंती करीत आहोत.

**युध्द नको - बुध्द हवा**

**युध्द नको - नोकरी हवी भाकरी हवी.**

**हिंदू मुस्लीम शिख इसाई - हम सब है भारतवासी**

**धर्म जात के नामपर - आपसमे नही बटेगे। नही लढगे।**

या अंकात संध्या नरे पवार, याचा पंहिले किताब, फिर बाकी सब, आंतर जातीय / धार्मिक विवाह सदृढ विकासाचा पाया, हा विनया मालती हरी यांचा स्त्री-शिक्षणामुळे विस्तारणारी क्षितीजे हा प्रा. मीरा कुळकर्णी यांचा, महिलांची मायांगाची दुखणी हा डॉ. कामाक्षी भाटे यांचा. नर्स-परिचारिका हा प्रमिला भगत कांबळे याचा स्त्रियावरील अत्याचार आणि त्यावरील उपाय, हा स्मिता वाजेकर याचा, एक आई म्हणून मला कसा समाज हवा, हा वासंती ताठे यांचा असे विविध विषयांवरील लेख, भारतातल्या स्त्रिया आणि राजकारण हा डॉ. स्मिता शहापूरकर यांच्या कॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्याचा परिचय करून देणाऱ्या आणि आदरांजली वहाणारा वृषाली मगदूम यांचा, सौदा तनमनाशी ही लीला शाह यांची कथा, रोहिदास कवळे आणि मेधा सामंत यांच्या कविता, आणि अंजली ताई पाटील यांचे अन्नपूर्णा परिवाराचे वार्तापत्र या अंकात छापले आहे.

स्त्रीयांचे शिक्षण, आरोग्य, आंकाक्षा, अपेक्षा असे विविध पैलू असलेले साहित्य पाठविल्याबदल सर्व लेखकाचे मन:पूर्वक आभार. मुखपृष्ठ ऋच्या ताई नी अंकातील लेखाच्या विषयाच्या आधारे तयार केल्याबद्दल त्याचेही आभार.

वाचकांना नम्र विनंती प्रतिक्रीया द्या, बोलके व्हा, लिहते व्हा.

❖❖❖

## भावपूर्ण श्रद्धांजली



भारतरत्न माननीय **लता मंगेशकर** यांचे वृद्धापकाळाने अल्पशा आजाराने नुकतेच दु:खद निधन झाले.

गेली ७० वर्षे भारतीय जागतिक रसिकांवर आपल्या सुमधूर आवाजाने लताताईंनी राज्य केले.

अन्नपूर्णा परिवार व 'संवाद'च्या संपादक मंडळाच्यातर्फे लता मंगेशकर यांना आम्ही आदरांजली वहात आहोत.

# पहिले किताब, फिर बाकी सब... स्त्रीशिक्षण आणि आधुनिक संकल्पनांचा गुंता

■ **संध्या नरे-पवार**
**(वरिष्ठ पत्रकार, लेखिका असून सामाजिक विषयांच्या अभ्यासक आहेत.)**

आधुनिकतेबरोबर स्त्रीशिक्षणाची वाट अधिकाधिक सबल होत जाईल, अशी एक अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात या वाटेवर धर्मवादाचा अडसर आजही कायम आहे. या धर्मवादासमोर निधर्मीवाद (सेक्युलॅरिझम), बहुसांस्कृतिकतावाद (मल्टिकल्चरलिझम) या आधुनिक संकल्पना एकच एक उत्तर द्यायला अयशस्वी ठरत आहेत. किंबहुना धर्मवाद निधर्मीवादाला आपल्या सोयीने वापरत कधी त्याला बहुसांस्कृतिकतेच्या विरोधात उभं करतो तर कधी बहुसांस्कृतिकतेच्या नावाने धर्मवादाची रुजवात करत निधर्मीवादाला नाकारतो. निधर्मीवाद, बहुसांस्कृतिकता या आधुनिक संकल्पनांचे अर्थ नीट समजून घेतले नाहीत तर त्यातील गुंते अंतिमत: धर्मवादाच्या फायद्याचे ठरतात, हेच कर्नाटकमधील शिक्षणसंस्थांमध्ये सध्या सुरू असलेल्या हिजाब वादावरून दिसून येते.

**''जय श्रीराम''...** अशा घोषणा देणाऱ्या मुलांचा घोळका. बुरखा घातलेल्या एका मुलीच्या मागे लागलेला. मुलगीही ठामपणे महाविद्यालयाच्या दिशेने चालतेय. त्या घोळक्याला न घाबरता. मध्येच थांबून तीही घोषणा देते, **''अल्ला हू अकबर''...**

हे दृश्य असलेला व्हिडीओ समाजमाध्यमांवर वेगाने फिरतोय आणि त्याच्या सोबतीने उलटसुलट प्रतिक्रियाही. गेले काही दिवस कर्नाटकमधील उडपी भागातील शिक्षणसंस्थांमध्ये हिजाब घातलेल्या मुस्लीम मुलींना शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश नाकारला जात आहे. या वादाची ही पुढची पायरी आहे. या व्हिडीओत न दिसणाऱ्या अदृश्य चेहऱ्यांना जे हवंय तेच नेमकं घडताना इथे दिसत आहे.

**जय श्रीराम विरोधात अल्ला हू अकबर...**

व्हिडीओत न दिसणारे चेहरे दोन्ही बाजूंच्या धार्मिक मूलतत्त्ववाद्यांचे आहेत. त्यांना हिजाब वादावरून धार्मिक ध्रुवीकरण घडवून आणायचे आहे. जय श्रीराम विरोधात अल्ला हू अकबर. हेच त्यांचे उद्दिष्ट आहे. ते साकार होताना या व्हिडीओत दिसत आहे.

खरे उद्दिष्ट **'जय संविधान'** असे हवे. त्याआधीची पायरी **'स्त्रीशिक्षणाची जय हो'...** अशी हवी. हिजाब वाद सुरू झाल्यापासून स्त्रीशिक्षणाच्या वाटेवरचे काटे आणि काचा आजही कायम असल्याची तीव्र जाणीव झाली आणि तेवढ्याच तीव्रतेने शिक्षणासाठी बळी गेलेल्या काशीबाईची, बाहुलीची आणि एका मुलीचा बळी गेल्यावरही न डगमगता दुसऱ्या मुलीलाही शाळेत घालणाऱ्या सत्यशोधक **विश्राम रामजी घोले** यांची आठवण आली. सत्यशोधक चळवळीतील विश्राम रामजी घोले यांनी आपली मुलगी काशीबाई, जिला घरात लाडाने बाहुली म्हणत तिला म. फुलेंनी सुरू केलेल्या शाळेत घातली. पण मुलगी शिकते, हे तत्कालीन समाजाला मान्य नव्हतं. म. फुलेंनी शाळा स्थापून स्त्रीशिक्षणाला सुरुवात केलेली असली, त्याला काही काळ लोटलेला असला तरी हिंदू समाजातील कट्टरतावाद्यांचा विरोध कायम होता. स्त्रीशिक्षण हे त्यांना धर्मविरोधी वाटत होते. काही शेजाऱ्यांनी, नातेवाईकांनी काचेचा चुरा घातलेला लाडू बाहुलीला खायला दिला. अंतर्गत रक्तस्त्राव होऊन बाहुलीचा

मृत्यू झाला. विश्राम घोले यांनी आपल्या मुलीच्या स्मरणार्थ सर्व जातीयांसाठी बुधवार पेठेत पाण्याचा हौद बांधला. बाहुलीचा हौद असे त्याला नाव दिले. काशी घोले ही मुलगी हा स्त्रीशिक्षणासाठी सनातन्यांनी दिलेला पहिला बळी आहे. पण सनातन्यांचे उद्दिष्ट विश्राम खोले यांनी पूर्ण होऊ दिले नाही. न डगमगता त्यांनी आपली दुसरी मुलगी गंगुबाई हिला शाळेत घातले. कारण प्रश्न फक्त गंगुबाईचा नव्हता. सनातन्यांना घाबरून गंगुबाईला शाळेत घातले नसते तर परिसरातल्या इतर मुलींची शिक्षणंही थांबली असती, मुलींच्या शिक्षणाची वाटच अडली असती. मुलींच्या शिक्षणाची वाट थांबू नये, म्हणून सत्यशोधक चळवळीतील म. फुले यांचे खंदे समर्थक विश्राम रामजी घोले यांनी पहिल्या मुलीचा बळी गेल्यावरही धोका पत्करून दुसऱ्या मुलीला शाळेत घातले.

काचेचा चुरा घातलेला लाडू हा धार्मिक कट्टरतावादाचा तत्कालीन चेहरा होता. आजच्यापेक्षा हा तत्कालीन चेहरा अधिक थेट, अधिक उघडा होता. त्याची भाषा, त्याचं संभाषित पूर्णत: सनातनी होतं. जसं मलाला युसुफजाईच्या विरोधातलं तालिबान्यांचं संभाषित पूर्णत: सनातनी, स्त्रीशिक्षणालाच नकार देणारं होतं. अर्थात पूर्णत: सनातनी संभाषिताविरोधातला लढाही सोपा नसतोच, पण त्यातली गुंतागुंत कमी असते. त्यामुळे त्याविरोधात थेट लोकपाठिंबा मिळवता येतो, लोकमत तयार करता येते. मात्र हिजाब प्रकरणातला धार्मिक कट्टरतावादाचा चेहरा गुंतागुंतीचा आहे. तो निधर्मीवादाच्या आधुनिक संकल्पनेला पुकारत पुरोगामी परिवर्तनवादाला कैचीत पकडू पाहतो. पुरोगामी विचारविश्वावर ढोंगीपणाचा, अल्पसंख्यांकांच्या लांगूलचालनाचा आरोप करू पाहतो.

धर्माचे, धार्मिक चिन्हांचे स्थान खासगी, कौटुंबिक अवकाशात आहे; शिक्षणसंस्थांमध्ये, सार्वजनिक संस्थांमध्ये कोणतीही धार्मिक चिन्हे नकोत, हे निधर्मीवादाच्या मूलभूत तत्त्वांना धरून आहे. मग तुम्ही हिजाब घालून शाळेत, महाविद्यालयात येणाऱ्या मुस्लीम धर्मीय मुलींना पाठिंबा देणार का विरोध करणार, हा पेच इथे हिजाबचे निधर्मीवादाचा मुखवटा धारण केलेले विरोधक निर्माण करतात. या पेचात पकडून एरवी निधर्मीवादाची भूमिका मांडणाऱ्या पुरोगामी मंडळींना इथे स्युडो सेक्युलर ठरवणं मग या मुखवटाधारकांना सोपं जातं.

शिक्षण घेणं हा इस्लामधर्मीय मुलींचा भारतीय घटनेने दिलेला मूलभूत अधिकार आहे आणि तो त्या हिजाब घालतात म्हणून त्यांना नाकारता येणार नाही, ही भूमिका आज सगळीच पुरोगामी विचारविश्वातील मंडळी घेत आहेत. ती योग्य आहे मात्र ती पुरेशी नाही. कारण इस्लाम धर्मातील कट्टरतावादी मंडळीही हीच भूमिका घेऊन उभी आहेत. कोणत्याही मुद्द्याबाबत कट्टरतावाद आणि पुरोगामी विचार यात सारखेपणा येत असेल तर आपल्या पायाखालचा गुंता नीट बघून पुढचं पाऊल टाकावे लागते.

निधर्मीवाद-सेक्युलॅरिझम ही धर्मसंस्था आणि राज्यसंस्था यांचे कार्यक्षेत्र ठरवणारी, खासगी जीवन आणि सार्वजनिक जीवन यातील भेद स्पष्ट करत धर्माच्या व्यवहाराला सार्वजनिक जीवनात मज्जाव करणारी लोकशाहीवर आधारित समाजव्यवस्थेतील आधुनिक संकल्पना आहे, जी कोणत्याच धर्माच्या मूलतत्त्ववाद्यांना मान्य नाही. कारण धर्माच्या आधारे सार्वजनिक समाजजीवन अंकित करणे त्यांना सोपं राहात नाही. मात्र निधर्मीवादाच्या शब्दश: अर्थाला आणि अंमलबजावणीला केवळ मूलतत्त्ववाद्यांकडून विरोध होतो असं नाही. तर समाजातील धर्मश्रद्ध, आस्तिक लोकांनाही निर्भेळ स्वरूपातील निधर्मीवाद झेपत नाही. म्हणजे त्यांना लोकशाही शासनसंस्था मान्य आहे, त्याचे सगळे फायदे हवे आहेत, राज्यसंस्थेवर धर्माचं आधिपत्य नको, हा निधर्मीवादाचा गाभा त्यांना मान्य आहे पण सार्वजनिक व्यवहारात धर्म नको, हे निधर्मीवादाचं व्यापक रूप तत्त्वत: मान्य असले तरी ते प्रत्यक्षात स्वीकारणे त्यांना कठीण जाते. भारतासारख्या विविध धर्म-धर्मपंथ, वैविध्यपूर्ण सांस्कृतिक-धार्मिक चालीरीती, प्रथा-परंपरा असलेल्या बहुसांस्कृतिक देशात आदर्श स्वरूपातील निधर्मीवाद स्वीकारणे ही बाब गुंतागुंतीची बनते. म्हणूनच सहिष्णुतेच्या पायावर भारत या नवराष्ट्राची उभारणी करु पाहाणाऱ्या स्वातंत्र्य चळवळीतील नेतृत्वाने सेक्युलॅरिझम या पाश्चात्त्य संकल्पनेचा अर्थ निधर्मीवाद असा न करता सर्वधर्मसमभाव असा केला. निधर्मीवाद हे अंतिम लक्ष्य असले तरी भारतासारख्या बहुसांस्कृतिक समाजजीवनात, धर्माआधारे फाळणी झालेल्या राष्ट्रात त्याची प्राथमिक वाटचाल ही सर्वधर्मसमभावाच्या मार्गावरून होणे आवश्यक होते. सर्वधर्मसमभाव, त्यात अनुस्यूत असलेली सहिष्णुता हा या भारतीय मातीतला सेक्युलॅरिझम आहे. आज पुन्हा एकदा धर्माच्या आधारे समाजजीवनाची फाळणी करण्याचे टोकदार प्रयत्न सुरू असताना या देशातला सेक्युलॅरिझम सर्वधर्मसमभावाच्या रूपात उभा राहणे आवश्यक आहे; आदर्श स्वरूपातला निधर्मीवाद आपल्याला व्यक्तिश: कितीही हवा असला तरीही.

आदर्श स्वरूपातल्या निधर्मीवादानुसार शिक्षणसंस्थेसारख्या सार्वजनिक ठिकाणी शालेय गणवेशाखेरीज कोणतीच धार्मिक-सांस्कृतिक चिन्हे घालणे मान्य नाही. पण सर्वधर्मसमभाव या सेक्युलॅरिझमच्या भारतीय अर्थाला ते मान्य आहे. आपल्या देशातल्या, विविध राज्यांमधल्या शिक्षणसंस्थांमध्ये वेगवेगळ्या धर्मपंथांचे विद्यार्थी-विद्यार्थिनी आपापल्या धार्मिक-सांस्कृतिक चिन्हांसहित शाळेत-महाविद्यालयात जात असतात. शीख विद्यार्थी डोक्यावर पगडी धारण करतात, अनेक विद्यार्थ्यांच्या मनगटावर त्या त्या भागातल्या देवस्थानांचे गंडेदोरे बांधलेले असतात, अनेक विद्यार्थिनींच्या कपाळावर टिकली लावलेली असते, हातावर मेहंदी काढलेली असते. नाकात नथनी घातलेली असते. आपल्या देशात बालविवाहांचं तसंच महाविद्यालयीन शिक्षण सुरू असतानाच विवाह होण्याचं प्रमाण मोठं आहे. अशा वेळी लग्न झालेल्या तरुणी गळ्यात मंगळसूत्र आणि हातात हिरव्या किंवा लाल बांगड्या घालून महाविद्यालयात जातात. गणवेशाच्या निर्भेळ, आदर्श स्वरूपात हे सगळं कुठेच बसत नाही. पण तरीही या देशातील घटना आणि सर्वधर्मसमभाव या सगळ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षणसंस्थेत प्रवेश घ्यायला परवानगी देतो. त्याचप्रमाणे हिजाब घातलेल्या इस्लामधर्मीय मुलींनाही शिक्षणसंस्थेत जाऊन शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. जर शिक्षणसंस्थेत हिजाबला प्रवेश नसेल तर तो सगळ्याच धर्मांच्या धार्मिक-सांस्कृतिक चिन्हांना नाकारायला हवा. सर्वधर्मसमभावाच्या ऐवजी निर्भेळ, आदर्श स्वरूपातला निधर्मीवाद शिक्षणसंस्थांमध्ये अंमलात आणायचा असेल तर त्याचे मनापासून स्वागतच आहे, पण ते सगळ्याच धार्मिक-सांस्कृतिक चिन्हांच्या बाबतीत व्हायला हवे. तसे न करता विशिष्ट धर्माच्या मुलींना जर लक्ष्य केले जात असेल तर ते सरळसरळ धार्मिक राजकारण आहे, धार्मिक मूलतत्त्ववाद आहे.

पोशाखात विशेषत: स्त्रियांच्या पोशाखात धार्मिक-सांस्कृतिक चिन्हे अधिक प्रकर्षाने पाळली जातात. हे जसे धर्माच्या आधारे घडते तसेच ते जातिव्यवस्थेवर आधारित समाजरचनेत जातींनुसारही ठरते. एकोणिसाव्या शतकापर्यंत काही मागासजातीय स्त्रियांना शरीराचा वरचा भाग झाकण्याची, अंगात ब्लाऊज घालायची परवानगी नव्हती. कोणत्या जातीच्या स्त्रीने साडी कशी नेसायची, कोणत्या धातूचे दागिने घालायचे किंवा घालायचे नाही, याचेही निकष जातिनिहाय ठरलेले होते आणि त्यानुसार अमुक स्त्री कोणत्या जातीची ते ओळखले जात होते. म्हणून मागासजातीय महिलांच्या परिषदेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना पारंपरिक पद्धतीने साडी न नेसता उच्चजातीय स्त्रियांप्रमाणे साडी नेसण्याचा सल्ला दिला, तसेच कथलाचे दागिने न घालण्याचा, गळ्यात अनेक माळा न घालण्याचा सल्ला दिला. म्हणजे धार्मिक राजकारणात ज्याप्रमाणे स्त्रीचा पेहराव संघर्षस्थानी येतो त्याचप्रमाणे हिंदू धर्मातील जातीआधारित सांस्कृतिक राजकारणातही स्त्रीचा पोशाख केंद्रस्थानी असतो.

पुरुषसत्ताक समाजरचनेत स्त्रीकडे त्या त्या धर्माचं, जातीचं प्रतीक म्हणून, मानचिन्ह म्हणून पाहिलं जातं. अनेक धार्मिक-सांस्कृतिक चिन्हं त्यांच्याच अंगावर असतात. त्यामुळेच धार्मिक संघर्षात कधी स्त्रियांचा देह तर कधी त्यांचा पोशाख केंद्रस्थानी येतो. सल्ली ॲपमध्ये मुस्लीम महिलांचा देह संघर्षस्थानी आणला गेला तर कर्नाटकातील उडपीमध्ये त्यांचा पोशाख संघर्षस्थानी आणला जात आहे. घटना वेगवेगळ्या असल्या तरी त्यामागची विचारधारा एकच आहे.

कट्टरतावादी विचारधारेला त्यांच्यासारखेच उत्तर दिल्याने कट्टरतावादाचा गुणाकार होतो आणि मूळ प्रश्न कायम राहतात. **'जय श्रीराम'ला 'अल्ला हू अकबर'** हे उत्तर दिल्याने दोन्ही बाजूंनी केवळ धार्मिक ध्रुवीकरण होते. इथे मूळ मुद्दा पुरुषप्रधान धर्मव्यवस्था, पितृसत्ताक समाजरचना स्त्रियांना साधन म्हणून कशा प्रकारे वापरते हा आहे. जी विचारधारा मुस्लीम मुलींच्या हिजाबला विरोध करत आहे, तीच विचारधारा हिंदू मुलींनी कपाळाला कुंकू लावले पाहिजे, जीन्स घालता कामा नये, अंगभर कपडे घातले नाहीत तर बलात्कार होतात, असे सूचनावजा आदेश पेरत असते. वेगवेगळ्या परंपरा, सण यातून आपली प्राचीन परंपरा म्हणून पुरुषप्रधान मूल्य मुलींच्या मनावर लहानपणापासून बिंबवली जातात. घर, मंदिरं, प्रार्थनास्थळं, पौराणिक कथा, धर्मग्रंथ, महाकाव्य, प्राचीन वाङ्मय यातून लहानपणापासून मुलींचं जे सामाजिकीकरण होतं, त्यांच्या डोक्यात जे विचार भरवले जातात, ते पुरुषप्रधान पारंपरिक मूल्यांचं दृढीकरण करणारंच असतं. वैवाहिक दर्जा दाखवणारं मंगळसूत्रं हे पारंपरिक पितृसत्तेचं वाहक आहे, स्त्रीला दुय्यमत्व देणारं आहे हे माहीत असूनही भल्या भल्या उच्चशिक्षित महिलांना आपल्या गळ्यातलं मंगळसूत्र काढता येत नाही. कधी परंपरेच्या नावाने तर कधी फॅशनच्या नावाने ते गळ्यात कायम

राहातं. कपाळावरचं कुंकू, गळ्यातलं मंगळसूत्रं या गोष्टी जशा पितृसत्ताक मूल्यांच्या वाहक आहेत त्याचप्रमाणे डोक्यावरचा घुंघट किंवा हिजाब हाही पितृसत्ताक मूल्यांचा, पुरुषप्रधानतेचा वाहक आहे. दोन्ही बाजूंच्या धर्माची नावं वेगवेगळी असली तरी विचारांचा गाभा तोच आहे, जो स्त्रीदेहाला त्या त्या धर्माची, जातीची मालमत्ता मानतो.

भारतीय मुस्लीम महिला आंदोलन या मुस्लीम महिलांच्या स्त्रीवादी संघटनेने जे निवेदन वर्तमानपत्रांमध्ये दिलं आहे त्यात त्यांनीही घुंगट, बिंदी याप्रमाणे हिजाब हेही पितृसत्ताक व्यवस्थेने लादलेलं चिन्ह आहे, असे म्हटले आहे. फातिमा मेरनिस्सी, अस्मा लम्राबेत या मुस्लीम धर्मातील स्त्रीवादी अभ्यासक महिलांनी इस्लामचा अभ्यास करून धर्मग्रंथातील पडद्याचा (Veil) उगम हा पितृसत्तेच्या मूळांमध्ये आहे, धर्मग्रंथांचा पुरुषसत्ताक व्यवस्थेने लावलेला तो अर्थ आहे, असे स्पष्ट केले आहे. अर्थात ज्या मुलींमध्ये ही स्त्रीवादी जाणीवजागृती नाही त्यांना हिजाब ही आपली परंपरा वाटते, ज्याप्रमाणे काही मुलींना कुंकू, मंगळसूत्र ही आपली परंपरा वाटते. कारण त्यांच्या घरांमधून त्यांना तशीच शिकवण दिली जाते. त्यामुळे ज्या घरांमधून हिजाब घातल्याशिवाय, डोक्यावरून घुंगट ओढल्याशिवाय, कपाळावर कुंकू लावल्याशिवाय शाळांमध्ये, महाविद्यालयांमध्ये पाठवत नसतील तर त्यांना त्या हिजाब आणि घुंगटासह, कुंकू आणि सिंदूरासह शाळांमध्ये स्वीकारलं पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत घटनेने दिलेला शिक्षण घेण्याचा मूलभूत हक्क मुलींना मिळालाच पाहिजे.

### भारतीय मुस्लीम महिला आंदोलन

हिजाब, बुरखा यांचं मूळ पितृसत्ताक समाजरचनेत आहे, तो धर्माचा भाग नाही, ही 'भारतीय मुस्लीम महिला आंदोलना'ची भूमिका अर्थातच मुस्लीम धर्मातील कट्टरतावाद्यांना मान्य होणारी नाही. ते आपल्या धार्मिक राजकारणासाठी पहिले हिजाब, फिर किताब ही घोषणा देत आहेत. या अशा मंडळींना मुलींच्या शिक्षणाशी आणि त्यामाध्यमातून होणाऱ्या सबलीकरणाशी देणंघेणं नाही. किंबहुना शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांचं होणारं सबलीकरण कोणत्याच धर्माच्या धर्ममार्तंडांना मान्य नाही. म्हणूनच अशा धर्ममार्तंडांच्या नादी लागलेल्या, आपल्या मुलींनी हिजाब घालूनच शाळेत गेलं पाहिजे, असा आग्रह धरणाऱ्या पालकांना एकच सांगणं आहे. विश्राम रामजी घोले नावाच्या पित्याचे विचार समजून घ्या. स्त्रीशिक्षणाच्या विरोधकांनी काचेचा चुरा घातलेला लाडू खायला घालून एका मुलीची हत्या केल्यावरही दुसऱ्या मुलीला त्यांनी शाळेत घातलं. जिवापेक्षाही त्यांनी शिक्षणाला प्राधान्य दिलं. **पहिले किताब, फिर बाकी सब...** हे त्यांचं जीवनध्येय होतं. त्यातला अर्थ धर्माच्या नावाने जुनाट परंपरांच्या नादी लागलेल्या पालकांनी समजून घ्यावा. शिक्षणाच्या क्षेत्रात कोणत्याही धर्माचा रंग येणं चुकीचं आहे. त्यामुळे गणवेशासाठी भांडायचंच असेल तर गणवेशात शिक्षणाखेरीज कोणत्याच धर्माचा कोणताच रंग नको, यासाठी भांडायला हवं.

हिजाबचा आग्रह धरणाऱ्या मुली या पूर्णत: आपल्या पालकांच्या प्रभावाखाली आहेत. मुस्लीम समाजातील काही स्त्रीवादी महिला हिजाब, बुरखा यांचा वेगळा अन्वयार्थ लावत आहेत, हे या मुलींपर्यंत पोहोचलेलं नाही. हिजाब, बुरखा ही पुरुषसत्ताक दडपशाही आहे, ही भारतीय महिला मुस्लीम आंदोलनाची भूमिका ज्या दिवशी जय श्रीरामला 'अल्ला हू अकबर' हे उत्तर देणाऱ्या मुलीपर्यंत पोहोचेल, त्यातला अर्थ तिला उमगेल त्या दिवशी तीही जय श्रीरामला 'जय संविधान' हेच उत्तर देईल. पण परिवर्तनाची ही प्रक्रिया होण्यासाठी, त्यासाठी आवश्यक असलेली जाणीवजागृती तिच्यामध्ये आणि तिच्यासारख्या अनेक मुलींमध्ये निर्माण होण्यासाठी आधी तिला शिक्षण मिळणं, शिक्षण घेण्याचा तिचा अधिकार कायम राहणं हे महत्त्वाचं आहे. डोक्यावरचा हिजाब असेल किंवा घुंगट असेल, कपाळावरची बिंदी असेल किंवा भांगातला सिंदूर असेल किंवा गळ्यातलं मंगळसूत्र असेल, ते घालणं किंवा काढणं हा त्या त्या मुलीचा, स्त्रीचा अधिकार असेल, ती तिची 'निवड' असेल. ही निवड समतावादी मूल्यांवर आधारित अशी असायला हवी, हे खरं आहे. पण त्यासाठी आवश्यक असणारी समतावादी, स्त्रीवादी जाणीवजागृती अद्याप त्या मुलींपर्यंत पोहोचलेली नसेल तर आज जी काही त्यांची निवड आहे, त्याला पाठिंबा द्यायलाच हवा. या देशातल्या बहुसांस्कृतिकतेची, सर्वधर्मसमभावाची ती गरज आहे.

विभिन्नत्वाला अधोरेखित करणारा बहुसांस्कृतिकतावाद हा काही वेळा समतावादाच्या आशयाला छेद देणारा असतो. पण त्याच वेळी तो एकसत्वीकरणालाही नकार देत असतो. बहुसंख्याकांची झुंडशाही नाकारत असतो. सभोवती धार्मिक कट्टरतावादी राजकारण तीव्र होत असताना बहुसांस्कृतिकतेला जपत, सर्वधर्मसमभावाच्या मार्गाने घटनेचं समतावादी आशयद्रव्य कायम राखण्यासाठी उभं राहिलं पाहिजे.

**(राईट अँगलच्या सौजन्याने)**

❖❖❖

# आंतरजातीय / धर्मीय विवाह : सुदृढ विकासाचा पाया

■ विनया मालती हरि

आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाहच समाजाच्या सुदृढ विकासाचा पाया आहे असे विधान केले तर आजही काही जण मारायला उठतील, नव्हे डॉ. दाभोळकरांची हत्या होण्यामागे हेही एक कारण आहे असे म्हणले जात आहे याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाहाला विरोध करणाऱ्यांच्या म्हणण्यात किती तथ्य आहे हे जर तपासायचे ठरविले तर आज २१व्या शतकात ती शक्यता निर्माण झाली आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाने आज आणखी स्पष्टपणे ते दाखवून दिले आहे. आपण वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार केला तर त्याचा नक्कीच उलगडा करता येतो.

**एकाच आईची सर्व लेकरे?**


जनुक-विज्ञानाच्या (genetic science) अगदी अलीकडील शोधांतून बऱ्याच नवीन गोष्टी समोर येत आहेत. एक म्हणजे सर्व जगातील विविध भागांतील स्त्रिया व पुरुषांमधील जनुक-आकृतिबंधांचा (genom pattern) अभ्यास केल्यास त्यातील डीएनएमधील ३ अब्ज मम खुणांपैकी फफ ("letters") ९९.९७% खुणा या सर्वांमध्ये सारख्याच दिसून आल्या आहेत. अगदी अलीकडच्या काळापर्यंत डीएनए हे वडिलांकडून किंवा जन्मदात्या आईकडून येतात इतकीच माहिती होती. मात्र आता मानववंशशास्त्रज्ञांनी आपली दिशा बदलून सर्वदूर पसरलेल्या जनुकांची तपासणी करायला सुरुवात केली. या संशोधनातून आता हे स्पष्ट झाले आहे की जनुक-कुटुंबाचे पहिले स्थलांतर हे सर्वप्रथम अंदाजे ६०,००० वर्षांपूर्वी आफ्रिकेतील आजच्या इथिओपिया येथून सुरू झालेले दिसते. म्हणजे पृथ्वीतलावरील सर्व मानवांची सर्वात पहिली माता ही आफ्रिकेत जन्मली. त्यातील सर्वात युवा (अलीकडची) पिढी ही मार्गक्रमण करीत दक्षिण अमेरिकेपर्यंत साधारण १०,००० वर्षांपूर्वी पोहोचल्याचे निष्कर्ष निघतात. (सोबतचा नकाशा पाहा) शास्त्रज्ञांनी जो अभ्यास केला त्यामध्ये आईच्या पेशीतील गुणसूत्रांमुळे (मायटोकॉंड्रीयल डीएनए, नकाशातील M हे अक्षर) एखाद्या वसाहतीची सुरुवात कळू शकली तर बापाच्या पेशीतील गुणसूत्रांमुळे (वाय क्रोमोझोम्स, M सोबतचा अंक) मानवाच्या स्थलांतराचा मार्ग कळून आला.

पाण्याचा किंवा खाद्यपदार्थांचा साठा संपणे, सुरक्षितता (जंगलाला आग लागणे किंवा महापूर येणे), नव्या ठिकाणचे आकर्षण अशा अनेक कारणांनी माणसाने स्थलांतर केले असण्याची शक्यता आहे. या मार्गक्रमणासाठी हजारो वर्षे लागली. यासाठी जगभरातील विविध खंडातील संस्थांनी या अभ्यासात योगदान दिले. यामध्ये वेगवेगळ्या तज्ज्ञ गटांनी विविध निष्कर्ष काढले. स्थानांतराच्या विविध मार्गावर राहणाऱ्या १,००,००० एतद्देशीय लोकांमधील (indigenous people) लाखो जनुक-आकृतिबंधाचा अभ्यास यासाठी केला गेला. त्या आधारे माणसाने कसकसा प्रवास केला आणि कोठे कधी वस्ती झाली याचा एक नकाशाच तयार करण्यात आला आहे.

**एकाच आईच्या लेकरांमध्ये इतकी विविधता?**

जगभर पसरलेल्या मानवाचा जन्म जरी आफ्रिकेत झाला असला

जगभरातील अनेक शास्त्रज्ञांच्या सहाय्याने तयार केलेल्या या नकाशामध्ये मानवाचे आदिम काळातील स्थलांतर दर्शविले आहे. वाय गुणसूत्राआधारे हा जनुक-नकाशा हा तेथील वंशपरंपरा, त्याचे झालेले स्थित्यंतर व उत्क्रांतीच्या शाखां तेथील कालखंडासह दर्शवितो. (अमेरिकन सांयटिफिक, जुलै २००८ च्या सौजन्याने)




तरी प्रत्यक्षात आज आपल्याला विविध देशांतील समाजात आचारविचार, कपडे-दागिने, भाषा, लग्नाची पद्धत, अशा सांस्कृतिक, आर्थिक-राजकीय बाबी एवढेच नव्हे तर शारीरिक ठेवणीपासून प्रचंड वैविध्य दिसते. इतके वैविध्य असायचे कारण काय असा प्रश्नही पडेल. जनुक-विज्ञान याविषयी असे सांगते की आई आणि वडिलांमधील जनुकांत प्रत्येकी २३ जोड्या या गुणसूत्राच्या असतात. या गुणसूत्रातील प्रत्येक जोडीत उंची-नाक-डोळे-रंग असे शारीरिक तसेच बुद्धीविषयक गुण साठवलेले असतात. वडिलांकडील शुक्रजंतू पेशीचा आईच्या बिजांड पेशीशी संयोग होतो त्या वेळी दोन्ही पेशीतील जनुकातील गुणसूत्रांचाही संयोग होतो आणि नव्या पिढीकडे दोन्हीकडील गुणसूत्रांपैकी निवडक २३ गुणसूत्राची जोडी प्रदान केली जातात. ही गुणसूत्रांची निवड अर्थातच नैसर्गिक असते आणि यामध्ये कोणते गुणसूत्र वर्चस्व दाखवतील त्याप्रमाणे नव्या पिढीची शारीरिक ठेवण घडते. अशा तऱ्हेने दोन्हींचा संगम दिसतो तेव्हा आपण आईसारखे डोळे, वडिलांसारखा रंग असे म्हणतो. परंतु काही वेळा अगदी नवीनच गुण नव्या पिढीत दिसतात, ते ना आईचे असतात ना वडिलांचे!

पिढ्यान्‌पिढ्या अनेक पटीतील झालेल्या या संयोगाचा काळ आणि अंतर जसजसे वाढत गेले तसतसे मूळचे शारीरिक गुण जाऊन लोकांमध्ये नवीनच गुण आलेले दिसतात. म्हणूनच आफ्रिकेपासून जसजसे दूर जायला लागू तसतसे मूळ आफ्रिकन माणूस आणि इतर माणूस यांच्या शारीरिक ठेवणीत वैविध्य दिसते. तर एखाद्या नदीच्या खोऱ्यात दीर्घकाळ वस्ती केलेल्या माणसांमध्ये आपापसात जास्त काळ संकर झाल्यामुळे तुलनेने साम्य दिसते. म्हणूनच आफ्रिका, अमेरिका, युरोप, आशिया, ऑस्ट्रेलिया अशा खंडातील किंवा त्या त्या देशातील माणसांमध्ये तुलनेने जास्त साम्य आपल्याला दिसते. त्याचबरोबर शारीरिक ठेवणीत अंतर वाढत गेल्यावर जे बदल झालेले दिसतात त्याला जनुक-विज्ञानाशिवाय त्या त्या खंडातील जैववैविध्यातील तफावत (बर्फाळ प्रदेश व उष्ण कटिबंध) आणि काही प्रमाणात तेथील संस्कृती हेही कारणीभूत आहे.

### जात-वंश ही केवळ सामाजिक स्वत्वजाणीव

आफ्रिकेत जन्माला आलेला माणूस विविध नद्यांच्या खोऱ्यातून जगभर पसरत गेला आणि त्यातील काहींनी तिथे तिथे कायमची वस्ती केली. आज ज्या विश्वाला आपण खंड-देशात विभागतो त्या वसाहतींना हजारो वर्षांचा इतिहास आहे. त्या त्या खोऱ्यात समाज जीवनातील चालीरीती-भाषा संस्कृती, नीती-नियम यातदेखील वैविध्य आणि भेदही दिसतो. नैसर्गिक किंवा आपापत: जी जनुकांची निवड होते त्यातून वैविध्य निर्माण होते असे आपण म्हणू. परंतु जात किंवा धर्मासारखे भेदाभेद आणि विषम रचना या सामाजिक-सांस्कृतिक प्रक्रियेत तयार झालेली दिसतात. भारतासारख्या देशात प्राचीन काळापासून जातीभेदाची रचना अस्तित्वात आली. तर पश्चिमी राष्ट्रांमध्ये आपल्याला वंशभेदाची व्यवस्था स्थापन झाल्याचे दिसते. या सामाजिक-सांस्कृतिक प्रक्रियेला भौतिक (आर्थिक-राजकीय) पाया आहे व त्यामुळेच ही बीजे फार खोलवर रुजलेली आहेत. स्वत्वाची ओळख ही कुठल्या जातीत जन्म घेता त्यातून त्या व्यक्तीला भौतिक (आर्थिक-राजकीय) व वैचारिक (तत्त्वज्ञान-कल्पनाप्रणाली) अधिष्ठान मिळते.

मानव जातीचा जन्म एकाच आईच्या उदरातून झाला आहे आणि जनुकाचे गुण सर्वांमध्ये जवळपास सारखेच (९९.९७%) आहेत हे विज्ञानाने सिद्ध केल्यानंतरही विषमतेवर आधारित जातिव्यवस्था आजही टिकून आहे. उच्चवर्णीय जाती स्वत:ला ममशुद्धफफ समजतात आणि धर्माच्या आधारे शुद्ध-अशुद्धतेचे विचार पसरवतात. जातीबाह्य विवाह वा संकर हा मग 'अशुद्ध' आहे असे विष त्या समाजमनावर बिंबवतात. वरील नकाशावरून हे लक्षात येईल की हा संकर इतक्या पटीत आणि इतक्या मोठ्या प्रमाणावर झाला आहे की शुद्ध-अशुद्धतेचा मुद्दाच मुळी गैरलागू आहे.

एखाद्या विशिष्ट जातीत (ब्राह्मण) बुद्धिमत्ता जास्त आहे वा इतर दलित/बहुजन समाजातील जातीची माणसे ही हीन बुद्धिमत्तेची किंवा नैतिकदृष्ट्या अध:पतीत आहेत किंवा मराठा हे लढवय्ये आहेत वगैरे वगैरे. यासारख्या विधानात जीवशास्त्रीयदृष्ट्या अजिबात तत्थ्य नाही. बुद्धिमत्तेविषयी चर्चा करायची झाली तर मतिमंदत्वाची

इतर कारणे (कुपोषण किंवा समाजाने शिक्षण नाकारणे) वगळता एका कारणाकडे लक्ष वेधावेसे वाटते. ते म्हणजे जितका एका जातीत किंवा जवळच्या नात्यात संकर जास्त तितके मतिमंदत्वाचे किंवा इतर मेंदूच्या आजार होण्याचे प्रमाण जास्त! हे आता जनुकाच्या अभ्यासाआधारे स्पष्ट झाले आहे आणि नैतिकतेविषयी तर काय बोलावे? समाजजीवनात वर्चस्व करतो तोच दुबळ्यांचे सर्वार्थाने शोषण करतो हेही आता आकडेवारीने सिद्ध झाले आहे. त्यामुळे एखाद्या विशिष्ट जातीला अनैतिक ठरविणे हे आपले वर्चस्व चालू ठेवण्यासाठी केलेले 'बौद्धिक'' कारस्थानच म्हणावे लागेल. याचे परिणाम स्त्रियांना आणि त्यातही दलित आणि अल्पसंख्य स्त्रियांना सर्वात जास्त भोगावे लागतात.

**आंतरजातीय विवाह : सुदृढ पिढीसाठी पर्याय?**

शारीरिक व मानसिकदृष्ट्या विकसित नवी पिढी निर्माण करायची असेल तर वैज्ञानिक दृष्टीशिवाय पर्याय नाही. शारीरिक दृष्ट्या सुदृढ पिढीसाठी तर आंतरजातीय विवाह हेच उत्तर आहे. कारण जनुक म्हणजे आपल्या शरीराची ब्लू प्रिंट आहे आणि जनुकाच्या संकरावरून हे स्पष्टपणे दिसून आले आहे. जेव्हा जनुकीयदृष्ट्या दूरस्थ व्यक्तींमधील जनुकांचा संकर होतो तेव्हा त्यांच्या अपत्यामध्ये २३ गुणसूत्रांच्या जोड्या या निरोगी पद्धतीने एकत्र येतात. मात्र त्याच त्याच जातीत किंवा जवळच्या नात्यात परत परत विवाह संबंध येतो तेव्हा तेव्हा गुणसूत्रांचा संकर होताना आईवडिलांकडून येणाऱ्या एखाद्या गुणसूत्रावर दुसरे (आईकडील किंवा वडिलांकडील) गुणसूत्र वर्चस्व प्राप्त करते, इतके की पुढील पिढीत त्या २३ जोडीतील एखादे गुणसूत्र हे नाहीसेच होते. त्यामुळे अशा नव्या जन्मणाऱ्या व्यक्तिच्या जनुकात दोष (genetic disorder) तयार होऊ शकतो आणि अशा जनुक दोष असलेल्या व्यक्तींमध्ये अनेक प्रकारचे आजार उद्‌भवतात. उदाहरणार्थ थालॅसामिया - लाल रक्त पेशी कमजोर व लवकर मरणे, सिकलसेल ॲनेमिया - रक्ताच्या पेशींचा आकार बदलतो आणि अशा व्यक्तींनी विविध आजाराला बळी पडण्याची शक्यता जास्त असते (फाल्सिफेरम मलेरियावगळता), सिस्टीक फायब्रॉसिस- (परिणाम) स्वादुपिंडात गाठ तयार होणे, दमा लागणे किंवा फुप्फुसाला सतत होणारा रोगसंसर्ग, सायनसचा त्रास, वाढ खुंटणे किंवा नपुंसकत्व, ब्लूम सिंड्रोम - सूर्यकिरणांमुळे होणारे त्वचेचे आजार, विशिष्ट प्रकारची रोगप्रतिकारशक्ती नष्ट होणे उदा. न्यूमोनिया आणि कानाचा रोगसंसर्गाला बळी पडणे, पुरुषांमध्ये नपुंसकत्व, अकाली मनोपॉज येणे, कॅन्सरची शक्यता, अल्फा१ची कमतरता - दमा, यकृताचे आजार (सिरॉसिस) किंवा त्याचे कार्य थांबणे, हिमोक्रोमॅटोसिस - रक्तात जास्त लोह शोषले जाणे व त्याच्या परिणामी थकवा येणे, सांधेदुखी, डायबिटीस, यकृताचे वा हृदयाचे आजार, त्वचा रंगहीन होणे, कॉंजिनेटल ॲड्रेनल हायपरप्लॅजिया - नवजात अर्भकाचे स्त्रीलिंग ओळखणे कठीण जाते तर पुरुषाच्या बाबतीत शुक्रजंतू तयार होत नाहीत, लहान वयातच पक्वता येणे किंवा लैंगिक भावना न होणे, अनियमित मासिक पाळी, चेहऱ्यावर अनावश्यक लव येणे, बिजांड निर्मिती न होणे, क्लायटोरिस किंवा योनीची जास्तीत वाढ, फॅंकोनी ॲनेमिया - रक्ताचा कॅन्सर किंवा रक्तपेशींची निर्मिती थांबणे, याशिवाय बहिरेपण, थायरॉईड संबंधीचे आजार, त्वचेचे आजार (विविध रंगांचे चट्टे येणे) असे अनेक प्रकारचे आजार जनुकाच्या दोषामुळे होतात. याचे मुख्य कारण हे त्याच त्या जातीत पुन्हापुन्हा संकर होत राहणे आहे हे आहे. यासाठी भारतातील पारशी समाजाचे उदाहरण हे पुरेसे बोलके आहे. त्यांची लोकसंख्या आता फारच घटली आहे.

या जनुक-विज्ञानाशिवाय समाजविज्ञानाच्या अंगानेदेखील चिरस्थायी विकासाचा विचार केला तरीदेखील आंतरजातीय विवाहाचा पर्यायच योग्य ठरतो. निकोप विकासासाठी संपूर्ण जाती निर्मूलनातील एक पाऊल म्हणून आंतरजातीय विवाहाचा संदेश महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, अशा अनेक समाजधुरिणांनी आपल्याला दिलेला आहे. कारण समानता आणि लोकशाही शिवाय विकास शक्यच नाही. बहुजन जातीतील समाज शिक्षण-आरोग्य या साऱ्यापासून वंचित ठेवून देशाचा विकास होणे शक्य नाही. जातिव्यवस्था ही स्त्रियांचे दुय्यमत्व व दास्य टिकवून धरते आणि लोकसंख्येत जवळपास निम्म्यांनी असलेल्या महिलांचे सर्जक श्रम कुपोषण आणि निरक्षरतेच्या खाईत घालून आणि त्यांना असुरक्षिततेच्या गर्तेत लोटून देऊन एखाद्या देशाचा, खंडाचा किंवा मानवजातीचा विकासदेखील दुरापास्त आहे. तसेच सुदृढ पिढीशिवाय हे सारे अशक्य आहे. त्यामुळे जनुक-विज्ञान व समाज विज्ञानाचा संदेश आपण शिरोधार्य मानला आणि चंगळवाद न करता पर्यावरणस्नेही विकास केला तरच मानवजात या पृथ्वीतलावर टिकेल आणि विकसित पावेल. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे निसर्ग-विज्ञान व समाज-विज्ञान यांचा एकसंध विचार करणे आणि त्याचा ठोस अर्थ अशा समानतेच्या पायावर इथल्या मानवजातीचा विकास हा आहे. नवी पिढी आता इंटरनेटवरून भौतिक अंतर कमी करण्याबरोबरच सर्वार्थाचे अंतर कसे कमी करते यावर तिचे भवितव्य अवलंबून आहे!

❖❖❖

# भारतातल्या स्त्रिया आणि राजकारण

■ डॉ. स्मिता शहापूरकर
Email: smitashahapurkar1@gmail.com

१९९० च्या दशकात भारतात जागतिकीकरणाचे वादळ सुरु झाले. त्यात अनेक नवीन धोरणे आली. सर्व समूहांचा जगाशी संपर्क वाढू लागला. यातून, नव्या नव्या आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक विचारांची घुसळण सुरु झाली. तेव्हा भारत स्वतंत्र होऊन चाळीस वर्ष झाली होती. महिलांबाबत विचार केला तर, १९७५ मध्येच, म्हणजे, पंधरा वर्ष आधी, जागतिक महिला वर्ष घोषित झाले होते.

साधारणतः ९० च्या दशकात, ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायतराज अस्तित्वात आले. सोबतच, ७४ व्या घटनादुरुस्तीने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण मिळाले. या घटनादुरुस्तीमुळे गावपातळीवरचे राजकारण मजबूत झाले. तसेच, लाखो स्त्रियांना राजकारणात आपला ठसा उमटवण्याची संधी मिळाली.

त्याचवेळी, १९९१ मध्ये राजीव गांधींची हत्या झाली. यानंतर राजकारणाचा पोत बदलला. त्यावेळेपर्यंत सहसा एकाच पक्षाच्या तेही काँग्रेसचे बहुमताचे केंद्र सरकार बनत होते. त्याला अपवाद होता तो १९७७चे जनता पक्षाचे सरकार, आणि १९८९ चे जनता दलाचे सरकार!!.

१९९५ ते २००० च्या सुमारास, माया-ममता-जयललिता या तीन राजकारणी स्त्रियांची नावे एकत्रित चर्चेला आली. चौथ्या, सोनिया गांधी राजकारणात नवख्या होत्या. ममता बॅनर्जी नुकत्याच काँग्रेस मधून बाहेर पडल्या होत्या आणि त्यांनी स्वत:चा स्वतंत्र पक्ष तृणमूल काँग्रेस स्थापन केला होता. जयललिता यांनी एम. जी. रामचंद्रन यांच्या माघारी अण्णा द्रमुक या पक्षाचा कारभार एकहाती घेतला होता. मायावती यांनीही कांशीराम यांच्याकडून पक्षाची सूत्रे हाती घेत प्रमुखपद सांभाळायला सुरुवात केली होती. या तिघीही तसे पाहता आपल्या आपल्या राज्यापुरत्या नेत्या होत्या. मुख्यमंत्रीही बनल्या. एक दलित आणि इतर दोघी उच्चवर्णीय!!

यापूर्वीच्या काळात राष्ट्रीय राजकारणात ठळकपणे फक्त एकाच स्त्रीचे नाव चमकत असे. ते म्हणजे, इंदिरा गांधींचे!! त्यांच्या हत्येनंतर, तब्बल पंधरा वर्षांनी माया-ममता-जयललिता आणि सोनिया गांधी यांची नावे भारताच्या कानाकोपऱ्यात ऐकू येऊ लागली.

राष्ट्रीय राजकारणात माया-ममता-जयललिता यांची नावे चर्चेला आली ती त्यावेळच्या राजकीय परिस्थितीमुळे!! आधी, भाजपच्या पुढाकारातून स्थापन झालेली राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि नंतर, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पुढाकारातून स्थापन झालेली संयुक्त पुरोगामी आघाडी या दोन्हीही आघाड्यांकडे सत्तेचा तराजू पूर्णपणे झुकत नव्हता. एकट्या भाजप किंवा एकट्या काँग्रेस पक्षाला सरकार स्थापन करण्याइतके बहुमत नव्हते. त्यामुळे, राज्याराज्यांमध्ये प्रस्थापित झालेल्या प्रादेशिक पक्षांशी आघाडी करून

बहुमत स्थापित करण्याचे राजकारण सुरु झाले. इथून मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, शरद पवार, करुणानिधी, नवीन पटनायक, नितीशकुमार यांच्याबरोबरच माया-ममता-जयललिता यांचेही महत्व वाढू लागले. सहकारी पक्षांच्या कलाकलाने घेत सरकार चालवण्याचे राजकारण रुजू लागले.

ममता, मायावती आणि जयललिता यांचे काँग्रेसशी संबंध त्यांच्या त्यांच्या राज्यातील परीस्थितीवरती अवलंबून असत. म्हणजे, उत्तर प्रदेशमध्ये जर मुलायम सिंग काँग्रेस सोबत असतील तर मायावती भाजपबरोबर जात आणि तामिळनाडू मध्ये करुणानिधींचा द्रमुक पक्ष काँग्रेस सोबत असेल तर, जयललिता भाजपसोबत रहात. ममता बनर्जी यांनीही भाजपसोबत केंद्र सरकारमध्ये भाग घेतला होता.

ही महिला राजकारण्यांची नावे सर्वसामान्य स्त्रियांच्याही कानावर पडत होती. त्यातून त्यांचे राजकीय घडामोडींशी, इंदिरा गांधीनंतर, पुन्हा नव्याने भावनिक नाते जुळू लागले. त्यांच्या राजकीय कारकिर्दीसोबतच, सर्वसामान्य स्त्रियांचेही राजकीय आकलन समान्तररीत्या वाढू लागले.

इंदिरा ते सोनिया या दरम्यानच्या काळात स्वतंत्र, लोकशाही भारतात अनेक ठसठशीत सामाजिक बदल घडून आले होते. विशेषत: स्त्रियांचे वाढत जाणारे शिक्षण, स्त्रियांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या आरोग्यसेवा यामुळे, सामान्य स्त्रियांच्या या नव्या राजकीय व भावनिक जुळणीला नवे पैलू आले. त्यांच्या आयुष्यात जे बदल झाले, ज्या आकांक्षा निर्माण होऊ लागल्या, त्यामध्ये, आता राजकीय आकांक्षा ही होत्या. सामान्य स्त्रिया या महिला राजकीय नेत्यांमध्ये स्वत:ला पाहू लागल्या. आपणही राजकारणात उडी घ्यावी आणि या राष्ट्रीय राजकारणी महिलांसारखे कर्तृत्व दाखवावे ही नवी आकांक्षा सर्वत्र उमटू लागली. स्त्री चळवळीतही याचा विचार जोर धरू लागला. महिलांसाठी राजकीय आरक्षणाची मागणी वेगाने पुढे येऊ लागली.

आघाडीच्या राजकारणामुळे, भारतीय समाजात मूलगामी बदल घडवून आणण्यासाठी ठाम पावले उचलणे तसे अवघड होते. मात्र, भारतीय राज्यघटनेने दिलेले स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य अंमलात आणण्याचे कठीण कर्म पुढे नेण्यासाठी, नवख्या सोनिया गांधींनी पाऊल उचलले. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या मुख्य निमंत्रक असलेल्या सोनिया गांधींनी, त्यांच्या सरकारच्या काळात स्त्रियांसाठीचे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण ५० टक्क्यांवर नेले. त्यासाठी १०८ वी घटना दुरुस्ती २००९ साली झाली.

सुरुवातीला ३३ टक्के आरक्षण आणि पंधरा वर्षांनी लोकसंख्येच्या प्रमाणात, ५० टक्के आरक्षण यामुळे, प्रत्येक पंचवार्षिक निवडणुकांमध्ये लाखोंनी महिला निवडून येऊ लागल्या. पहिल्या एक-दोन निवडणुकांमध्ये अगदीच नवख्या असलेल्या स्त्रिया हळूहळू या नव्या आव्हानांना सामोरे जाऊ लागल्या. सुरुवातीला फक्त राजकीय पार्श्वभूमी असलेल्या किंवा नेत्यांना सोयीस्कर असणाऱ्या महिलांना संधी मिळाली. आता मात्र हे चित्र बदलत आहे. कसलीही राजकीय पार्श्वभूमी किंवा अनुभव नसलेल्या स्त्रियाही राजकारणात जम बसवू पाहत आहेत. त्यांच्यासमोरची आव्हाने तीच, जुनीच आहेत. परंतु, आता त्यांच्यात आत्मविश्वास येत आहे.

भारत देश स्वतंत्र झाला त्यावेळी स्त्रियांसहित सर्व वंचित घटक, निवडणुकीच्या वेळी केवळ मतदान करणाऱ्या व्यक्ती होत्या. आता, या सर्व घटकांच्या सत्तेत सहभागी होण्याच्या आकांक्षा फुलून आल्या आहेत. हा खरेतर, चांगला परिणाम आहे. आपण जाणीवपूर्वक स्वीकारलेल्या धर्मनिरपेक्ष, लोकशाही, सामाजिक न्याय या तत्त्वांना धरून चालणाऱ्या राज्यपद्धतीचा परिणाम आहे. जो पक्ष या आकांक्षांना ओळखून स्वत:ची राजकीय रणनीती ठरवेल तो पक्ष निवडून येईल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

आपली, विशेषतः स्त्रिया आणि सर्व वंचित घटकांची आतापर्यंत जी राजकीय समज वाढली आणि त्यानुसार वाटचाल झाली, त्याच्या पुढच्या टप्प्यावर आता जायला हवे. आता, तब्बल पंचवीस वर्षांचा राजकीय अनुभव स्त्रियांच्या गाठीशी आहे. हा अनुभव स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कारभारात सहभागी झाल्यामुळे मिळाला आहे. आता स्त्रियांना विधानसभा आणि लोकसभेत ३३ टक्के आरक्षण हवे आहे. या भावनेला उचित असे बिल सोनिया गांधींच्या पुढाकारातून काँग्रेस सरकारने २०१३ लाच राज्यसभेत दाखल करून मंजूर केले आहे. ते लोकसभेतही मंजूर व्हायला हवे याचा आग्रह स्त्रियांनी धरायला हवा.

विधानसभा आणि लोकसभा यांना कायदेमंडळ म्हटले जाते. इथे, राज्यातील आणि देशातील जनतेच्या हितासाठी कायदे बनवले जातात. त्यासाठी इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, विचारसरणी यांचा अभ्यास करावा लागतो. इथे मुद्देसूद संयुक्तिक चर्चा झडतात. स्थानिक स्वराज्य संस्थांपेक्षा इथली उद्दिष्टे वेगळी आहेत. यासाठी स्त्रियांना स्वत:ला तयार करावं लागेल. अभ्यास, चर्चा यांची सवय करून घ्यावी लागेल. सर्वांच्या हिताचे निर्णय घेताना, वंचित समूहांचा विचार प्राधान्याने करायचे असतो हे लक्षात ठेवावे लागेल.

सध्याचे देशातील वातावरण पहाता, आपण दिवसेंदिवस उलट्या दिशेने जातोय. वरवर प्रगतीचे, स्त्रियांच्या कळवळ्याचे गाजर दाखवून प्रत्यक्षात गरिबांची लूट आणि स्त्रियांना पुन्हा जुनाट, बुरसटलेल्या, धर्मांध वातावरणात ढकलण्याचे उपद्व्याप मोदींच्या केंद्र सरकारचे सुरु आहेत. ज्या राज्यघटनेने स्त्रियांना मतदानाचा अधिकार दिला, जुनाट विचारांपासून सुटका दिली, ती राज्यघटनाच बदलून टाकण्याचे मोठे षडयंत्र होत आहे. अशावेळी, आपली राजकीय समज अजून वाढवायला हवी. माया-ममता-जयललिता ह्या मुख्यमंत्री होत्या. त्यांनी स्त्रियांसाठी, वंचितांसाठी काय केले याची माहिती घ्यायला हवी. सोनिया गांधी, संधी असूनही पंतप्रधान झाल्या नाहीत. परंतु, स्त्रियांच्या, वंचितांच्या आणि सामान्य माणसाच्या आयुष्यावर चांगला परिणाम होईल असे कोणते निर्णय त्यांच्या धोरणामुळे झाले याचीही माहिती आपण घ्यायला हवी. माहितीचा अधिकार, ५० टक्के आरक्षण, रेशन बद्दल कायदा, घरगुती हिंसाचाराला आळा घालण्याचा कायदा ही काही उदाहरणे देता येतील.

एकंदरीत, समाजाला आधुनिक बनवताना, खोटारडेपणापासून दूर ठेवण्याची काळजी घ्यायला हवी. कोण प्रामाणिक आहे, कोण ढोंगी आहे, लबाड आहे हे डोळ्यात तेल घालून पाहायला हवं. आपल्या मुलामुलींचे भविष्य कुणाच्या हातात सुरक्षित आहे हे ओळखायला हवं. पोकळ, बड्या बड्या बाता करणारे आपल्या मुलांचे भविष्य घडवतील की, विचारपूर्वक आखणी करणारे, आणि वंचितांवरील अन्याय दूर करण्याचे काम करणारे?

प्रत्येकाला पुढे जाण्याची संधी निर्माण करण्यासाठी स्त्रियांनीच आता कंबर कसायला हवी. जाती-धर्माचे राजकारण होत आहे. ते बाजूला सारून, त्याऐवजी, सर्वसमावेशक, न्यायपूर्ण राजकारण प्रस्थापित करण्यासाठी बायकांनीच पुढे यायला हवं. लोकशाही जपायला हवी.

बाईला घरातल्या सर्वांचीच काळजी असते, विशेषत: अशक्त, दुबळ्या व्यक्तींसाठी ती विशेष काम करते. बायांच्या या मानवतावादी व्यवहाराला देशाच्या कामी आणायला हवं. तरच देश अखंड राहील आणि पुढेही जाईल. अन्यथा, पुन्हा जुन्या परंपरावादी वातावरणात अडकून पडायची वेळ येईल.

**बायांनो, सावध व्हा !! नेत्या व्हा !!**

❖❖❖

## त्रिवार हार्दिक अभिनंदन



अन्नपूर्णा महिला मंडळाच्या संस्थापक सेक्रेटरी, गोवा मुक्ती व संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील धडाडीच्या कार्यकर्त्या, महागाई प्रतिकार समिती, व भारतीय महिला फेडरेशनच्या नेत्या, कॉ. प्रेमाताई पुरव यांना **''अमेरिकेतील महाराष्ट्र फाऊण्डेशन''** या संस्थेने **''जीवन गौरव''** पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. रूपये २ लाखाचा रोख पुरस्कार सन्मान पत्र आणि सन्मान चिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

प्रेमाताई यांचे अन्नपूर्णा परिवार तसेच ''संवाद''च्या संपादक मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन.

# स्त्री-शिक्षणामुळे विस्तारणारी क्षितिजे

■ **प्रा. मीरा कुलकर्णी,**

**के. जे. सौमया कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मुंबई**

''ताई ऽऽ गावाकडनं नवऱ्याला घेऊन आले बघा! अगदी मरायला टेकलाय दारू पिऊन पिऊन...! त्या सवतीनं सटवीन... फक्त पैसा काढून घेतला बघा नवऱ्याचा..! चार दिवस सुट्टी घेऊन गावाला केलेली सुनीता... नवरा घरी आल्यामुळे आनंदात... वृत्तांत सांगत होती आणि सवतीच्या नावानं शंख करत होती... आता नवरा दारू पिणार नाही तो लई चांगलाय म्हणताना आता दारूच्या दुकानात नोकरी करणार तो.'' असं सांगताच मला छद्मी हसू आलं... कीव वाटली पण जास्त संतापायला झालं! सुनीताच्या नवऱ्यानं दुसरं लग्न केल आहेच पण अनेक बायकांवर पैसे उधळल्यानं... आता जरी सुनीता कर्जबाजारी झालीय... शिवाय त्या त्या वेळचा मनस्ताप वेगळाच. तो दारूच्या नशेत म्हणून तर काय काय सोसलंय तीनं तिचा पैसा काढून घ्यायचा आणि तिलाच सोडून गावभर फिरतोय. ''काय करणार ताई.... कुंकवाचा धनी... घरी बसला तरी लई हाय...'' सुनीता सांगत होती काय बाय... माझा संताप अनावर अगं दारूच्या दुकानात काम करण्याची दारू कशी सुटल...?सगळीकडं फिरून पैसा संपला की येतो तुझ्याकडे... तु कर्ज फेडत बसलीस... दे सोडून संगळं! मी त्यावर ताई नका असं बोलू. दहा घर फिरून शेवटी माझ्याकडच आलां नं. तिला अभिमान... मी हतबल! सुनीता अशा हजारो '-------- भान हो बुरा हो...... मेरा पती मैरा देवता है' या वृत्तीच्या स्त्रियांचं शिक्षण नाही आणि समाजव्यवस्था आणि संस्कृतीचा जबरदस्त पगडा असणाऱ्या सुनीता आजही आहेत.

अनिता सॉफ्टवेअर इंजिनीअर आयटीत सुशिक्षित, सुसंस्कृत, चांगली कंपनी, उत्तम पगार फक्त लग्न ही समस्या कारण मुलीपेक्षा मुलगा, शिक्षण, संपत्ती, वय या दृष्टीने श्रेष्ठ हवा ही समाजाची धारणा पण नवरा प्रत्येक बाबतीत वरचढ हवा ही कल्पना चुकीची आहे दोघे समान स्तरावर असले किंवा नोकरी पगाराने पत्नी वरचढ असली तर सुरुवात काही फरक पडणार नाही हे तिनं आई-वडलांना समजावलं आणि रुढ कल्पनेतून बाहेर आली.

मुक्ता डॉक्टर उच्चविद्याविभूषित नवराही डॉक्टर प्रेमविवाह दोघांचा पण... मुक्ताला कर्ज काढून स्वत:चं मॅटर्निटी होम काढायचं होतं. पण नवऱ्याने कर्ज काढण्याला विरोध केला. कर्ज काढणं आमच्या प्रतिष्ठेला शोभणारं नाही. म्हणाला आणि मदत करायलाही तयार होईना. पण तिने न ऐकता कर्ज काढलं त्याचा राग आला स्वातंत्र्याचा गैरफायदा घेतला, म्हणाला. कर्ज काढणारी बाई माझी पत्नी म्हणून मिरवू शकत नाही. असं स्पष्ट सांगत करिअर करायचं असेल तर घटस्फोट घे असं स्पष्ट सांगून कृतिशील झाला पुरुषी मनोवृत्ती. हे या घटनेचं उत्तर आहे.

मला असं वाटतं. ही प्रातिनिधिक उदाहरणं शिक्षण आणि स्त्रियांची मानसिकता... शिक्षण आणि स्त्रियांच्या सद्य:स्थितीतलं वास्तव यावर प्रकाश टाकतात. अशिक्षित सुनीतापेक्षा. अनिता आणि मुक्तानं घेतलेली ठाम भूमिका हे शिक्षणाने प्रगल्भ झालेल्या स्त्री मानसिकतेची उदाहरणं आहेत. आपलं जीवन फार मोलाचं असतं. ते आपलं अगदी आपलं असतं आणि अविचारात ते उधळून टाकावं, एवढं स्वस्त नाही हो. स्त्री ही शिक्षणामुळे स्वकेंद्री होऊन निर्णयक्षम झाली आहे, प्रगल्भ झाली.

पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रीला स्वतंत्रपणे विचार करण्याची मुभा नव्हती. तिचं स्थान दुय्यम होतं तिला महत्त्व दिलं तर तिचं म्हणणं

ऐकून घ्यावं लागेल तिला अधिकार द्यावे लागतील हे या व्यवस्थेला मान्य नव्हतं. पण पुरुषत्व सिद्ध करण्यासाठी स्त्रियांना दुय्यम लेखण्याची गरज नाही तिला येणाऱ्या अनुभवातून योग्य जीवनदृष्टी मिळते आणि त्यातून ती विचार करायला लागते. ही जाणीव शिक्षणाच्या प्रभावामुळे अधिक प्रबळ झाली.

मुलींना शिकवलं नाही आणि मुलंच शिकत राहिली. तर गृहसौख्यामध्ये अडचणी येतात. हा विचार तग धरू लागला, कारण मुलींनी पैसा मिळवून आणला तरी त्याचा विनियोग करण्यासाठीचं ज्ञान जर स्त्रियांकडे नसेल तर काय उपयोग? कामानिमित्त घराबाहेर पडलेल्या पुरुषाच्या मागे कुटुंबातली स्त्री खंबीरपणे घर चालवते. निर्णय घेते. आता तर, भाजीपाला वाणसामानापासून बँकांच्या व्यवहारापर्यंत तीला सगळ्या गोष्टीत आघाडीवर राहणं अपरिहार्य ठरलं. मुलांचं शिक्षण, आरोग्य, छंद याकडे ती अधिक डोळसपणे पाहायला लागली आणि कुटुंबातल्या सगळ्या घटकांची (आई, वडील, नातेवाईक) जबाबदारी प्राधान्याने घेत स्वत:ला सुद्धा अद्ययावत ठेवायला लागली.

शिक्षण हे सगळ्या प्रकारच्या प्रगतीचे साधन आहे. पाया आहे. त्यामुळे शिक्षणात मागे राहता आता स्त्रियांना आणि समाजालाही परवडणारं नाही. हितकारक तर नाहीच नाही.

अर्थात त्यासाठी समाजानं, कुटुंबानं सर्वसमावेशक आणि व्यापक होणं. गरजेचं आहे. तरच हातात हात घालून परिवर्तन होणं शक्य होईल. आपण जुने आदर्श आणि तत्त्व कुरवाळत बसलो तर ज्ञानार्जनानंतर, शिकल्यानंतर, कणखरपणे जगण्याला सामान्य जगणाऱ्या स्त्रियांच्या अस्मिता खुंटतील, कारण शिकलेल्या या स्त्रियांसमोर अनेक आव्हानंही आहेत त्यांना व्यवस्थेत बदल करायचा आहेच. पण वेळ आली तर व्यवस्थाच बदलावी लागेल इतक्या धाडसीपणाने आणि स्वच्छ बुद्धिनिष्ठ विचारानं. तिला जगण्याला सामोरं जायचं आहे. प्रत्येक वेळेला परिवर्तन घडावं बदल व्हावेत. हा या शिकलेल्या स्त्रीचा अट्टाहास नाही. पण किमान आपल्या प्रश्नांना, समस्यांना उत्तरं मिळावीत. तिच्या अनुभवाची, कर्तृत्वाची दखल घेतली जावी. हे जरी समाजाच्या मनात ठसले बिंबले तरीसुद्धा परिवर्तन शक्य आहे. ही जाणीव शिक्षणामुळे विकसित झाली. म्हणूनच बदलणाऱ्या काळाचं भान ठेवून आपल्याला विचारांना नवी आयामं द्यावी लागतील. त्यांची पुनर्रचना करावी लागेल. बुद्धिनिष्ठतेला वर्तमानकाळाशी जोडावं लागेल आणि परंपरेला आधुनिकतेचा संदर्भ देत त्यांची नवी व्याख्या बनवावी लागेल. केवळ स्त्रियांचा त्याग, समर्पण, बलिदान याबद्दल वारंवार बोलून तिला 'त्या' त्यागाच्या कोंदणातच अडकवून ठेवण्यापेक्षा त्या लादलेल्या खुराड्यातून बाहेर पडून अनुभव वाटून घेतले तर दोघांचीही वाढ होईल. संघर्ष संपेल. खरं तर शिक्षणानं समृद्ध अनुभवविश्व बनलेल्या स्त्रियांनी त्यांचे हे अनुभव व्यापक स्वरूपात समाजासमोर यायला हवेत. या जाणिवेतूनच आत्मकथन, कविता अशा अनेकविध साहित्य प्रकारातून स्वत:ला व्यक्त करायला सुरुवात केली. यामध्ये केवळ स्त्रीच्या समस्या मांडणं हा हेतू नाही. तर तिला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे. तिचा 'स्व'सुद्धा महत्त्वाच आहे. ही जाणीव बिंबवायची आहे.

स्त्रिया या स्वरूपाचं मुक्तचिंतन करायला लागल्या. मोकळेपणानं जगायला लागल्या. बाई शिकली की कुटुंब माडतं ही जुनी विचार-प्रणाली आता शिक्षणाने बदललेल्या मानसिकतेमुळे मागे पडली. पण स्त्रिया घरकाम करतात हे गृहीतच असल्याने त्यांच्या कष्टाला महत्त्व, मोल न देता कुटुंबासाठी त्याग करते असा तिचा भावनिक गौरव करून तिला कुटुंबात बांधून ठेवले आणि हे तत्त्व न स्वीकारणाऱ्यांना स्वैराचारी, स्त्रीमुक्तीवाल्या असं म्हणलं गेलं. मग कधी त्याला विरोध झाला तर कधी उपरोधानं हेटाळणी झाली या नकाराची.

आपल्या संस्कृतीनं पुरुषांना मुळातच स्वतंत्र विचारांचे आणि अधिकाराचे ठरवले. तर स्त्री भरणपोषणाशी संबंधित भावनांना प्राधान्य देणारी, नातेसंबंधांचा विचार करणारी साहजिकच स्वातंत्र्यापेक्षा परावलंबित्व मानणारी अशी प्रतिमा होती. लिंगभेदामुळे ती अवलंबून आहे ही भावना बळावत होती. त्यामुळे स्त्रियाचं स्वतंत्र अस्तित्व मान्य करणं गरजेचं होतं. कष्टाळू, सहनशीलता, कुशाग्र बुद्धिमत्ता, कामातला उरक अशी स्त्रियांची अनेक वैशिष्ट्य आहेत जी पुरुषांच्या वैशिष्ट्यांपेक्षा कुठेच कमी दर्जाची नाहीत. भावना आणि बुद्धी यांचा एकत्रित समन्वय साधण्याचं सामर्थ्य स्त्रियांकडे आहे. पारंपरिक, सांस्कृतिक मूल्यांमध्ये आपण तिला अडकवतो पण संस्कृती प्रगल्भ करणं म्हणजे विज्ञानाला, आधुनिकतेला, नवमूल्यांना टाळणं नसून या सगळ्यांना आत्मसात करणं असा आहे. कारण जगतानाचे या संवादाचे अनुभव संस्कृतीला मजबूत करतात. त्यामुळे सभ्यता एकमेकांना केलेलं सहकार्य, नैतिकता, आत्मिक समाधान या सगळ्यांचा स्विकार करणं. तिला या शिक्षणाच्या संधीमुळे शक्य झाले.

महात्मा फुले, सावित्रीबाई, ताराबाई शिंदे अशा अनेकांचे या काळाचे योगदान त्यासाठी फळाला आले. फुल्यांनी स्त्रियांच्या आधुनिक शिक्षणाला शाळा स्थापन करून सुधारणेच्या चौकटीत आणले. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यामुळेच स्त्रीभानाचे कृतिशील पाऊल उचलता आले. आधुनिक शिक्षणामुळे तिला अनेक संधी उपलब्ध झाल्या आणि उंबरठ्याबाहेरच्या खुणावणाऱ्या जगात तिने प्रतिसाद दिला. सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाला मग बराच पाठिंबा मिळाला आणि मग शाळा, शैक्षणिक संस्था एक पाऊल पुढे टाकण्याचं माध्यम झाल्या.

पर्यायाने शिक्षणामुळे कुटुंबव्यवस्थेमधल्या संबंधांचा दर्जा सुधारला. ज्या प्रथा, परंपरेत ती अडकली होती त्याचा प्रभाव कमी झाला. स्त्रीचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आणि माणूस म्हणून तिच्याकडे बघण्याची वृत्ती बळावली.

९० च्या दशकात सुशिक्षित नोकरदार स्त्रिया, सार्वजनिक जीवनात मोठ्या प्रमाणावर आल्या. शिक्षण, रोजगार, नोकरी, व्यवसाय यामध्ये

या स्त्रिया आघाडीवर आहेत. स्त्रीसबलीकरण या नावाखाली अपेक्षित उद्दिष्टांसाठी प्रयत्न सुरू झाले. त्यासाठी शिक्षणाची पातळी वाढवून, कधी सर्वच क्षेत्रांतला तिचा सहभाग वाढवून कधी वेगवेगळ्या समित्यांच्या वैधानिक पदांवर तिची नियुक्ती करून हे साधण्याचा प्रयत्न झाला. स्त्रियांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने किंवा त्या त्या क्षेत्रातील (विज्ञान, आरोग्य, शिक्षण) अभ्यासू स्त्रियांच्या सहभागाचे चर्चासत्र परिसंवाद घडू लागले आणि साहित्य, वैचारिक लेखन या माध्यमातून विचारमंथन व्हायला लागले. ही शिक्षणामुळे झालेल्या बदलाची फलश्रुती आहे.

स्त्री पुरुषांना संस्कृतीनं बहाल केलेल्या जुन्या, पारंपरिक भूमिका गेल्या पन्नास वर्षात झपाट्यानं बदलल्या, बायका शिकल्या, कमावत्या झाल्या म्हणून फार शेफारल्या आणि त्यामुळे आज कुटुंब तुटते, घटस्फोट होतात ही भावना बहुतेकांची असते. पण ज्या कुटुंबव्यवस्थेचं आपण कौतुक करतो. जी कुटुंबव्यवस्था प्रत्येकाच्या जगण्याचा पाया आणि आधार आहे. ती केवळ बाईच्या त्यागावर तोललेली होती. हे शिकलेल्या या स्त्रीनं उदाहरणांसहित सिद्ध केलं. शिक्षणानं वैचारिक कक्षा रुंदावलेल्या स्त्रीनं आता त्यागाची एकतर्फी सक्ती अमान्य केली. एकटीनेच त्याग करायचा हे तिनं नाकारलं. घर, कुटुंब, मुले, नातेवाईक हवेतच पण त्या सर्वांमध्ये वेळ, शक्ती आणि बुद्धी खर्च करणं तिन नाकारलं. मदतीची, सहकार्याची तीला अपेक्षा आहे आणि कुटुंबीयांकडून, नवरा, मुलाकडून ती मिळत नाही. त्यामुळे तीचं स्वयंपूर्ण जगणं, ध्येयानं झपाटून जाणं, करियरसाठी भरारी घेणं यात अडथळे येतात आणि कुटुंबव्यवस्था डळमळते.

शिक्षणामुळे आलेल्या खंबीरपणामुळे पुरुषांच्या दुटप्पी वागण्याचा तिनं कडाडून विरोध केला. म्हणजे हे पुरुष स्वत:च्या आई, बहिणींच्या सन्मानाबद्दल संवेदनशील असतात तेवढे त्रयस्थ महिलांबाबत नसतात. घरात आई-बहिणींचा आदर आणि बाहेर परस्त्रीबद्दल अनादर, बाहेर इतर स्त्रियांवर अन्याय होताना मागे हटणारा, मदतीला धावून न जाणारा पुरुष घरामध्ये मात्र या बाबतीत सतर्क असतो.

म्हणूनच घरातल्या कामवाल्या बाईपासून सहकारी, मैत्रिणी, घरातील स्त्रिया यांचा माणूस म्हणून विचार केला तरच बदल घडेल हा विचार त्या आग्रहाने मांडायला लागल्या.

तलवारीऐवजी लेखणी-शिक्षण हे नवीन शस्त्र सावित्रीबाई फुल्यांमुळे मिळालं. महाराष्ट्रातल्या स्त्रीजीवनातही सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ बदलण्यासाठी हे पूरक वातावरण होतं.

बुद्धिमान असणं प्रत्येकाला आवडतं आणि शिक्षणाने बुद्धिमत्ता वाढते. हुशार व्यक्ती सगळ्यांना आवडते आणि ज्ञानी व्यक्तीबद्दल सर्वसामान्यांना आदर असतो. बऱ्याच स्त्रिया अनेक कलांमध्ये, छंदांमध्ये निपुण असतात. स्वयंपाकात हुशार असतात. काही बायका बोलण्यात, व्यवहारात हुशार असतात. ही हुशारी मोठ्या मनाने आणि अत्यंत आनंदाने आणि अभिमानाने कुटुंबीयांसह समाजाने स्वीकारायला हवी. अन्यथा नात्यात वेगळे सूर उमटायला लागतात.

खरंतर घरातलं काम. दोन्ही वेळेचा स्वयंपाक करून नोकरी करणारी स्त्री सर्वांनाच आवडते. पण तिनं ठरावीक वेळी परतावं हा अट्टाहास असतो. झालाच वेळ तर तीनं कारणं द्यावी लागतात. याऊलट पुरुष जर कामानिमित्त जास्त वेळ बाहेर राहिला तर ते खूप 'बिझी' असतात म्हणून त्यांचं कौतुक होतं. कितीही शिकली तरी स्त्रीला घरातून बाहेर पडताना का? कुठे? कशासाठी? या प्रश्नांची कारणमीमांसा द्यावी लागते. त्या घराबाहेर जातात तेव्हा त्यांच्या डोक्यावर एक अदृष्य घर सोबतीला असते. पण त्याचाही विरोध ही शिकलेली. स्त्री करत नाही. कारण तिच्या प्रगल्भ विचारांनी हे स्वीकारलेलं असतं.

खरं तर नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्यांना दृष्टीआड करू नये. डॉक्टर्स, बँका, वैमानिक, पोलीस, नर्स, शिक्षिका, संशोधनाचं क्षेत्र असो किंवा संगणकाचं. प्रत्येक ठिकाणाचे ताणतणाव भिन्न असतात. स्त्रियांना योग्य ते सन्मान मिळावा ही अपेक्षा असली तरी तो मिळतोच असं नाही.

वर्ण, जात आणि पुरुषी वर्चस्वाला सामोरं जात, टक्कर देत स्त्रियांनी वेगवेगळ्या क्षेत्रांत केलेली कामगिरी आणि घेतलेली झेप कौतुकास्पद आहे. आता लाखोंच्या संख्येत स्त्रिया पदवीधर होतात. उच्चशिक्षणातही त्या अग्रसेर आहेत. महत्त्वाचे म्हणजे उच्च शिक्षणात स्त्री–पुरुष विषमता कमी झालीय. हे प्रकर्षानं जाणवतं.

शिक्षणाने प्रगल्भ झालेल्या स्त्रियांनी पुरुषी वर्चस्वाची प्रतीक आणि परंपरा यांचं बंधन नाकारलं. मग मंगळसूत्र घालायलाच हवं, नवऱ्याचं आडनाव सक्तीचं नाही. मुलांचा सांभाळ सर्वांनी मिळून करायचा, आर्थिक स्वातंत्र्य सक्तीचं. घरकामात मदत हवीच, अशा अनेक प्रश्नांमध्ये या स्त्रियांनी स्वत:ला आवडेल, पचेल अशी ठाम भूमिका घेतली.

नवऱ्याला एकेरी नावानं हाक मारत सहकारी, मैत्रीची भावना प्रबळ करणारा सूर तिला शिक्षणामुळे मिळाला. नवरा म्हणजे परमेश्वर ही भावना मागे पडली आणि माणूस म्हणून स्वीकारण्याचा कल वाढला.

एकूणच स्त्रिया सुजाण असतात. त्या बुद्धीबरोबरच मनानेही विचार करतात. बुद्धीला जे पटेल त्यानुसार निर्णय घेण्याची धमक शिक्षणामुळे मिळालीच पण आपल्या वर्तनाचे परखड स्पष्टीकरण देण्याची क्षमताही त्यांच्यात निर्माण झाली. शिक्षण, व्यवसाय, नोकरी इ. अनेक कारणांमुळे घराबाहेर पडणाऱ्या स्त्रिया आता रोमँटीक प्रवृत्तीपेक्षा जास्त प्रगल्भ झालेल्या जाणवू लागल्या.

स्वत:चं आयुष्य स्वत:ला आवडेल तसं आनंद घेत जगायचं. तडजोड करायची नाही. असा स्वतंत्र जगण्याचा त्यांना अभिमान वाटायला लागला. स्वत:ला इतरांच्या संदर्भानुसार शोधण्यास नकार देणारी जाणीव या शिक्षणाने प्रगल्भ झाली.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत जगताना स्त्री विरुद्ध पुरुष किंवा

फक्त पुरुष म्हणेल तसं असं व्यवस्थेचं स्वरूप न राहता स्त्री आणि पुरुष दोघांनी मिळून समानतेनं व्यवस्थेला सामोरं जाऊ या हे भान आलं. कारण सुखी होणं हे परावलंबी असतं. शिक्षणाने झालेल्या ठाम मतामुळे ती आता आपल्या इच्छा आकांक्षा न मारता त्यांना महत्त्व देऊन जगते. जे नको... मान्य नाही त्याला ठामपणाने नकार देण्याचं सामर्थ्य तिच्यात आलंय ती स्वत:चा शोध घ्यायला लागली. हे करताना कधी तिला खाचखळग्यांना, मनस्तापांना सामोरं जावं लागलं. तरी शिक्षणामुळे खचून न जाण्याची ताकद तिला मिळालीय. तिचं समाजभान विस्तारल्यामुळं आलेल्या धाडसातून ती तीचं चालणं, विचार करणं, तत्त्वांशी एकनिष्ठ राहणं स्वीकारते.

लिखित राज्यघटनेत आंबेडकरांनी मूलभूत हक्कांचा समावेश केलाय. कारण व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर इतर कोणत्याही संघटनांचे किंवा शासनाचे आक्रमण होऊ नये हा त्यामागचा उद्देश आहे. बुद्धीला भावनेचे परिमाण आणि सुंदर ध्यासाला ज्ञानात्मक बनवणं या शिकलेल्या स्त्रियांना चांगलं जमलं त्यामुळे प्रसंगी मातृत्व नाकारणं, शरीरसौंदर्याचे निकष बदलणं हे निर्णय क्रांतिकारक वाटले. परिवर्तनासाठी अनेकविध उपलब्ध असणारे मार्ग स्वीकारणे आणि त्याच्या प्राप्तीसाठी अवकाश उपलब्ध करून देणं गरजेचं आहे आणि त्यासाठी स्त्रीयांकडे बघण्याची तुच्छ वृत्ती सोडावी लागेल आणि स्त्रियांप्रतीचा रागही उपयोगी नाही हे वास्तव समाजमनाला पटलं आहे.

आज कोणत्याही शैक्षणिक संस्थेत गेलो तर आपल्याला मुलींची संख्या ६०%, ७०% पर्यंत असलेली दिसते. गुणवत्ता यादीमध्ये ३०%, ४०% मुली असतात. इंजिनीअर, वैमानिक, महाविद्यालयाचं प्राचार्यपद, माध्यमांतल्या नोकऱ्या यामध्ये स्त्रिया मोठ्या प्रमाणावर आहेत हे सत्य आपण पाहतोच. स्त्रियांची काम करण्याची पद्धत, वागण्या, बोलण्या-चालण्यात आत्मविश्वास वाढला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक अशा सगळ्या क्षेत्रांत स्त्रियांचा वावर वाढलाय. कर्तृत्व सिद्ध करण्याची प्रवृत्ती वाढलीय.

सौंदर्याच्या क्षेत्रात पार्लर चालवणे असो किंवा आता इंटरनेटच्या जगात टेक्नॉसॅव्ही असणं अनेक पटीनं वाढलंय. प्रत्येक स्त्रीकडे मोबाइल आहे. त्यामुळे जनसंपर्क वाढलाय आणि टी. व्ही. वगैरे माध्यमांमुळे समाजवास्तव तिच्यापर्यंत पोहोचलंय. आपण समाजशील असल्यानं बदल अपरिहार्यपणे स्वीकारायला हवेत फक्त हे बदल समजण्यासाठी जशी वैचारिक प्रबलता हवी तसेच मोठं मनही हवं. नव्या पायवाटा शोधून त्या वाटेनं चालणं गरजेचं आहे. नव्या संकल्पना स्वीकारून त्या अंगीकारण गरजेचं आहे. हे भान शिक्षणाने जागृत केले.

विज्ञान तंत्रज्ञानानं, स्त्रियाचं जगणं सुकर केलं आहे आणि स्त्रियांना उद्योग, व्यवसायाच्या, ज्ञानप्राप्तीच्या संधीसुद्धा दिल्या आहेत. मिक्सर,फ्रिज,वॉशिंग मशीन,वाहनं, मायक्रोव्हेव, मोबाइल यामुळे तिचे कष्ट कमी झालेत. जगणं गतिमान झालंय. स्त्रियांनी तिच्या अंगभूत गुणांनी आणि हुशारीने या सगळ्या नव्या क्षेत्रात पाय घट्ट रोवले आणि क्रांती केली. गुणवत्ता आणि मेहनतीच्या बळावर स्वीकारलेल्या प्रत्येक क्षेत्रातं शितिजं तिनं पादाक्रांत केलं. अगदी पापड उद्योगापासून, हॉटेलची शेफ, स्वयंपाकी, विणकाम, शिवणकाम, फॅशन, डिझाइनिंग, ब्युटीपार्लर, शेतीव्यवसाय यापासून बचतगटापर्यंत तिने विविध मार्ग स्वीकारले. आज ऑनलाइन शॉपिंग करण्यात सोशल मीडियाचा वापर करण्यात महिलांचे प्रमाण जास्त आहे.

आजची गृहिणीसुद्धा उच्चविद्याविभूषित आहे. महत्त्वाकांक्षी आहे. त्यामुळे घर की करिअर? हा प्रश्नच तिच्यापुढे नाही. ती पहिल्यांदा करिअर करेल नंतर घर संसार यांना प्राधान्य देईल. अशी दुहेरी क्षमता तिने सिद्ध केलीय. विज्ञानामुळे कुटुंबनियोजनाची साधनं उपलब्ध करून दिलीयत. तरी तिच्या सृजनशक्तीचा सन्मान करत. मातृत्वासाठी त्याअनुषगांने आश्वासक वातावरण तयार करून बालसंगोपनाची जबाबदारी सर्वांनी स्वीकारली तर तिच्या करिअरमध्ये अडसर येत नाही.

शिक्षणाने बदलले स्त्रियांचे जीवन तिच्या जगण्याच्या प्रत्येक टप्प्यावर जाणवते. पूर्वी घराणं बघून ठरवून लग्न व्हायची आता घराण्याइतकेच व्यक्तिगत समजून घेणं. व्यक्तिविचार महत्त्वाचा वाटतो.

पूर्वी पतीच्या निधनानंतर मुलांसाठी जगणारी.... सासर-माहेर यांना सांभाळत, माणसांचा आधार घेत जगणारी स्त्री आता शिक्षणानंतर या बाबतीत अधिक समंजस आणि स्पष्ट भूमिका घेऊन वावरताना दिसते. ती आता वैधण्याकडे जुन्या पारंपरिक दृष्टीने पाहात नाही तर हे एक अपरिहार्य वळण आहे. या समंजसपणाने पुन्हा नव्याने जिद्दीने जगण्याला सामोरी जाते. घराबाहेर पडते, आवडीचे छंद जोपासते. राहून गेलेलं मनासारखं जीवन जगते.

इतकंच नाही तर स्त्रियांच्या शारीरिक प्रश्नासंबंधीचे जे अनुभव आहेत त्याची आता त्या मोकळेपणानं चर्चा करायला लागल्या किंबहुना त्याविषयीची स्वत:ची मतं धाडसानं मांडायला लागल्या. मासिक पाळीचा अनुभव, गर्भारपण, बाळंतपण, मेनॉपॉज, गर्भपात शरीरासंबंधांविषयीची उदासीनता हे अत्यंत खासगी प्रश्न स्पष्टपणाने मांडण्याचा परिपक्व आणि अत्यंत गरजेचा विचार शिक्षणामुळे विस्तारला. स्त्रीला आपल्या सामर्थ्याची जशी कल्पना आहे तशीच मर्यादांची जाणीव आहे. त्यामुळे स्वत:ला आवडलेल्या, पटलेल्या मार्गावरून ती ठामपणे आजही चालत राहिलीय. चांगल्या शिकलेल्या स्त्रिया उत्तम पत्नी होतात. सुशिक्षित माता होतात. ती घरसंसार, घरच्यांचं स्वास्थ्य उत्तम सांभाळते, मुलांचं संगोपन उत्तम करते आणि सुशिक्षित स्त्री नवऱ्याला उत्तम साथही देते.

सुशिक्षित समाज मात्र धूर्तपणाची भूमिका घेतो आणि तटस्थ राहतो. म्हणजे विचार मांडताना स्त्रियांचा कैवार घ्यायचा आणि वैयक्तिक आयुष्यात स्त्रियांना न्याय द्यायची वेळ येते तेव्हा मात्र सोईस्कर भूमिका मांडली जाते.

एकूणच स्त्रिया आधुनिक आणि प्रगल्भ संस्कृतीशी स्वत:ला जोडू पाहायला लागल्या. त्यांचं अनुभवविश्व बदललं तिच्या अनुभवांना अनेकविध क्षेत्रातल्या मार्गांचे दाखले मिळाले. त्यामुळे अर्थातच सामाजिक आव्हानांना स्वीकारण्याची तिची समज वाढली. दृष्टिकोन बदलला आणि तिच्यातला भाबडेपणा संपून ती अधिक प्रगल्भ झाली. धाडसानं बोलू लागली. इतकेच नाही तर स्त्रियांचे आरोग्य, शिक्षण, न्याय्य, हक्क या विषयांवर सार्वत्रिक चर्चा व्हायला लागल्या तशी सरकारी धोरणं, योजना, कार्यक्रम तयार व्हायला स्त्री-पुरुष माणूस म्हणून समान आहेत हे अधोरेखित झालं आणि तिचं व्यक्ती म्हणून असलेलं महत्त्व मानलं गेलं.

पण...! पण...! आजही आपल्याकडे स्त्रीची माणूस म्हणून सुरक्षितता किती? हिंसेपासून मुक्ती किती? आर्थिक स्वातंत्र्य, सुरक्षितता किती? या प्रश्नांची उत्तरं साशंक मनानंच द्यावी लागतील. कारण शिक्षणासंदर्भात विचार करताना दलित स्त्री, आदिवासी स्त्री, ग्रामीण भागातील स्त्री किंवा अर्ध शहरी किंवा शहरी स्त्री, अशा अनेक आयामांना वेगवेगळे तपशील आहात. त्यांच्यासाठी शिक्षणाची परिभाषा काय? याचा विचार करावा लागेल.

कारण कोणत्याही क्षेत्रातल्या स्त्रीचं बाईपण ओलांडून तिचं जबाबदार आत्मनिर्भर व्यक्तिमत्त्व घडवणं याकडे आपला कल असायला हवा. तिला प्रामुख्याने स्वत:शी संवाद साधायला हवा.

२० व्या शतकात बौद्धिक वातावरणात बदल झाला. धार्मिक कर्मठपणा कमी झाला. महाराष्ट्रात सुधारणेचं वार वाहू लागलं आणि स्त्रियांना मिळणाऱ्या विकासाच्या संधीमुळे स्वयंनिर्णय होणं सोपं  झालं.

आपल्या मनाची क्षितिजं मंदावण्यासाठी आणि सामाजिक जाण वाढवण्यासाठी शिक्षणाचा उपयोग होतो. शिकणं म्हणजे अधिक जबाबदारी घेणं आणि चुकीच्या गोष्टींना नकार देणं किंवा त्या दूर करण्याचा प्रयत्न करणं होय. पुरुषासत्ताक पद्धतीत मिळालेलं दुय्यम  स्थान आणि शिक्षणानं आलेलं आत्मभान त्यामुळं तिचे समाजभान विस्तारलं आणि फार आकांडतांडव न करता स्त्री-पुरुष साहचर्य निर्माण करत तिने स्वत:चे आणि पर्यायाने कुटुंबाचे अनेक प्रश्न सोपे केले.

कारण खरं पाहिलं तर पुरुषच घरातल्या बहुतांश गोष्टींसाठी स्त्रियांवर अवलंबून असतात. घरातील स्वच्छता, आदरातिथ्य, देवधर्म, स्वयंपाकपाणी, मुलांना वाढवणं, आजारपणं काढणं, नातेवाईक सांभाळणं. या गोष्टी बायकाच करतात. बायको सासरच्या घरात नवीन असते आणि नवऱ्यापेक्षा वयानं लहान असून सारं करते पण वयाने मोठा असणारा, त्याचा घरातला नवरा मात्र ते करू शकत नाही, व्यवस्थेच्या या चौकटी आहे तशा स्वीकारण्यापेक्षा त्या चौकटींमध्ये स्वत:साठी जागा निर्माण करायची किंवा प्रसंगी त्या चौकटीची बंधनं झुगारून द्यायची हे ठरवण्याचं स्वातंत्र्य तिनं स्वीकारलं.

शिक्षणामुळे समाज व्यवस्थेतल्या पुरुषप्रधान व्यवस्थेतली हिटलरवृत्ती नरम झाली. स्त्रीला स्वत:कडे समाजाकडे, कुटुंबातल्या नात्यांकडे पाहण्याची नवी वृत्ती मिळाली आणि विषमतेला आव्हान देण्याची तीची जाणीव अधिक प्रगल्भ झाली. परंपरेत लादलेल्या भूमिकांना नकार देण्याची क्षमता शिक्षणाच्या व्यापक दृष्टिकोनाने मिळाली. समाजातल्या आणि कुटुंबातल्या निर्णयप्रक्रियेत आता तिचं मत मांडण्याची आणि समान सहभागाची वृत्ती स्वीकारार्थ मानली गेली.

'सातच्या आत घरात' अशी बंधन घालण्यापेक्षा तीला सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणं ही आपली जबाबदारी आहे ही वृत्ती तग धरू लागली स्त्रियांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण मिळाले, पोलीस गस्त वाढवली गेली, हेल्पलाइन नंबर, महिलांच्या तक्रारीची दखल घेणं, महिलांच्या डब्यात सुरक्षारक्षक नेमणं या आणि अशा कितीतरी उपायांमुळे तिच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना झाल्या आणि त्यामुळे घटना घडल्यावर उपाय करण्यापेक्षा प्रतिबंधात्मक उपायांची गरज लक्षात आली.

एकूणच स्त्रियांना येणारे अनुभव आणि शिक्षणाने रुंदावलेल्या विचारांच्या बौद्धिक कक्षा त्यांना कुटुंबाबाहेर नेतात आणि बाहेरच्या व्यापक जगातल्या समृद्ध विचारधारांनी स्त्री आता बाहेरचं जग कुटुंबात आणायला लागली. सुधारणा, नवविचार, एखाद्या प्रसंगाकडे पाहण्याची समंजसवृत्ती आणि नवी मूल्य, आधुनिक दृष्टिकोन यामुळे तिचे कुटुंबभावना, समाजभान विस्तारले.

जुन्या काळातल्या चौकटीआजच्या जाचक नियमातून ती बाहेर पडली आणि नव्या स्वानंदाच्या स्वकर्तत्वाच्या दिशांकडे पादाक्रांत झाली. विज्ञानवाद आणि बुद्धिनिष्ठता व्यापक झाल्यामुळे स्त्री-पुरुष विषमता म्हणजे लिंगभाव संपवणं हा सुरुवातीचा लढा आता स्वशोधाकडे वळला आणि स्वत:ला सिद्ध करण्यासाठी तिने कुटुंब समाज, शिक्षण, नोकरी, व्यवसाय या सगळ्या पातळ्यांवर चौफेर संचार करत तिची मूलत: धूर्त, चाणाक्ष आणि कष्टाळू वृत्ती रसिकतेसह बुद्धीच्या पातळीवर सिद्ध केली. हीच शिक्षणाच्या विस्तारलेल्या कक्षा अवगत केल्यामुळे तिच्या जीवनाला अर्थपूर्णता येण्यासाठी मिळालेली फलश्रुती आहे. हे निश्चित.

❖❖❖

# महिलांची मायांगाची दुखणी

■ **डॉ. कामाक्षी भाटे, के.ई.एम.रुग्णालय, मुंबई**

नुकतीच मी कोकणात देवरुखला गेले होते, म्हणजे २०२१ नोव्हेंबरमध्ये. आमचा एक मित्र विजयने महिलांचे आरोग्य शिक्षणाचे शिबिर ठेवले म्हणून गेले होते. मला वाटले महिलांच्या आजारावर केवळ व्याख्यान ऐकायला खेड्यापाड्यात कोण येईल? कोविडमुळे बंद असणाऱ्या शाळा-बालवाड्यांमध्ये ठेवलेल्या प्रत्येक शिबिरात साधारण २५ ते ३० महिला आल्या. वेगवेगळ्या वयाच्या, त्यांनाच विचारायचे, 'महिलांच्या आरोग्य समस्या कोणत्या?' आणि थोडा वेळ द्यायचा, ते म्हणतील तसे बोर्डवर खडूने एकाखाली एक लिहून घ्यायचे, त्याच क्रमाने मुली-महिलांशी बोलत असे. काही वेळा एखाद्या समस्येबद्दल आठवण करून द्यावी लागायची, इतर महिला गप्प झाल्या तरी एखादी मात्र तो प्रश्न उचलून धरायची तो प्रश्न मग लिहिला जायचा.

आपल्या देशात मायांगाबद्दल महिलांनी बोलायचं नसतं असा काहीसा अलिखित नियम आहे म्हणून महिला दुखणी अंगावर काढतात. ती दुखणी वाढतात आणि जास्त गुंतागुंतीची बनतात.

हे केवळ रोग नव्हेत. ती महिला म्हणून तिच्या जननक्षमतेमुळे, पाळीमुळे, गर्भारपणामुळे बाळंतपणामुळे आणि इतर कारणांमुळे मायांगत बदल होतात, जंतूसंसर्ग होतो. त्यासाठी काही वेळा तपासण्या करून साधे उपचार घ्यावे लागतात, काही साधे व्यायाम करून ही दुखणी वाढण्याआधी कमी करता येतात.

**अंगावर जास्त रक्त जाते किंवा कमी रक्त का जाते? :** मुलींना पाळी यायला लागल्यापासून आईला कुठेतरी वाटत राहते की पाळी महिन्याच्या महिन्याला यावी, भरपूर अंगावर जावे, म्हणजे अंगात घाण साचून राहणार नाही किंवा खूप जास्त रक्त जात असेल आणि पाळी सहा दिवसांपेक्षा जास्त गेली तरी आईचा जीव घाबरा होतो. पाळी आल्यानंतर अंगावर जास्त किंवा कमी रक्त जाणे ही दोन्हीहि लक्षणे अंगात रक्त कमी असल्याची आहेत. आपल्या देशात सामान्यपणे ५०% मुली-महिला ॲनिमिक (अंगात रक्त कमी असणे) असतात, आणि ७०% गरोदर महिला ॲनिमिक असतात. अंगात रक्त कमी असण्याच्या अवस्थेचा महिलांच्या व मुलींच्या पुढील आयुष्यात ही परिणाम होत राहतो. सुरूवातीलाच लगेच भरमसाट हार्मोन्सची औषधे न घेता केवळ रक्तवाढीची लोहाची गोळी घेतली तरी उपयोग होऊ शकतो. लोहाची गोळी कमीतकमी तीन महिनेपर्यंत घ्यावी लागते, पण काही वेळा मुली-महिला त्या गोळ्या मधेच सोडतात आणि अशक्तपणा अंगात तसाच राहतो.

पण इथे हे लक्षात घ्यायला हवे की वयाच्या ४० व्या वर्षानंतर अंगावर जास्त जात असेल तर ते पाळी जाणार असल्याचे लक्षण असू शकते किंवा गर्भाशयाच्या तोंडाच्या कॅन्सरचे लक्षण असू शकते. गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर महिलांमधील सामान्यपणे आढळणारा कॅन्सर आहे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे लवकर निदान झाल्यास हा कॅन्सर पूर्णपणे बरा होतो. शिवाय हे निदान गर्भाशयाच्या मुखावरील स्त्रावाच्या केवळ काचपट्टीवरील तपासणीने करतात, त्याला 'पेप्स स्मियर' म्हणतात. ते करून घेणे सोपे आहे आणि जीव वाचवणारी आवश्यक तपासणी आहे.

**अंगावर पांढरे जाणे (white discharge) :** या प्रश्नाकडे थोडं व्यापक दृष्टीने पाहूया, त्याचं असे आहे की स्त्रीचा योनीमार्ग ओला राहण्यासाठी योनीतून थोडा स्त्राव येत असतो तो अगदी थोडा आणि घट्टसर असतो. परंतु महिन्यातून काही दिवस हा स्त्राव जास्त असतो, कोंबडीच्या अंड्याच्या पांढऱ्या बलकासारखा चिकट, नरम आणि पारदर्शक दिसतो. या काळामध्ये अंडाशयातून महिलेचे अंडे बाहेर पडत असते म्हणून हा अतिरिक्त स्त्राव योनीमार्गातून बाहेर येतो. हे सामान्य म्हणजे नॉर्मल आहे, भीतीचे कारण नाही.

परंतु एखादी महिला आपल्याला **पांढरा पदर जातो** आहे असे जेव्हा म्हणते तेव्हा, योनीमार्गातून बाहेर पडणारा स्त्राव खूप जास्त प्रमाणात म्हणजे घडी (पॅड) घ्यायला लागेल एवढा असतो. स्त्रावाचा रंग पिवळट, हिरवट किंवा दह्यासारखा असतो. काही वेळा त्या स्त्रावाबरोबरच मायंग खाजवणे,स्त्रावाला वास येणे, ओटीपोटात दुखणे वगैरे होते यालाच मराठीत पांढरा पदर जाणे किंवा White Discharge असे म्हणतात. ही जंतुसंसर्गाची लक्षणे असू शकतात. अशा वेळी महिलेला काळजी वाटत असते, हे आपसूकच कमी होईल अशी आशा पण वाटत असते. कुणाला सांगायचे, काय तपासणी करणार याची भीती असते. हा जंतूसंसर्ग कोणत्या प्रकारचा आहे याची तपासणी करून मगच उपाय केला जातो. हे जनन अंगांचे संसर्गजन्य रोग आहेत, अस्वच्छतेमुळे आणि जास्तकरून लैंगिक संबंधातून पसरतात. उपचाराला गेल्यावर फक्त तिचाच उपचार केला गेला तर उपयोग होत नाही. नवरा – बायकोचा उपचार एकाच वेळी व्हावा लागतो. काही वेळा पुरुषांना वाटू शकते 'तिला त्रास आहे मला काही नाही मग माझा का उपचार करायचा?' फक्त तिचाच उपचार केल्यावर तात्पुरता कमी झालेला जंतुसंसर्ग, लैंगिक संबंधातून महिलेला पुन:पुन्हा होऊ शकतो. महिलेचा नुसता उपचार म्हणजेच अर्धवट उपचार!

इथं आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगितली पाहिजे की अर्धवट उपचाराचा परिणाम म्हणून केवळ योनीमार्गाचा जंतूसंसर्ग गर्भाशयाच्या मुखाशी किवा गर्भाशयात पोहोचलेला असतो. त्याने गर्भपिशवीला सूज येते. आता उपाय अर्धवट राहिला तर ओटीपोटात तीव्र दुखते ज्याला PID, Pelvic Inflammatory Disease म्हणतात. काही वेळा हे दुखणे कायमचे होते. जर हे तरुण वयात झाले तर वंध्यत्वाचे कारण बनते.

**पिशवी उतरते म्हणजे काय?** हा प्रश्न देवरुखच्या खेड्यातील महिलांनी स्वत:हून विचारलेला नव्हता मी विचारलं असं होऊ शकतं का तर अगदी दोघी–तिघींनीच मान हलवली. एका मोठ्या फळ्यावर दोन्ही खुब्याच्या हाडात असलेले गर्भाशयाचे चित्र काढले आणि पिशवी कशी अलगद स्नायू बंधांनी वर उचलून धरलेली असते ते दाखवले. स्त्रीची पिशवी केवळ तिच्या मुठीएव्हडी असते गर्भारपणात अडीच-तीन किलोचं बाळ,गर्भ जल, वार, नाळ असं चार-साडेचार किलोचं वजन ती आपल्या एवढ्याशा गर्भाशयात वागवते त्यामुळे ते गर्भाशयाचे स्नायू, स्नायुबंध हे सर्व ताणलं जातं. त्याबरोबरच बाळंतपणाच्या वेळी गर्भाशयाचे ताणले गेलेले स्नायू प्रचंड ताकदीनं, पूर्ण वाढलेलं एवढं मोठं बाळ दोन इंच रुंदीच्या योनीमार्गातून बाहेर ढकलतं. त्यामुळे गर्भाशयाचे स्नायू आणि स्नायू बंध,पोटाचे स्नायू व योनीमार्गाचे स्नायू सैल पडतात आणि अशक्त बनतात. **म्हणूनच बाळंतिणीला आराम आणि पोषक आहाराची गरज असते. त्याबरोबरच पोटांचे सैल थुलथुलीत झालेल्या स्नायूंना पूर्ववत होण्यासाठी आधाराची गरज असते. म्हणूनच बाळंतिणीने पोटपट्टा ( Abdominal Belt) बांधला पाहिजे, म्हणजे गर्भाशय, योनीमार्ग यांचा ताण कमी होऊन वर पूर्वपदावर उचलले जाण्यास मदत होईल.**

काहीवेळा पोषक आहाराच्या किंवा विश्रांतीच्या व व्यायामाच्या अभावाने योनीमार्ग सैल होऊन योनीमार्गाची भिंत खाली योनी मार्गात ढासळते आणि महिला जेव्हा उठते-बसते तेव्हा योनी मार्गातून पादल्यासारखा आवाज येतो. असं होऊ नये म्हणून काहीच करता येणार नाही का? अर्थात करता येऊ शकेल, ज्याला 'केगल' व्यायाम म्हणतात. प्रत्येक महिला जी बाळंत होते तिला हे व्यायाम प्रकार शिकवले गेले पाहिजेत हे अवघड नाहीत. पाठीवर झोपून पाय गुडघ्यात वाकवून घ्यावेत, काही सेकंद मायांग वर ओढून घ्यावे. पुन्हा सोडावे व पुन्हा ओढून घ्यावे.

● दोन मांड्यांमध्ये मोठा रबरी बॉल घेऊन मांड्यांनी दाबणे व सोडणे

हे आणखी दोन प्रकारे करता येते-

● ओटीपोट आत ओढून घेणे,

● कुले आवळून धरणे

हे दोन प्रकार महिला बसल्या बसल्या किंवा उभ्याने पण करू शकतात.

सगळ्याच महिलांना हे व्यायाम प्रकार सांगितले गेले पाहिजेत आणि करता आले पाहिजेत.

पोटपट्टा न बांधल्याने पोटाचे स्नायू आकुंचन पावत नाहीत गर्भाशयाचे अशक्त स्नायुबंध, ॲनिमिया व पोषण कमी पडून सैलच राहतात अशा वेळेला गर्भपिशवी योनीमार्गातून खाली उतरते. कधी नुसतीच थोडी खाली उतरते, पुढच्या पायरीत योनीमार्गाच्या तोंडाशी येते म्हणजे चांगले ४-५ इंच खाली. पुढे ती योनीमार्गाबाहेर येते आणि नंतर तर संपूर्ण पिशवी योनीद्वारातून

बाहेरच असते. सुरुवातीच्या दोन stage वर उतरलेली पिशवी हे पोटाचे व्यायाम, पोटपट्टा, योग्य पोषण आणि विश्रांती यांनी पूर्वस्थितीत जाऊ शकते नंतरचे नाही. त्याला ऑपरेशनच करावे लागते. देवरुखच्या तीनही आरोग्य शिक्षण शिबिरात दोन किंवा तीन महिला बाळंतपणानंतर योनीतून उठता बसता आवाज येतो असे म्हणाल्या आणि दोन महिला गर्भपिशवी योनीबाहेर आली आहे काय करायचे. त्यातली एक तर शेत मजूर होती तिचा दहा वर्षाचा मुलगा होता आणि घरात दुसरं कमावणारं नाही आणि ऑपरेशनला रत्नागिरीला जायचं कमीतकमी दहा दिवस लागणार सरकारी हॉस्पिटल म्हणजे. ती इतकी धाय मोकलून रडू लागली की विचारू नका. पण एक चांगलं झालं की एक NGO संस्था पुढे होऊन मदतीला आली.

**Abdominal belt किंवा पोटपट्ट्याचे महत्त्व महिलेला माहीत नसतं शिवाय सीझरने बाळंतपण झाले तर महिलेला आणि घरच्या लोकांना वाटते की पोटपट्टा बांधायचा नसतो. हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. आधी पोटपट्ट्याचा उपयोग काय आहे हे पाहा, गरोदरपणात ओटीपोटाच्या सैल झालेल्या स्नायूंना आधाराची गरज असते. पोटपट्टा ते सैल झालेले स्नायूना आधार देते व उचलून धरते आणि यामुळे अशक्त झालेले स्नायू सशक्त होतात.**

सीझर होते तेव्हा तर पोटाच्या स्नायूंना कापलेले असते, गरोदरपणात ताणले गेलेल्या स्नायूंना त्यामुळे जास्तच अशक्तपणा येतो, जास्त आधाराची गरज भासते. **टाके सुकून आल्यावर दोन-तीन आठवड्यांत पोटपट्टा बांधायला सुरुवात करता येतो. साधारण सीझर नंतर वीसएक दिवसांनंतर पोटपट्टा बांधला तर उलट अशक्त स्नायूंना आधार मिळतो.**

**एक नेहमी ऐकलेलं नाव म्हणजे फाब्रोईड :** या एक प्रकारे सामान्यपणे गर्भाशयात होणाऱ्या गाठी आहेत. ४०% महिलांमध्ये वयाच्या ३० वर्षांनंतर या गाठी सामान्यपणे दिसून येतात. परंतु गाठी असलेल्या ८०% महिलांना काहीच तक्रार नसते, लक्षणे नसतात. त्यामुळे उपचारांची गरज नसते. त्याचे वेगवेगळे प्रकार आहेत, गर्भाशयात ते कुठल्या भागात झालेत आणि त्यांचा आकार केवढा आहे यावरून लक्षणे कोणती असतील हे ठरते. तुम्हाला माहीतच आहे की महिलेच्या गर्भाशयाचे स्नायू अत्यंत जाड, चिवट आणि लवचीक असतात. गर्भाशयाला अंतरावरण असते मध्ये जाड स्नायू आणि बाह्य आवरण असते. अंतर आवरणाला लागून अगदी आकाराने लहानसं मटाराच्या दाण्याएवढं फायाब्रोईड असेल तरीही भरपूर रक्तस्राव होतो आणि असा फायाब्रोईड काढून टाकावा लागतो. परंतु तेच जर स्नायूमध्ये असेल तर रक्तस्राव कमी पण प्रेशरने पोटात दुखणे, जडपणा जाणवणे होते. परंतु बाहेरचे आवरण खाली असेल तर विशेष लक्षणे जाणवत नाहीत. सुरुवातीला होर्मोन्सच्या गोळ्या, इंजेक्शने, वेदनाशामके वगैरे घेता येतात. रक्तस्राव कमी होत नसेल किंवा फायाब्रोईडचा आकार मोठा झाला असेल त्याचे प्रेशर, किवा त्यामुळे लघवी संडासला अडथळा होत असेल तर मात्र, पिशवीचे ऑपरेशन करून फायाब्रोईड किंवा पिशवीच काढून टाकतात. का ही वेळा संपूर्ण गर्भाशयाच फायाब्रोईडस ने भरून जाते अश्या वेळीहि एक-एक ऑपरेशन न करता पिशवी काढली जाते.

फायाब्रोईडने वंध्यत्व येते का? येतेच असे नाही. पण अलीकडे मुलं होण्याचं वय थोडं पुढं जात आहे, महिलेचे वय वाढेल तसं फायाब्रोईड होण्याचं प्रमाणही वाढतं, गर्भाशयाची पोकळी अरुंद असते तिथे फायाब्रोईड बसला तर तिथे गर्भ बसायला जागा उरत नाही, त्या अर्थी वंध्यत्व येतं.

**PCOD किंवा PCOS म्हणजे काय?**

अलीकडे हे नवीन शब्द सामान्य होत चालले आहेत. मुली-महिलांना दोन अंडाशये (Ovaries) असतात ही अंडाशये स्त्री हार्मोन निर्माण करतात आणि किंचित पुरुष हार्मोन निर्माण करतात. सामान्यपणे महिन्याला चारपाच अपरिपक्व अंडी निर्माण झाली तरी एक तरी परिपक्व अंडे निर्माण होतेच. कचरा अन्नपदार्थ खाल्ल्याने वजन वाढते. मुरूम मोठ्या प्रमाणावर येतात. अपरिपक्व अंड्यांची संख्या वाढते आणि पुरुष हार्मोन वाढतात या स्थितीला PCOD म्हणतात. त्याबरोबरच अंडाशयात सीस्ट म्हणजे पोकळ किंवा द्रव भरलेल्या गाठी निर्माण होतात, पाळीच्या वेळी वेदना होतात, यामुळे वंध्यत्व येण्याची शक्यता वाढते. परंतु याला उपचार आहे.

PCOS हा जास्त तीव्र आजार आहे. शरीरातील हार्मोनचे असंतुलन होऊन मोठ्या प्रमाणत पुरुष हार्मोन निर्माण होते, त्यामुळे वजन वाढते, पुरुष प्रकारचे टक्कल दिसते. अंडाशयातून केवळ अपरिपक्व अंडीच निर्माण होतात. थोड्याच दिवसात अंडाशय पूर्णपणे सिस्ट (पोकळ गाठ) बनते. यामध्ये वंध्यत्व कायमचे असते. उपचार जास्त नाहीत.

हे आहेत काही महिलांचे मायांगाचे आजार !

**निगा राखू, स्वच्छता पाळू, आपल्या शरीराचा ताबा घेऊ, जाणून घेऊ, आवश्यक उपचार करू आणि एकमेका साहाय्य करू.**

❖❖❖

# 'नर्स' परिचारिका

■ प्रमिला भगत कांबळे, वाशी
मो. ९८१९७१६८४१



जागतिक आरोग्यासाठी समर्पित रुग्ण परिचारिका शारीरिक आरोग्याशी आणि इस्पितळाशी संबंधित नर्सिंग, नर्स आणि सिस्टर हे शब्द आपल्याला परिचित आहेत. नर्स आणि नर्सिंगचा इतिहास हा सुद्धा स्त्री जातीच्या इतिहासाइतकाच जुना आहे. नर्सिंग हा शब्द, लॅटिन 'न्युट्रायर'(Nutrive) म्हणजे 'पालनपोषण' करणे. ह्या शब्दापासून आला तर नर्स या शब्दाचा संबंध मूळ लॅटिन शब्द. 'न्युट्रिक्स' Nutrix म्हणजे माता नर्स (Nursing Mother) दुसऱ्याच्या बालकांना स्तनपान करणारी महिला तेराव्या शतकातील प्रचलित Norrice, Nurice or Nourice या इंग्रजी शब्दाच्या स्पेलिंग मध्ये हळूहळू बदल होत जाऊन आताच Nurse हा शब्द प्रचलित झाला. रुग्णांची सेवा करण्याकडे कल असणाऱ्या आणि रुग्णांच्या उपचारात डॉक्टर्सच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या या नर्सेसना प्रशिक्षण देण्याची संकल्पना १९व्या शतकात पुढे आली. ती कृतीत उतरवण्यात फ्लोरेन्स नाईटिंगेल या महिलेचा सहभाग अतिशय महत्वाचा मानला जातो.

पूर्वी स्त्रीरूपी नर्स फक्त आपल्या परिवाराची काळजी घेत असे. कालांतराने नर्सेसच्या कर्तव्याच्या सीमा वाढत गेल्या. आपल्या कुटुंबाबरोबर आपल्या जमातीतील रुग्ण, वयस्क, अपंग यांची पण काळजी घ्यायला लागल्या. कुठलीही महिला ही निसर्गदेवतेने स्वभावत:च घडवलेली नर्स आहे. ह्या नर्सरूपी महिलांना संरक्षण नव्हतेच. पण शिक्षणही नव्हते. त्यांची एखादी संघटना पण नव्हती. त्यामुळे चाकरमान्याप्रमाणे आज्ञापालन करत एका 'नर्सचे' काम करत राहिल्या प्रशिक्षित नर्स हे आताचे संशोधन आहे.

सिस्टर असा जनमानसात वापरला जाणारा शब्द एक कौटुंबिक जीव्हाळ्यात आणि बहिणीचं नातं दर्शवतो म्हणून ही रुग्ण परिचारिका आदरणीय आहेत. आरोग्य समस्याबाबतीत रुग्णाचा जीव वाचवणाऱ्या डॉक्टरला आपण 'देव' मानतो आणि ते योग्यही आहे. दवाखान्यात येणाऱ्या रुग्णाच्या आरोग्याची चिकित्सा, योग्य निदान, औषध योजना प्रसंगी शस्त्रक्रिया आणि यामुळे रुग्णाला होणारा आरोग्यलाभ ह्यात डॉक्टरांची जीवनदात्याची भूमिका महत्त्वाची तर असतेच पण, त्यामागे असणारी सेवाभावी 'सपोर्ट सिस्टीम' म्हणजे रुग्णपरिचारिका ह्यांची भूमिकाही विसरून चालणार नाही. तसं म्हटलं तर डॉक्टर इस्पितळात दाखल झालेल्या पेशंटच्या सहवासात एखादा तासच असतो. पण परिचारिका मात्र उरलेले तेवीस तास सावली सारखी पेशंटबरोबर राहून त्याची सेवा शुश्रूषा करत असते. रुग्णाला पूर्णपणे बरा करण्याचे श्रेय जसे डॉक्टरला जाते तसेच परिचारिकांना पण श्रेय द्यावयास हवे. डॉक्टरांना आपण 'देव' मानत असू तर रुग्ण परिचारिका 'एंजल' म्हणजे देवता आहेत.

पूर्वी रुग्ण परिचारिकांचा गणवेश पांढरा शुभ्र होता. आता निरनिराळ्या हॉस्पिटलनी आपल्या सोईनुसार गणवेशाचा रंग बदलला आहे, पण कुठल्याही परिस्थितीत न डगमगणारा धीरगंभीर स्वभाव डॉक्टरांच्या अनुपस्थितीत स्वतंत्रपणे योग्य निर्णय घेण्याची क्षमता रुग्णाच्या उपचारातील चिकाटी, रुग्णांसाठीची करुणा व दयाळू वृत्ती, रुग्णसेवेत अथक परिश्रम, समर्पणाची भावना, जीव रक्षणाची संवेदना, रुग्णाच्या राष्ट्रीयत्व जात, धर्म या बाबतीत सापत्नभाव कधीच बदलत नाही. हेच परिचारिकांचे व्यक्तिविशेष पर्सनॅलिटी.

२०२० चे वर्ष आणि २०२१ हे वर्ष, कोविड नावाच्या साथीच्या रोगामुळे डॉक्टर्स, नर्सेस आणि सेवा दल यांची परीक्षा

घेणारेच ठरले. युनिफॉर्म त्यावर स्वसंरक्षणासाठी घातलेल्या पी. पी. किट, हातमोजे घालून रुग्णांची सेवा करणे खूपच कष्टदायक. तरीसुद्धा आपले सेवाव्रत चालू ठेवले. नर्सेस, डॉक्टर्स यांनी आपल्या कुटुंबीयांपासून दूर राहून हॉस्पिटलमध्ये आपल्या सेवेचा वसा चालू ठेवला. दिवसरात्र ड्युटी केली. कोविडच्या रोगाची लागण होण्याची टांगती तलवार डोक्यावर असताना स्वत:ला सांभाळत तना-मनाने रुग्णांची देखभाल केली. काळजी घेऊनही डॉक्टर्स, नर्सेस आरोग्य सेवा दल यांना लागण झाली. तरी आपले आरोग्यरक्षक रुग्णसेवेचे कर्तव्य करीत राहिले. आपल्यातल्या मित्र-मैत्रिणींच्या जवळचे आप्तस्वकीय यांना कोविडची लागण झाल्याने जगाचा निरोप घ्यावा लागला. आपले दुर्दैव असे की, अंत्यदर्शनसुद्धा दुर्लभ झाले. अंत्यविधीपण करता आले नाहीत. मुलांना पोरके करून आई वडिलांना जगाचा निरोप घ्यावा लागला. आपण सर्वच धास्तावलेल्या मन:स्थितीत जगत होतो, पण डॉक्टर, नर्सेस आरोग्य सेवा दल स्थितप्रज्ञ राहून रुग्णांची देखभाल करीत होते. जीवाची बाजी लावून कोविडने ग्रासलेल्या रुग्णांची सेवा करीत होते. असो हळूहळू परिस्थिती निवळत गेली. जणू जीवन सुरळीत होत आहे. डॉक्टर्स त्यांना मदत करणाऱ्या नर्सेस, आरोग्य सेवा दल यांचे ऋण तर आपण कधीच विसरू शकणार नाही. आता तर पुरुष वर्गशी नर्सिंग क्षेत्रात उतरून हॉस्पिटलमध्ये ब्रदर बनून सेवा देत आहेत.

हे झाले नागरिक जीवन आता आपण रुग्णसेवेचे आपले कर्तव्य सीमा विभागातील हॉस्पिटलमध्ये बजावणाऱ्या परिचारिका नर्सेसविषयी जाणून घेऊया. आपले फौजी जवान कुटुंबीयांपासून दूर राहून देशाची संरक्षणाची जबाबदारी संभाळतात. सीमारेषेवर थंडी, वारा यांची पर्वा न करता पहारा देतात तसेच, इस्पितळात युद्धात जखमी झालेल्या किंवा आजारी जवानांच्या तब्येतीची काळजी पण बहिणीच्या मायेने-डॉक्टरांच्या साथीने नर्सेसच घेतात त्याही आपले घर-दार आप्तइष्टांना हजारो मैल दूर सोडून आलेल्या असतात. त्यांच्या चेहऱ्यावर विरहाचे दु:ख दिसू न देता हसतमुखाने फौजी जवानांचे दु:ख हलके करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना देशाच्या संरक्षणासाठी 'फायटिंग फिट' ठेवतात. या सिस्टर-नर्स-परिचारिकाच. जसे सीमा क्षेत्रातील फौजी जवान, पोलीस दल, डॉक्टर्स, आरोग्य सेवा दल यांच्या आपल्यावर असलेल्या उपकाराची परतफेड कधीच होऊ शकणार नाही. तशीच परिचारिका - नर्सेस यांच्यातही उपकाराची जाण आम्हाला नक्कीच आहे. जागतिक आरोग्यासाठी वचनबद्ध रुग्ण परिचारिकाच बालकांना जन्म देण्यासाठी आणि संगोपनात मदत करणाऱ्या सुईणीचं आणि इतर प्रशिक्षित आरोग्य सेवकांच जाळं निर्माण करणाऱ्या 'फ्लोरेन्स नाइटिंगेल' यांना सर्व श्रेय आहे. LADY WITH THE LAMP असेही त्यांना म्हटले जाते. कारण हातात लँप घेऊन जखमी जवानांना रात्रीसुद्धा मदत करीत असत.


'फ्लोरेन्स नाइटिंगेल' या आरोग्य देवतेचे १२ मे (जन्मदिवस) आणि १३ ऑगस्ट (निर्वाण दिवस) ह्या दिवशी आपण स्मरण चिंतन करूया. आतापर्यंत होऊन गेलेल्या आणि आता सेवेत असलेल्या समस्त रुग्णंपरिचारिका समूहास मानवंदना देऊन कृतज्ञता व्यक्त करूया. यासाठी दोन शब्द लिहिण्याचा माझा प्रयत्न.

❖❖❖

# भावपूर्ण श्रद्धांजली



''**सत्यशोधक**'' चळवळीत कार्यकर्ते म्हणून वयाच्या १८व्या वर्षी दाखल होऊन, शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्व केलेल्या, रयतशिक्षण संस्था अंधश्रद्धा निर्मूलन समिती, परिवर्तनवादी चळवळीचे मार्गदर्शक व नेते **कॉ. एन. डी. पाटील** यांचे नुकतेच निधन झाले. अन्नपूर्णा परिवार व 'संवाद'च्या संपादक मंडळातर्फे आम्ही त्याना विनम्र श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.



युवक क्रांती दलाचे संस्थापक, साप्ताहिक साधनाचे संपादक **'मुक्तांगण'** या व्यसनमुक्ती संस्थेचे संस्थापक **''रिर्पोताज''** ही नवी शैली मराठी पत्रकारितेत रुजविणारे **डॉ. अनिल अवचट** याचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. अन्नपूर्णा परिवारातर्फे व 'संवाद'च्या संपादक मंडळातर्फे आम्ही डॉ. अनिल अवचट यांना आदरांजली वहात आहोत.

# स्त्रियांवरील अत्याचार व त्यावरील उपाय

■ सौ. स्मिता वाजेकर, वाशी
मो. ९८१९९५१७४५

४ जानेवारीला रात्री अकरा वाजता मला माझ्या विद्यार्थ्यांनी संदेश पाठवला की, सिंधुताई सपकाळ गेल्या. मला एकदम आठवण झाली. आमच्या शाळेच्या स्नेहसंमेलनात त्यांना प्रमुख पाहुण्या म्हणून बोलावले होते. तेव्हा त्यांनी दिलेले भाषण ह्दयाला चिरून जात होते. सिंधुताई सपकाळ ह्या स्वत: स्त्रीवरच्या अत्याचारांची एक जिवंत कहाणी होती. एक स्त्री काय करू शकते याचे एक जिवंत उदाहरण म्हणजे पद्‌मश्री सिंधुताई सपकाळ!! शिक्षणाची आवड असूनही एक स्त्री म्हणून शिक्षणापासून वंचित, वयाच्या दहाव्या वर्षी पस्तीस वर्षाच्या पुरुषाबरोबर लग्न, १८ व्या वर्षापर्यंत तीन बाळंतपणे, दारूड्या नवरा, सासू-सासरे, नवऱ्याने निव्वळ संशयावरून त्या गरोदर असताना, त्यांना घराबाहेर काढले. कुठे जाणार? अशा स्त्रियांना जीव देण्याशिवाय पर्याय नसतो. त्याही जीव द्यायला गेल्या होत्या. परंतु पोटाला बाळाचा विचार त्यांच्या मनामध्ये आला, आणि त्यांनी परिस्थितीशी लढावयाचे ठरवले. त्यांच्या सारख्या असंख्य स्त्रियांचे जीवन त्यांच्या डोळ्यासमोर आले. आपल्या मुलीबरोबर अनेक अनाथ मुलांचे जीवन वाचवण्याचे त्यांनी ठरवले आणि खरेच आपल्या अथक परिश्रमाने हजारो अनाथ मुलांच्या अंगावर त्यांनी ममतेची पांघर घालून, घडवून त्या अनाथांची माय झाल्या. सिंधुताईंना जे एक स्त्री म्हणून जे भोगायला लागले, तेच आपल्या देशातील अनेक स्त्रियांना आजही भोगावे लागले आहे, लागत आहे.

आपण नेहमी लक्ष्मी, विद्येची देवता सरस्वती, असुरांचा नाश करणारी कालिमाता, ह्या देवतांचे पूजन करतो. आपल्या संस्कृतीत तिचेच रुप असलेल्या स्त्रीला देवी म्हणतो. ती आदिमाता आहे. तिच्यामुळे मानवाचा वंश पुढे वाढतो. तरीही, तिच्यावरच फार पुरातन काळापासून आजपर्यंत अत्याचार होत आले आहेत. तिची विटंबना होत आहे. किती हा विरोधाभास!

पुरातन काळातल्या सीता, द्रौपदीसारख्या स्त्रीया सुद्धा यातून सुटलेल्या नाहीत. स्त्रियांना धार्मिक कायद्याचा आधार घेऊन, रुढी परंपरांच्या जोखंडाने बांधून त्यांचा छळ केला जातो. त्यांच्यावर विविध प्रकारचे अत्याचार केले जातात. खरे तर आजची स्त्री पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रांत खांद्याला खांदा लावून काम करत आहेत, ती कोणत्याच बाबतीत पुरुषांपेक्षा कमी नाही. तरीही ती आजही वेदनेचे, दु:खाचे आक्रंदन करत आहे. ती आई, बहीण, मुलगी, मावशी, आत्या, आजी अशा अनेक भूमिका बजावत असते. घरातील सर्व कामे, मुलांचे संगोपन, नातीगोती सांभाळून नोकरीही करते. तिच्यामध्ये प्रचंड ऊर्जा आहे.

फार पूर्वीपासून स्त्रियांच्या या विषम परिस्थितीतही मैत्री, गार्गी, शकुंतला देवी, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, डॉ. आनंदीबाई जोशी, अलीकडच्या काळात कल्पना चावला, इंदिरा गांधी, किरण बेदी आणि सुनीता विल्यम या दोघींनी तर अवकाशात झेप घेतली. उपग्रह प्रक्षेपण केंद्र इस्त्रो येथेसुद्धा

कितीतरी महिला कार्यरत आहेत. अशा अनेक महिलांनी यशाची उत्तुंग शिखरे पादाक्रांत करून आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे.

फार पूर्वीपासून स्त्रियांना दुय्यम दर्जा दिल्यामुळे, स्त्री-पुरुष विषमता निर्माण झाली. त्या वेळी सती जाणे, बालविवाह, केशवपन, शिक्षणापासून वंचित ठेवणे, अशा कित्येक अत्याचाराने त्या ग्रासलेल्या होत्या. त्या वेळी इंग्रजांनी पुढाकार घेऊन त्यातील काही प्रथा बंद केल्या. राजा राममोहन रॉय यांनी सतीची चाल बंद केली. महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले, आगरकर अशा अनेक समाज सुधारकांनी स्त्रियांना शिक्षणाची द्वारे खुली केली. त्या बोलक्या झाल्या. लिहित्या झाल्या. अनेक लेखिका, कवयित्री यांनी त्यांच्या लिखाणात स्त्रियांच्या अत्याचारांचा जागर केला. त्यांचे दु:ख, भावना, वेदना चव्हाट्यावर आणल्या. त्यांच्या अत्याचाराला वाचा फोडली. कवयित्री हिरा बनसोडे म्हणतात, ''बाईचे आयुष्य म्हणजे छिद्रे पडलेली जखमांची घागरच आहे.'' तिच्यावर सतत शारीरिक, मानसिक, भावनिक, लैंगिक अत्याचार होत असतात. तिच्यावर अत्याचार करणारा तिचा स्वत:चा फक्त नवराच नसून बाप, सासरा, भाऊ तर क्वचित प्रसंगी कधी तिचा मुलगाही असतो. पुरातन काळापासून स्त्री आणि पुरुषांसाठी वेगवेगळी मापदंड आहेत जे स्त्री-पुरुष समानतेला तडा देतात. पुरुषांची स्त्रीकडे पाहण्याची भेदभाव दृष्टी अत्याचाराला जन्म देते. पुरुषांची मानसिकता आणि नैतिकता स्त्री अत्याचाराचे प्रमुख कारण आहे.

जन्मापासून मृत्यूपर्यंत तिचे जीवन असुरक्षित असते. मुलगी हे परक्याचे धन, तिला हुंडा द्यावा लागेल, तिच्या शिक्षणाचा खर्च येईल, यासाठी तिचा जन्मच नाकारला जातो. त्यातूनच मोठ्या प्रमाणात भ्रूणहत्या वाढल्या आहेत. गर्भलिंग चाचणीवर बंदी असूनही, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार तसेच महाराष्ट्रमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात भ्रूणहत्या होत आहेत. २०११ च्या जनगणनेत महाराष्ट्रात दर हजार पुरुषांमागे ८८३ स्त्रियांचे प्रमाण आहे. पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार या राज्यांत तर मुलांना लग्नासाठी मुलगी मिळणेसुद्धा कठीण झाले आहे. ह्या सामाजिक समस्येमुळे बलात्काराचं प्रमाणही वाढत आहे. महिलांची दोन कार्यक्षेत्रे आहेत. एक म्हणजे तिचं कुटुंब व दुसरे म्हणजे ती जिथे नोकरी करते ते कार्यक्षेत्र. या दोन्ही ठिकाणी तिच्यावर मोठ्या प्रमाणावर अत्याचार होत असतात.

कौटुंबिक स्तरावर मोठ्या प्रमाणात स्त्रियांना शारीरिक, मानसिक,भावनिक अत्याचाराला सामोरे जावे लागते. अत्याचाराची महत्त्वाची कारणे प्रामुख्याने बहुतेक वेळा मुलीचे वय कमी असणे, शिक्षणाचा अभाव किंवा किंवा कमी शिक्षण, एकत्र कुटुंबाचा रामरगडा, हुंडा बंदी कायदा असून ही, लग्नानंतर तिच्या माहेरच्या माणसांकडे पैशाची सतत मागणी करणे. पैसे नाही दिले, तर तिला मारझोड करणे, मुलगा झाला नाही तर तिला सतत टोचून बोलणे, लैंगिक समाधान न होणे तसेच काही शुल्लक कारणे उदाहरणार्थ, जेवणात मीठ, मसाला कमी जास्त होणे. यावरूनसुद्धा तिला मारहाण केली जाते. कधी कधी एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीवर अत्याचार करते. तिला मुलगा होत नाही, आपल्या वंशाला दीपक नाही, म्हणून तिच्यावर सारखी बाळंतपणे लादली जातात. तसेच मुलांचे संगोपन सासूने करणे, अशा अनेक भावनिक, मानसिक व लैंगिक अत्याचाराला स्त्रियांना सामोरे जावे लागते. या अत्याचारांना कंटाळून त्या आत्महत्येस प्रवृत्त होतात. स्वत:ला रॉकेल ओतून जाळून घेणे, गळफास लावून आत्महत्या करणे, तर कधी त्या विहीर जवळ करतात. बऱ्याच स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र नसल्यामुळे, त्यांना त्यांच्या गरजेच्या वस्तूंसाठीही पैसे मिळत नाहीत. कधी कधी त्या स्वत: काम करत असल्या तरी, त्यांचे स्वत:चे पैसेही त्यांना वापरायला मिळत नाहीत. त्यांची आर्थिक कोंडी केली जाते. आता शासनाने मुलींना शिक्षण घेण्यासाठी अनेक सवलती उपलब्ध केलेल्या आहेत. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मुलींसाठी मोफत केले आहे. त्यामुळे बहुतेक मुली आता शिकू लागल्या आहेत. आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराविरोधात त्या दाद मागत आहेत. धर्माने लादलेल्या रूढीं परंपरेच्या कायद्यातून त्या मुक्त होऊ पाहत आहेत. परंतु त्यांना समजावून घेतलं जात नाही आणि त्याचीच परिणीती म्हणजे, आज मोठ्या प्रमाणात घटस्फोट होत आहेत.

स्त्रियांना कौटुंबिक अत्याचारापासून संरक्षण मिळण्यासाठी शासनाने काही कायदे केले आहेत. त्यामध्ये महत्त्वाचा कायदा म्हणजे कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा. घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ साली पास झाला आणि २६ ऑक्टोबर २००६ ला तो लागू करण्यात आला. घराच्या चार भिंतीमध्ये महिलांना सुरक्षित वाटावे, हे या कायद्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. या कायद्यानुसार स्त्रिया घरात बसूनसुद्धा अत्याचार करणाऱ्यावर पोलीस केस करू शकतात. लोक काय म्हणतील? याची काळजी न करता, त्या महिलेने पुढे येऊन पोलीस ठाण्यात, तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराची तक्रार नोंदवणे आवश्यक आहे. स्त्रिया आपली तक्रार तीन ठिकाणी नोंदवू शकतात. प्रोटेक्शन ऑफिसर, एनजीओ आणि सर्व्हिस प्रोव्हाडयर. शिक्षणाचा अभाव, अर्थार्जनाची संधी नसणे. मुलींचे वय कमी असणे. कुटुंबातील वरिष्ठ व्यक्तींचा दबाव असणे, जातीपातीची तटबंदी त्यामुळे शेजारचा, समाजाचा आधार नसणे.

यामुळे स्त्रियांची कुचंबणा होते. त्यामुळे बऱ्याचशा तक्रारी नोंदवल्याच जात नाहीत. यासाठी स्त्रियांनी न घाबरता पुढे यायला पाहिजे. महिलांसाठी पोलीस स्टेशनला एक महिला प्रोटेक्शन ऑफिसर नेमलेली आहे. तिथे तुमची तक्रार नोंदवा. तीन महिन्यांच्या आत तुमच्या तक्रारीचे निवारण होईल. अत्याचार करणाऱ्याला योग्य शिक्षा मिळेल. काही पुरुष संवेदनशील असतात. ते स्त्रियांवरील अत्याचाराच्या विरुद्ध असतात. त्यांना त्याबद्दल चीड येते. त्यांनी याबद्दल जर आवाज उठवला आणि पीडित महिलेला जर पाठिंबा दिला तर त्या नक्की पुढे येऊन पोलिसात तक्रार नोंदवू शकतील. ज्या महिला सुशिक्षित, सक्षम आहेत, त्यांनीसुद्धा पुढाकार घेऊन पीडित महिलेला गुन्हा नोंदवायला मदत केली तर, तिला पाठबळ मिळेल. अशा महिलांनी, पुरुषांनी एकत्र येऊन शाळा, कॉलेज आणि उद्यानांमध्ये त्यांच्या व्याख्यानाद्वारे स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांबद्दल मुलींना, स्त्रियांना जागृत केले पाहिजे व त्यावर उपाय म्हणून स्त्रियांना संरक्षणासाठी सरकारने केलेल्या कायद्याचे ज्ञान दिले तर, अधिकाधिक माहिती महिलांपर्यंत पोहचेल. व त्यायोगे स्त्रिया न घाबरता पोलीस ठाण्यात आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराविरोधात तक्रार दाखल करण्यास प्रवृत्त होतील.

महिलांचे दुसरे वावरण्याचे क्षेत्र म्हणजे तिच्या कामाचे स्थळ. जेव्हा महिला घराबाहेर पडते, तेव्हा ती सुरक्षित नसते. बस, ट्रेन, बसस्टॉप, रेल्वे स्टेशन किंवा एखादी अडचणीची जागा पाहून स्त्रियांवर अत्याचार, बलात्कार केले जातात. यामध्ये एक वर्षाच्या मुलीपासून ते सत्तर वर्षाच्या वयावरील महिलेवरसुद्धा बलात्कार केले जातात. बऱ्याचशा कळ्या उमलण्याअगोदरच खुडल्या जातात. तिच्या काम करण्याच्या कार्यालयात, कार्यालयातील अधिकारी, तिच्याकडे सरळ शरीरसुखाची मागणी करून, तिला प्रमोशनचे आमिष दाखवतात. तिने जर नकार दिला, तर तिला टार्गेट केले जाते. तिला त्रास होईल असे कार्यालयीन वातावरण निर्माण केले जाते. कित्येक गुन्हे भीतीने, समाजात काय बोलेल? किंवा लज्जेने नोंदले जात नाहीत.

बलात्काराचे प्रमाण कमी व्हावे, म्हणून २०१३ साली लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा पास झाला. तरीसुद्धा बलात्काराचे प्रमाण वाढतच आहे. बरेचसे बलात्कारी पोलिसात तक्रार न नोंदवल्यामुळे ते सुटले जातात. ज्यांना पकडले जाते, त्यांच्याबद्दल निकाल लागायला एवढा वेळ होतो की त्या गुन्ह्याचे गांभीर्य कमी होते. तसेच गुन्हा करणारा मुलगा अल्पवयीन असला, जसे (निर्भयाच्या बाबतीत झाले तसे) तर त्याला माफ केले जाते. त्याच्या शिक्षेत सूट दिली जाते किंवा त्याला बालसुधारगृहात पाठवले जाते. असे गुन्हा करणाऱ्यांवर अधिकाधिक शिक्षा झाल्या पाहिजेत आणि त्यांचे निकाल वेळीच लावले जात नाहीत. बलात्कार झालेली स्त्री पार कोलमडून गेलेली असते. अशा वेळी तिच्या नवऱ्याने, सासू-सासऱ्यांनी, आई-वडिलांनी आणि समाजाने तिचा तिरस्कार न करता तिला मानसिक बळ द्यायला हवे, नाहीतर त्या आत्महत्येस प्रवृत्त होतात. बलात्कारित मुलगी म्हणून अशा मुलींबरोबर मुले लग्न करायलाही तयार होत नाहीत. अशा मुलींबरोबर लग्न करण्यासाठी मुलांनी पुढे येणे गरजेचे आहे. त्याचबरोबर शमाजाने तिच्याकडे पाहण्याची दृष्टीही बदलली पाहिजे. तिला समुपदेशन केंद्रांमध्ये नेले पाहिजे किंवा त्या मुलीने स्वत: जाऊन समुपदेशन घेतले पाहिजे. ज्यायोगे तिला मानसिक स्वास्थ्य लाभेल. व तिचे आयुष्य ती पूर्वीसारखे जगेल. यामध्ये स्त्री मुक्ती संघटना ने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. या संघटना पीडित महिलेला समुपदेशन करतात. त्यांना धीर देतात, बळ देतात. त्यांना गुन्हा नोंदविण्यासाठी पाठबळ देतात. जमल्यास आर्थिक साहाय्यही मिळून देतात. आपल्या राज्यात शासनानेसुद्धा समुपदेशनाची ९० केंद्रे उभारली आहेत.

काही स्त्रियांमध्येही दोष असतो. स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा अर्थ म्हणजे स्वैराचार किंवा अधिकार असा अर्धवट अर्थ त्या घेतात. स्त्री ही एक शक्ती आहे. तिने विवेकाने वागायला पाहिजे. बऱ्याच वेळेला तरुण मुलींना त्याच्या तोकड्या कपड्यांबद्दल बोलले जाते. पिक्चर, टीव्हीवरच्या मालिका पाहून त्या कपड्याची फॅशन करतात. तुम्ही ज्या समाजात वावरत असता, त्या समाजाला ते कधी मान्य नसते. तिच्याकडे बघण्याचा पुरुषांच्या दृष्टिकोन बदलतो. तिला टार्गेट केले जाते. मग तुम्ही म्हणाल पाश्चिमात्य देशामध्ये असे का होत नाही? कारण तिथल्या संस्कृतीत स्त्रियांना असे कपडे घातले ते नेहमीच पाहतात. त्यामुळे त्यांच्या लैंगिक भावना चेतावल्या जात नाहीत. या उलट आपल्या देशात, समाजात शंभर मुलींमध्ये एखादी मुलगी असे कपडे घालते. तुम्ही कोणत्याही फॅशनचे कपडे घाला. पण तुमची देहबोली महत्त्वाची. तुमची देहबोली तुमचे व्यक्तिमत्त्व दर्शविते.

हल्ली शाळा, महाविद्यालयात प्रेमप्रकरणे फारच वाढली आहेत. बऱ्याचदा हे प्रेम नसून निव्वळ शारीरिक आकर्षण असते. चौपाटी, उद्याने, निवांत जागा प्रेमीयुगलांनी भरलेल्या असतात. खेड्यातल्या मुली शिक्षणासाठी शहरात येतात आणि ग्लॅमरच्या दुनियेत हरवून जातात. शेवटी आकर्षणाला बळी पडून लग्नाअगोदर शारीरिक संबंध आल्यामुळे फसल्या जातात. लीव्ह जिहादच्या नावाखाली आज कितीतरी मुली फसवल्या जात आहेत. ही एक आजची वस्तुस्थिती

आहे. तेव्हा मुलींनी डोळे उघडे ठेवून प्रेम करावे. व्हॉटस्ॲप, फेसबुक चॅटिंग यांच्या चुकीच्या वापरण्याने अनेक मुली फसवल्या गेल्या आहेत. त्यांना ब्लॅक मेलिंग करून फसविले जाते. म्हणून या तंत्रज्ञानाचा वापर करताना मुलींनी भान ठेवणे आवश्यक आहे.

महिलांचे वाढत्या अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी निर्भया योजना सुरू केली. ग्रामीण भागातील महिलांना ही योजना जेव्हा कळेल, तेव्हा पुरुषांचे अत्याचार कमी होतील. या योजनेद्वारे पीडित महिलेला मदत आणि समुपदेशन देण्यात येईल.

मनोधैर्य योजना - बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला आणि बालकांना अर्थसाहाय्य व पुनर्वसन करण्यासाठी मनोधैर्य योजना राज्य मंत्रिमंडळाने मंजूर केली असून या योजनेची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात २ ऑक्टोबर २०१३ पासून सुरू झाली. या योजनेअंतर्गत पीडितांना किमान २ लाख ते ३ लाखपर्यंत आर्थिक मदत दिली जाते. या योजनेअंतर्गत ५० टक्के तरतूद केंद्र शासन व ५० टक्के राज्य शासनाची आहे. पीडित महिलांना मदतीसाठी शासनाने अनेक उपाययोजना केलेल्या आहेत.

महिलांना अत्याचार रोखण्यासाठी त्वरित मदत हवी असेल तर क्रमांक १०० व क्रमांक १०९०, १०९१ वर संपर्क साधा, तुम्हाला पोलिसांकडून लगेचच मदतीचा हात मिळेल व शासनाच्या महिला अत्याचार रोखण्यासाठी ज्या अनेक योजना सरकार राबवत आहे, त्यांचीही माहिती घ्या. तुम्हाला त्वरित मदत मिळेल.

शासनाने स्त्रियांच्या संरक्षणासाठी अनेक उपाय करूनही, आजही मोठ्या प्रमाणात स्त्रियांना अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी महिलांनी सक्षम, सशक्त व संयमी बनून या विरुद्ध दंड थोपटले पाहिजेत. म्हणजे या रावणांना आधुनिक सीतेकडे पाहण्याची हिंमत होणार नाही. पोलीस प्रशासना बरोबर खरी गरज आहे ती समाजाची मानसिकता बदलण्याची. कातडे पांघरून घेणारे समाजमन जागे केले पाहिजे. महिलांनी शिक्षण घेणे आवश्यक आहे. तसेच सरकारने, जे स्त्रियांच्या संरक्षणासाठी कायदे काढलेले आहेत, त्यांचे ज्ञान सर्व मुली व महिलांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर शाळा, कॉलेजमध्ये महिला पोलीस अधिकाऱ्यांनी व्याख्यान देऊन, महिलांच्या सुरक्षेसाठी असणाऱ्या कायद्याची माहिती दिली पाहिजे. महिलांनी आपल्या मैत्रिणींना, आपले सार्वजनिक जीवन, आपल्यावर होत असणाऱ्या अत्याचाराच्या गोष्टीबद्दल बोलले पाहिजे. तसेच आई, आजीने जाणीवपूर्वक मुलींना शिक्षण देणे गरजेचे आहे. समानतेच्या विचाराचे बाळकडू देण्याची सुरुवात सर्वप्रथम समाजाचा प्राथमिक घटक कुटुंबापासून व्हायला हवी. मुलांना, घरातल्या स्त्रियांचा किंवा बाहेरील स्त्रियांचा आदर राखण्याचे संस्कारसुद्धा द्यायला पाहिजे. स्त्रियांवरचे अत्याचार टाळायचे असेल तर, स्त्री-पुरुष समानतेने शिवाय पर्याय नाही. पुरुषांची व समाजाचीही मानसिकता बदलली तरच स्त्रियांवरचे अत्याचार नक्कीच कमी होतील.

डॉक्टर आनंदीबाई जोशी म्हणतात, ''स्त्री पुरुषांनी आपापले रक्षण करावे आणि एकमेकांवर निर्वाहाकरता किंवा कोणत्याच गोष्टींकरता अवलंबून राहू नये, म्हणजे मग घरातील भांडणे आणि समाजाची हीनतेची स्थिती नाहीशी होईल.'' वरील उद्‌गार सामाजिक बदलासाठी मार्गदर्शक आहेत.

❖❖❖

## भावपूर्ण श्रद्धांजली



१९६०च्या दशकापासून मराठी चित्रपट सृष्टीत प्रवेश केलेले ख्यातनाम सिनेनट, सिनेनिर्माते, सिने दिग्दर्शक, हिंदी चित्रपटसृष्टी सुद्धा गाजविणारे तसेच मराठी नाट्य सृष्टीतील आपला अभिनयाचा ठसा उमटविणारे **श्री. रमेश देव** यांचे नुकतेच निधन झाले.

अन्नपूर्णा परिवार व 'संवाद'च्या संपादक मंडळातर्फे रमेश देव यांना आम्ही आदरांजली वहात आहोत.

# एक आई म्हणून मला कसा समाज हवा आहे?

■ **वासंती प्रसाद ताठे, उपाध्यक्ष**
**पर्वती स्वयंविकास सह. संस्था. मर्या. पुणे.**

आजकाल सोशल मीडियामुळे मदर्स डे, फादर्स डे, फॅमिली डे असे काही भन्नाट दिवस साजरे करण्याचं खूळ सध्या सगळ्यांच्याच डोक्यात भरलं आहे. अर्थात मीही त्याला अपवाद नाहीये, पण सगळ्यांनी आपलं स्टेट्स अपडेट केलं की जरा उत्साह येतो आणि आपणही काहीतरी करावं असं वाटायला लागतं. त्यातूनच मग आई-वडिलांबद्दल किती आणि काय काय लिहावं अगदी असं होतं. बरोबर ना ? मला खात्री आहे हा लेख वाचणाऱ्यांपैकी अनेकांच्या मनात असेच काहीतरी विचार असतील. पण आपल्या मुलांनी पालक म्हणून आपल्या बद्दलच्या भावना एखाद्या विशिष्ट दिवशी व्यक्त कराव्यात ही कल्पना वजा अपेक्षा आपण बाळगत असू तर एक 'आई'म्हणून समाजाकडूनही काही अपेक्षा ठेवता येतील का?

आपलं मूल इतर प्रत्येक मुलापेक्षा वेगळं असावं, प्रगतिशील असावं असं प्रत्येक पालकांना आणि विशेषत: आईला वाटत असतं. अभ्यासात पहिला नंबर घेणारं, विविध कलागुणांनी युक्त वगैरे वगैरे आणि मूल दहावी-बारावीत गेलं की मग काय विचारूच नये. मेरिटमध्येच यायला हवं म्हणून पहिल्या दिवसापासूनच उपदेशांचे डोस सुरूच. आता हे सगळं का तर माझं मूल या स्पर्धेमध्ये मागे पडले तर ''लोक काय म्हणतील'' या धडकीनेच अपेक्षांचं ओझं मुलांवर लादायचं. पण मुलांकडून अतिअपेक्षा करताना मुलाच्या अपेक्षा आपल्याकडून काय आहेत, समाजाकडून काय आहेत, त्यांना काय आवडेल, काय करायला जमेल याचा विचार किती पालक करतात? ज्या समाजात आपण वावरतो तो समाज म्हणजे मुलांसाठी एक 'पाठशाळा' आहे असे समाजशास्त्र सांगते. मग मुलांसाठी शाळा निवडताना पालक जितके जागरूक असतात तितकीच जागरुकता समाजाप्रति असायला काय हरकत आहे. आपल्या आजू बाजूला जे लोक वावरतात मग आपले मित्र-मैत्रिणी, नातेवाईक, शेजारी या सर्व घटकांकडून मूल शिकत असते. किंबहुना आपले पालक या सर्व घटकांशी कसे वागतात ह्याचेही निरीक्षण मुले करतात आणि तशीच घडतात. त्यामुळे समाजातील या आणि तत्सम अनेक घटकांमध्ये विचारक्षम परिवर्तन व्हायला हवे आहे.

आपल्या समाजामध्ये आजही 'नकोशी' म्हणून जन्माला आलेल्या मुलीला नाहीसे करणारे पालक आहेत. मुलगी म्हणजे बापाच्या डोक्यावर लग्नाचं ओझं अशी मानसिकता आजही बाळगणारी अनेक कुटुंबं आपल्या आजूबाजूला पाहायला मिळतील. ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. आंतरजातीय विवाह करण्याचे परिणाम थेट जिवावर बेतणारे आहेत हा धडा संबंधित पालकांनीच घालून दिला, अशी कितीतरी उदाहरणे देता येतील समाजाच्या अनियंत्रित विचारांची आणि त्यातून होणाऱ्या वर्तनाची. अशा वर्तणुकीतून मुलांनी नेमका काय बोध घ्यावा? मग ज्या समाजासाठी आपण मुलांच्या मनाची कुचंबणा करतो तेव्हा अशी अघोरी कृत्य करताना कुठे जाते या समाजाचे सौजन्य?

याच्या आणखी थोडे पुढे जाऊन विचार करता, मुलांमध्ये सामाजिक प्रश्नांची जाण यायची असेल तर ‘समाजभान’ हा विचार मुलांच्या मनातही रुजवायला हवा आहे. सामाजिकतेचे बाळकडू मुलांना बालपणापासूनच मिळायला हवे आहे. पण आजकालच्या चौकोनी कुटुंबामध्ये ‘आपले आपण’ ही भावना मुलांना लहानपणापासूनच समाजभान येऊ देत नाही. परिणामी समाजात किंवा आपल्या आजूबाजूला चालणाऱ्या अनेक घटक-घटनांपासून मुले वंचित राहतात. ही जबाबदारी समाजातील प्रत्येक घटकाची असल्याने मुलांमध्ये कौटुंबिक एकोप्याची जाणीव वाढीस लागल्यास समाजभान आपोआपच येईल. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पूर्वीच्या काळी अतिशय प्रख्यात असणारी एकत्र कुटुंब पद्धती होय. दहापासून ते अगदी पन्नास जणांचं कुटुंब ही त्या कुटुंबात वाढणाऱ्या मुलांसाठी एक ‘सामाजिक शाळा’च होतीच. एकमेकांची काळजी वजा जबाबदारी घेणे, प्रत्येकाने कामं वाटून घेणं, वृद्ध आजाऱ्यांची सेवा करणे, सामाईक आर्थिक व्यवहार, सामाईक व्यवसाय अशा कितीतरी गोष्टी मुलांना वेगळ्या शिकवण्याची गरजच नव्हती. सर्वसाधारणपणे १९ व्या शतकात जी पिढी घडून गेली तिथपर्यंतच सामाजिक सामिलकी ही संकल्पना अस्तित्वात होती. २०व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच ही सामिलकी शहरीकरण, औद्योगीकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या विळख्यात हरवून गेली. पैसा हा, माणूस आणि नात्यापेक्षा मोठा झाला. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपण मोठी मजल मारली पण संस्कारक्षम पिढी घडवण्यात मात्र अविकसित राहिलो. मोबाइल, टीव्ही, इंटरनेटमधून अपरिमित माहिती उपलब्ध झाली पण खऱ्या अर्थाने ज्ञानार्जन होईल अशा शाळा आणि असे थोर शिक्षक मिळणे दुर्मीळ झाले. ही आणि अशी अनेक उदाहरणं देता येतील मुलांमध्ये रुजणाऱ्या माणुसकीच्या अभावाची. या सगळ्यांचा मेळ साधायचा असेल तांत्रिक साधनांनी जवळ असलेले नातेसंबंध ‘अ-भावनिक’ आहेत हे मुलांना पटवून द्यावे लागेल. ही सर्व तांत्रिक माध्यमे ही भौतिक प्रगतीची साधने असून ते अंतिम साध्य नाही याची जाण मुलांना असणे आवश्यक आहे आणि यामध्ये पालकांचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आजच्या स्पर्धेच्या युगात मुलांवर अभ्यासाचा अपरिमित ताण असून पुस्तकी ज्ञानातून मिळणाऱ्या गुणांकांच्या आधारावर पालक मुलांचे भवितव्य ठरवितात. यामध्ये मुलांमधील सुप्त गुणांना वाव देणाऱ्या संधी उपलब्ध नसल्याने कमी गुण मिळणे ही बाब मुलांना बरेचदा नैराश्याकडे घेऊन जाते. अर्थात ही बाब कुटुंबाच्या तथाकथित प्रतिष्ठेला गालबोट लावणारी असल्याने मुलांवरचा दबाव आणखीनच वाढवला जातो. अर्थात काही पालक याला अपवाद असतीलही, पण उर्वरीत पालकांनी मात्र अल्बर्ट आईनस्टाईन, सचिन तेंडुलकर, आमीर खान, बॉक्सिंग वूमन मेरी कोम या आणि अशा कितीतरी यशस्वी व्यक्तिमत्त्वांची उदाहरणे विचारात घ्यावीत. जे आपल्या शालेय जीवनात प्रगती करू शकले नाहीत पण आपापल्या क्षेत्रात मात्र कमालीचे यशस्वी झाले आणि नुसतेच यशस्वी नाही तर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप संपूर्ण जगावर पाडण्यातही यशस्वी झाले. पालकांनी मुलांचे हे अंगभूत गुण जर वेळीच ओळखले आणि त्यांना योग्य विचारांचे खतपाणी देत स्वत:ला सिद्ध करण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या तर आपल्या देशाचे भवितव्य घडवणारी एक पिढी ही ‘क्रियाशील’ पिढी म्हणून नक्कीच पुढे येऊ शकेल. या सगळ्यांचा मेळ साधायचा असेल तर ‘मूल्याधारित आणि कृती शिक्षणाची’ पद्धतीचा अवलंबली गेली पाहिजे. याकरिता मूल्यशिक्षण आणि इतर विषय हे पुस्तकी न राहता कृतीवर आधारित असणे आवश्यक आहे. शाळेच्या रेकॉर्डवर मुलांना जात धर्माचा उल्लेख करायला लावणारी शिक्षण व्यवस्था जाऊन बाबासाहेबांनी आपल्या देशाला दिलेल्या संविधानाचा मतितार्थ सांगणारी शिक्षणपद्धती उदयास आली तर आरक्षणाचा मुद्दा पुसला जाऊन प्रत्येक कामासाठी पात्र उमेदवार तयार होतील.

एक आई म्हणून समाजाकडून असणाऱ्या अपेक्षांची यादी न संपणारी असली तरी पालक म्हणूनही मुलांच्या प्रति असणारी जबाबदारी आणि कर्तव्ये आपल्याला नाकारता येणार नाहीत. मुलांच्या प्रति पालकांच्या अपेक्षा काय आहेत हे पाहत असताना मुलांना काय हवे आहे आणि त्यांच्या काय अपेक्षा आहेत हेही तितकेच महत्त्वाचे आहे. मुलांनी स्वत:च्या मनात रेखाटलेली पालकांची प्रतिमा जेव्हा प्रत्येक पालकांना स्पष्ट दिसेल तेव्हा खऱ्या अर्थाने आपल्या मुलांसमोर एक आदर्श शिक्षक आणि एका आदर्श समाज उभा राहील.

शेवटी काय... कुटुंब हीच मुलांची पहिली शाळा आणि पालक हेच त्यांचे पहिले ‘आदर्श शिक्षक’ !!

❖❖❖

## कथा

# सौदा तनामनाशी

■ **लीला शहा**

विसावं सरत आहे. हेच वय आहे कमाईचं. फार तर अजून दहा-पंधरा वर्षं कमावता येईल. शरीर, सौंदर्य, तारुण्य गमावताना पैसे कमावता येतील. निर्लज्ज व्हायला हवं. बेछूट पण. नजरेचे खेळ अजून शिकायला हवेत. काय झालं आपलं! काय होतो आपण! ना घर ना दार. एकदम दचकायला झालं एका खेडेगावातल्या दोन कोंदट खोल्या. त्यासाठी एक कायम बाळंतिणीची. तीन मुलींवर चौथा मुलगा होणारच. खात्री होती पण मुलगीच झाली. दीड-दोन वर्षांच्या अंतराने मुली नि खोली, अजून आठवतं सगळं. दोन-चार फाटक्या घोंगड्या लाऊन केलेला आडोसा. तिथून येणारा उद, शेपा, बावडिंग, जळाल्याचा वास. मुलींचं किर किर रडणे, मी दहा वर्षांची. मध्ये  दोन गर्भपात पण. ही मुलं रडकी, अपुरी वाढ झालेली पोट नगारा झालेली. पायाच्या-हाताच्या काटक्या. सारखं खा खा करणारी आई सोशीक. बापाने बाहेर बाई ठेवलेली महिन्यातून दोन-तीन वेळाच घरी. तरी हे लेंढार. दिवसभर मलाही राब राब राबायला लागायचं पोराचं हगणं, मुतणं बघायच. बाळंतिणीचं बघायचं. कामाने जीव बेजारून गेला की धुरामुळे डोळ्यात पाणी आलं असं भासवायचं. पुन्हा कामाला जुंपायचं.  कुटणं भांडी धुणी करायचं, मुलं आवरायची, त्यांना भरवायचं बाप कधी येईल आणि अंगावर वसकरून ओरडेल या धाका खाली गुदमरायचं.

असल्या बापावर आई खरंच प्रेम करते का? मधून मधून तो आला की ती हरकते कशी? का कधी कधी येतो ना? याचच तिला अप्रूप वाटतं!मला समजू लागलं (म्हणजे तेरावं लागलं) तेव्हा आईचाच राग यायला लागला. हिला त्याचा राग कसा येत नाही. का त्याच्या पुढे पुढे करते! खरं तर त्याला लाथ मारून घराबाहेर पडावं तिने असं वाटायचं.

एके दिवशी समोरच्या घरात मुंबईचा पाव्हणा आला. तरुण, देखणा सुगठित, डोळ्याला डोळे भिडले. खाणाखुणा झाल्या. येता जाता सहज मारल्यासारखा धक्का मारला. सारं शरीर थरारलं. कागदाचा बोळा घरासमोर टाकला. रात्री बोळाच्या तोंडाशी भेट लिहिलेला. मी गेले. प्रचंड ओढ. सर्वांग पुलाकित हातात हात घेतले. गरम उबदार, उत्सुक पुन्हा काही भेटी. शपथा, वचनं घरातले सगळे कष्ट, अडचणी, दु:ख विसरलेच. पाय जमिनीला टेकेनासे झाले. डोळ्याहून, स्पर्शातून तो हृदयात उतरला. किती स्वप्नं त्याने दाखवली. ती सगळी खरी वाटली अन् एके दिवशी रात्री त्याच्याबरोबर पळून या शहरात आली. आई  भावंडं, वडील सर्वांचा विसर पडला. प्रेम फक्त प्रेम - आराम, छान बंगला रोज कधी हॉटेल, कधी सिनेमा, नाटक, चौपाटी. लवकरच लग्न करून अशी आश्वासन. संसारात इतकं सुख असतं? मी कधी बघितलंच नव्हतं! बरं झालं त्या अंधाऱ्या कुबट, ओशट खोल्याहून पळाले.

एके दिवशी त्या बंगल्यासमोर एक काळी, चमकदार कार उभी राहिली. माझा प्रियकर धावत बाहेर गेला. त्यांच्या बॅगा वगैरे उचलल्या नम्रपणे काय हवं, काय नको त्यांना विचारू लागला.

मी याची बहीण आहे असं सांगितलं. म्हणाला हिचं लग्न जुळवायला उद्याच तिला सासरी पाठवतोय. सगळं ठरलय दोनच दिवसांपूर्वी इथे आणलंय मी थक्क होऊन ऐकत होते पण काही बोलता आलं नाही. वाचाच बसली दोन दिवसांनी माळ्याला सांगून

(हो ते बंगल्याचे मालक होते. काही दिवस बाहेर गावी गेले होते.) मला त्याने बाहेर नेलं. एका माणसाकडे सोपवलं. म्हणाला उद्या येतो. मालकाला खोटं सांगितलं कारण बिनालग्नाचे आपण ह्यांच्या घरी राहिलो म्हणून रागात आले असते. मी त्यांचा नोकर आहे. पण मी तुझ्याशीच लग्न करीन. घाबरू नकोस! असे बाजूला घेऊन तो म्हणाला आणि... तो कधीच परत आला नाही.

ज्या माणसाकडे मला सोपवलं तो म्हणाला तुला काही त्रास होणार नाही. मात्र इथे रहायचं तर माझे ऐकावं लागेल. कुणी इथे आलं तर त्याचं हसून स्वागत करायला हवं. पळून जायचा प्रयत्न केलास तर. तर माझ्याशी गाठ. दुसरे दिवशी तो बाहेर गेला आणि एक जाडजूड ढेरपोट्या, तोंडावर बरेच कोड. म्हणाला, घाबरू नकोस. तुला मी सुखात ठेवीन. बोलताना तोंडाचा गुटख्याचा वास आणि मग माझी परवड सुरू झाली वेळी-अवेळी तो येत असे - देहाचं ओरबाडणं सुरू झालं.

तो कुलूप लाऊन जात असे. एवढं मोठं शहरं खिडकीतून बाहेर बघावं तर मोटारी, बसेस, रेल्वेचे भोंगे, शाळेत जाणारी मुलं - त्यांचे आई–वडील - संध्याकाळी हातात हात घालून फिरायला जाणारे नवरा-बायको - काय झालं आपलं ! काय करत असतील भावंडं? आई कशी असेल? खूप रडायला यायचं पण मग मनात एक सौदा मांडला. त्या कुरूप माणसाशी खूप प्रेमाने वागू लागले त्याच्यावर प्रेम करतेय असं भासवू लागले. पण बाहेर जाऊ दे. मी खूप कंटाळलंय असं म्हणू लागले. प्रेमाने दारू पाजू लागले. अधून मधून त्याच्या कडून पैसे मागून घेऊ लागले. कधी नकळत काढून घेऊ लागले आणि एकदा पळून गेले. एका चाळीत भाड्याने खोली घेतली - खोली कसली झोपडी म्हटले मिळेल ते काम करून पैसे मिळवू मग कुणाच्या तरी मदतीने गावी जाऊ.

ओळखी झाल्या, कामकरी बायांनी एक-दोन काम मिळवून दिली. पण भागेना. पोट भरेना. तरणं ताठं शरीर अर्धपोटी राहू शकेना. जिकडे बघावं तिकडे बुभुक्षित नजरा. अंगाला, देहाला उसणाऱ्या वाटायचं बाई ठेवलेला बाप. पोटासाठी तरी काही रक्कम द्यायचा. मन उदास व्हायचं. स्वप्नातला राजकुमार कधीच हरवला होता. हे उष्टं शरीर कुणाला चालणार आहे? मग आता त्याचा सौदा सुरू केला तर!

थोडा अनुभव गाठीशी होता. थोडं शिक्षणही–सातवीपर्यंतच आणि डोकं लढवण्याच कसब. पैसे तर मिळवायलाच हवेत. अंगाला फिट्ट बसणारे कपडे उधार शिवून घेतले. तसे घालून वेगवेगळ्या स्टेशनवर बाहेर थोडं दूर उभं रहायचं. सहज उभं राहिल्यासारखं हळूच पापण्या उघडून एखादा चेहरा न्याहाळायचा सावज शोधणारा चेहरा ओळखू यायचा - गणित जुळायचं. त्याच्या बरोबर जायचं कधी टॅक्सी, कधी चालत, कधी एखाद्या हॉटेलात - खायचं, प्यायचं आणि तरी विसंगत, गोड, दया यावी असे बोलायचं. राकट मिठीत चिरडून घ्यायचं - एखादी लांबट नोट पर्समध्ये कोंबून परतायचं.

दिवस महिने - वर्षे - काळ पुढे सरकतोय आणि कुठल्या तोंडाने जाऊ? खूप पैसे मिळवून जाऊ व मग सगळे गुन्हे माफ.

एक बऱ्यापैकी जागा घेतली. झोपडीतून खोलीत आले. मग वाटलं या घरात कुणीतरी यावं. आपण त्याला वाढाव, भरवावं मांडी वर डोकं घेऊन त्याला राधून वाढावं, मग अंथरूण टाकावं - त्यांच्या पासून एखादं मूल होऊ व्हावं - घर आवरावं, भांडी रचावी. त्याला ऑफिसमध्ये जाताना ‘टाटा’ करावा - दुपारच्या वेळी लोकरीचे लहान मोजे विणत बसावं. पोटावर हात फिरवीत पण तसं काहीच घडलं नाही.

तसं एकावर खरं खुरं प्रेम केलं. अनेकदा उष्ट झालेल्या शरीराने शिल्या देहाने. पण मनात ताजी स्वप्नं, नवी सुगंधी स्वप्न. त्यांनंही वचनं दिले. सुगंधी स्वप्न दोघांनी रंगवली. रात्री रंगवल्या.

सर्वस्व अर्पण केलं. मनापासून पण पुन्हा प्रतारणा. त्याचं लग्न झालेलं होतं. संताप, चीड, वेदना सर्वांगाचा भडका झाला. उसनीही अपेक्षा न करता तिने खरंखुरं प्रेम केलं होतं. पण शेवटी आपण उष्ट्याच की? पुरुष उष्टा होत नाही का? तेच देह. त्याच क्रिया... मनाला समजावलं - हे असंच आहे युगायुगापासून आपण दुय्यम गरजेपुरते. शांत झाली. भावनांची राख सावडूनही पुन्हा उभी राहिली. मात्र लग्न या कल्पनेची मातीच झाली. आता कुणी लग्न करेल, लग्न करावं असही वाटत नाही, लग्न म्हणजे तरी काय? एकत्र माणसांशी त्याने कितीही छळलं - त्रास दिला तरी जन्मभर प्रामाणिक रहायचं. त्याला देह कुस्करून द्यायचा. सकाळी क्रिया तीच.

अजून कुणाला घरात बोलवायला नको वाटलं घर पवित्र रहावं असं वाटले. मी पवित्र नसलेलं घर पवित्र कसे राहणार! पण मी अपवित्र का? मी कुणाला फसवलं नाही. कुणाला दुःख दिलं नाही कुणाचे संसार उधळले नाहीत. गरजूंच्या गरजा भागवल्या - मीच फसवली गेले तरी कुणाला दोष दिला नाही.

तरीही ‘घर’घरच असावं वाटतं. परंपरेने इतकं दडपलंय की घरात ‘धंदा’ नको वाटतो. त्यामुळे मीच बाहेर जाते. बस स्टॉपवर निष्कारण थांबते. बसची वाट बघतेय किंवा कुणा मैत्रिणीची वाट बघतेय असा भाव आणि एखाद्या सार्वजनिक बागेत. तिथेही उघड्यावर चाळे सुरू असतात. ते दिसतं ते आवडत नाही पण वाटतं कितीतरी लोकांच्या लहान जागा असतात एकांत मिळत नाही. घरात अनेक लोक असतात. काय करतील बिचारे! किंवा कुणी अवैधही वागत असेल! जाऊ दे आपल्याला काय करायचंय! नाव ठेवण्याचा आपल्याला अधिकार आहे का?

मी कधी गेटवे ऑफ इंडिया तर कधी रेल्वे स्टेशन बाहेर, कधी रिक्षा स्टँड, उद्या टॅक्सी स्टँड, कधी सिनेमा थिएटर बाहेर नकळत इशारे करत, कधी वाट बघत. कधी कधी गणित चुकतं. कुणीतरी तिरसकारपणे थुंकतो, पराभवही पत्करावा लागतो. मासा गळात सापडत नाही. मग येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांकडे बेफिकीर बघायचं. एखादी गाडी क्षणभर थांबते प्रश्नांकित - लिफ्ट? विचारलं जातं हो - यस, दुरूनच. पुढचं दारच उघडलं जातं. नाही मी मागे बसेन. उगीच म्हणायचं. नजरानजर होते. येणार का? पापण्या झुकवायच्या, होकारार्थी - गणित जुळतं. एखाद्या हॉटेलतली खोली. बेरीज वजाबाकी - काही नाही. द्याचं आणि करायचं बाकी शून्य हातावर कधी तीन शून्य असलेला कागद - मनात मात्र अनेक शून्यं. शरमेची, काळजीची, भविष्याची.

कधी कधी दिवस वांझोटा जातो. मग रात्रीला जवळ करावं लागतं. मरीन ड्राईव्ह – समुद्राकडे तोंड करून उदास बसायचं किंवा रुमालाने डोळे पुसायचे. डोळे समुद्राकडे पण पाठीला डोळे फुटतात. कान चाहूल घेऊ लागतात. तास–दोन तास जातात. नैराश्य घेऊन राहते. खोलीचे भाडं, लाईट बिल, कपड्याची शिलाई - उधार शिवलेले पैसे द्याचं. गर्दी कमी होते, भिकारी, कुष्ठरोगी, कोणी पोरके, गर्दुले यांना घरच मिळाले नाही असे, एक हातगाडीवाला गाडीवरच एक कपडा टाकून झोपतो. अकरा वाजून गेलेत. कुणाच्या तरी लक्षात येतं. क्यूं बहेन घर जानेका नाही? बहेना! एकदम हृदयात कळ उठले. कुणीतरी बहेन म्हणणारं आहे ह्या जगात. भाऊ बहीण हे नातं जुळवून एकत्र राहता येणार नाही? निरपेक्ष देहातील प्रेम करणारे कुणी तरी आहे - डोळे पाणावतात. बहेन म्हणणाऱ्याकडे वळून बघते आणि तापल्या तव्यावर पाण्याचा थेंब जळून जावा तस होतं. त्यांची वासना दग्ध नजर त्याचे चाळे - बहेन या पवित्र नात्याची किती विटंबना! त्याच्या. थोंबडावर थुंकावे वाटतं. तो वाट बघणाऱ्या विखारी नजरेने पाहत असतो. आमंत्रण देत असतो. वाटतं पळून जावं किंवा समुद्रात उडी मारून संपावं - पण जीवनाचा मोह - जगण्याची आस किती तीव्र असते. सर्व भावनांवर मात करणारी असं हळवं होऊन कसं चालेल! हेच वय आहे कमाईचं बहेन म्हणो वा पोरी म्हणो - भविष्य पुढे उभं राहतं. मग त्याच्याकडे खिन्न नजरेने बघते. त्याच्या डोळ्यात पेटलेला अंगार भाजून काढतो. कपडे बऱ्यापैकी चकचकीत बूट, हातात चमकणारं घड्याळ, हिऱ्याची अंगठी. तो जवळ बसतो. हातात हात घेतो. घर में कौन नही क्या तुम्हारा!

''हा नही - सब गाव में छोडकर आई हू - फस गयी हूं!'' हातातला हात दाबत तो म्हणतो मै भी अकेला हूँ - चलो आती क्या! उठते. नाईलाज. जीवन म्हणजे नाईलाज आहे असं कित्येकदा वाटून गेलेलं. पण मनात सौदा सुरू होतो. गिऱ्हाईक मालदार दिसतंय थकवा आलेला असतो पण यंत्रवत उठते. टॅक्सी भरधाव निघते. तो तिला कवळत असतो - काही तरी बडबडत असतो. त्यांच्या खांद्यावर हळुवार मान ठेवण्याचं नाटक. मांसल बोट रुतली तरी प्रतिसाद द्यायचा बऱ्यापैकी पॉज. ''इथे राहू यात?''

''चालेल.'' खरेंतर सुंदर पलंग - बेटा - व्हिस्की रम - मी पीत नाही. सगळी रात्र देहाचा चुरा काही नोटा - कभी मिलोगी - इधरही आओंगी? मै नौकरी करती हूं - ग्यारा से सात ऑफिस रहता है! - आपण कुणीतरी उच्चभ्रू असल्याचं नाटक. सकाळी उठून - जरा उशिराच कपडे सावरत निघते. घरात जाताना कुणी बघत नाही ना? बघत बघत चोरट्यासारखं घरात शिरते. पण तेवढ्यात पानवाला तिल बघून पचकन थुंकतो.

थकलेलं गलितगात्र शरीर कॉटवर झोकून द्यावं वाटतं. पण पोटात आग पडलेली असते. शरीरातही. मी पीत नाही, म्हणाले तरी तो बळजबरीने पाजतो. ग्लानी आल्यासारखं वाटतं. - कधी तरी आपले त्याच्यासाठी शेवगाठी आणि एक शिळं सफरचंद चवहीन पोटाची - खळगी भरायला काहीही चालतं. अगदी शेणसुद्धा आपण खातोच की. सगळं अंग ठणकत असतं. तरीही ती पर्समधल्या नोटा मोजते घरातील शिल्लक मोजते - आणि विसावं संपतंय. अजून दहा-बारा वर्ष कशी काढायची? कुणीतरी भला माणूस भेटेल सिनेमात भेटतात तसे. उदार, नवविचार करणारे! तिला मग एकदम आईची आठवण होते. सहा वर्षे गेली. कशी असेल आई? लिवत असेल की? कसे तिला भेटायचं तिला रडायला येतं. पण इतकी थकलीय की आ? पण बाहेर पडत नाहीत. मग मुकं दुःख व मुकामार लागल्यासारखं शरीर ती अंथरुणात फेकते. अर्धवट जाग अर्धवट झोप तिला दिसू लागतं. तिला वाटायला लागतं आपण घर सोडून पाळालीत. त्या सुंदर तरुणाचा मोह झाला की हे दुःख दारिद्र्य दूर करायला? चुकलं का आपलं काय झालं आपलं. गावी जाऊ शकू का? तिकडे आपला स्वीकार करतील का? पुन्हा त्याच उकिरड्यात जायचं का? अजूनच हाल होत असतील का? बाप नावाचा राक्षस...

पापण्या जड होतात. तिला दिसू लागतं एक घर, एक बाग, स्वयंपाक घर, नथ घातलेली. पैठणी नेसलेली, बाजूबंद, त्या वेळी हळद लावलेली मुंडावळ्या बांधलेली, हिरवा चुडा घातलेला - माप ओलांडणारी - नवरी. डोहाळ जेवण, एका खोलीत पाळणा, पाळण्यात खिदळणारे बाळ - स्वयंपाक करणारी काढणारी ती - ''दमलीस का गं.'' म्हणत थोपटणारे हात, झोपेतच ती कन्हते. मुक्या वेदना, मुका मार सहन न होऊन, स्वप्नांचा गाव मागे ठेवून - पापण्या मिटतात.

❖❖❖

# एन. डी. पाटील एक बुलंद आवाज और सामाजिक परिवर्तन

■ **वृषाली मगदूम**

एन. डी. पाटील म्हणजे आंदोलन, चळवळ, रस्त्यावर उतरणे, उपोषण करणे, मागण्या मान्य होइपर्यंत यंत्रणाशी संघर्ष करणे हे समीकरण महाराष्ट्राच्या शेतकरी, कष्टकरी, अन्यायग्रस्त व्यक्तीच्या मनात इतके खोलवर रुजले होते की महाराष्ट्रातील कोणतेही आंदोलन एन.डी. सरांना हाक मारल्याशिवाय पार पडतच नसे. पुरोगामी चळवळीचा आधार व महाराष्ट्राच्या विवेकाचा बुलंद आवाज ही त्यांची ओळख आहे.

वयाच्या नव्वदीपर्यंत कार्यरत असणारे एन.डी.पाटील दाभोळकर, पानसरे हत्या कांडानंतर अगदी अलीकडेसुद्धा कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी आंदोलनस्थळी हजर रहात. शेवटच्या काळात व्हिलचेअरवर बसलेले एन.डी. सर कार्यकर्त्यांसाठी एक आधारस्तंभ होते. खणखणीत आवाज, लख्ख स्मरण, प्रसंग, घटना यांची तारीखवार मांडणी सारेच अचंबित करणारे होते.

शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्व शेवट पर्यंत केले. अगदी पडछडीच्या काळातही पक्ष सोडला नाही. शेवटपर्यंत पक्षाशी एकनिष्ठ राहून अखंड कार्यरत राहिले. अठरा वर्षे ते विधान परिषदेचे सदस्य होते. काही काळ विरोधी पक्षनेते होते. १९७८ ते १९८० महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री होते. त्यांची राजकीय कारकिर्दही सर्वसामान्य कष्टकरी माणसाचा कैवार येणारा विधानसभेतला एक 'बुलंद आवाज' म्हणूनच झाली. त्यावेळचे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनी गणित व विज्ञान हे दोन विषय हायर व लोअर अशा दोन दर्जेत विभागले. दोन वेगळे अभ्यासक्रम मांडणारी श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचे यामुळे अतोनात नुकसान होणार हे लक्षात आल्यानंतर एन.डी. पाटीलनी श्वेतपत्रिकेचं कुंपण रूप ही पत्रिका प्रसिद्ध केली. विधानसभेत हा प्रश्न लावून धरला व सरकारला ही श्वेतपत्रिका मागे घ्यायला लावली.

१९७२ साली इस्लामपूरमध्ये एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यासाठी एक विराट मोर्चा निघाला होता. मी एन. डी. सरांच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात दुसऱ्या वर्षाला होते. त्याच्या आठवणी आजही इस्लामपूरकर काढतात. लाठीहल्ला. गोळीबार झाला. एन. डी. ना अटक झाली. सरांचा पुतण्या गोळीबारात कामी आला. 'शेतमालाच्या किफायतशीर किमतीची कैफीयत' ही त्यांची पुस्तिका त्यावेळी घराघरातून पोहचली होती. १४ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर असा एकोणीस दिवसाचा पायी प्रवास करत ५ डिसेंबरला नागपूर अधिवेशनात पोहचले होते. ६३० किलोमीटरच्या या प्रवासात ते शेतकरी कष्टकरी व युवावर्गाला भेटून त्यांच्याशी संवाद करत होते. जाहीर सभाही त्यांनी घेतल्या.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा पितृतुल्य हात एन. डी. सरांच्या डोक्यावर होता. कर्मवीरानी आपल्या मृत्यूपूर्वी त्यांना रयत शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद केले. १९९० साली ते चेअरमन झाले. जवळजवळ ४३ वर्षे त्यानी कर्मवीरांचा शिक्षणाचा वसा पुढे नेत रयत शिक्षण संस्थेचे नेतृत्व केले. गुणवत्तेनुसार

शिक्षकांच्या नेमणुका करणे. सर्वांना समान न्याय देणे. हे सातत्याने केले. सामाजिक बांधिलकी नसणाऱ्या, बदलीची मागणी करणाऱ्या, आपल्या विषयाचा अभ्यास नसणाऱ्या आत्मकेंद्री प्राध्यापकाविषयी ते नेहमीच नाराज असायचे. संस्थेच्या विकासासाठी अविरत झटत असताना दुर्बल घटक विकासनिधी, शाहू बोर्डिंग, नापासांची शाळा, कृतज्ञता निधी असे अनेक उपक्रम केले. वैद्यकिय महाविद्यालय काढायला त्यांचा सक्त विरोध होता. मोरवाडा व इतर आदिवासी भागात त्यानी आठ आश्रमशाळा काढल्या. आदिवासी विद्यार्थी दत्तक योजना सुरू केली. कर्मवीर जयंतीला माझ्या सिडको बेस्ट टिचर पुरस्काराची रक्कम मी या आश्रमशाळेला दिली तर त्यांच्या भाषणातून त्यांनी खूप कौतुक केले होते. एन. डी. सरांची लांब पल्याची विद्वतापूर्ण. विविध विषयावरची व्याख्याने ऐकणे ही पर्वणीच असायची. शिक्षण, कर्मवीर भाऊराव पाटील. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर, म. फुले या व अशा अनेक विषयावर दोन ते अडीच तास अस्खलित, अभ्यासपूर्ण, प्रेरणादायी बोलत रहायचे. नुकतेच मोठ्या ऑपरेशनमधून बरे झालेले एन. डी. सर भाषण करत होते व मागून माई सरोजताई पाटील त्यांचा शर्ट ओढून त्यांना बसायला सांगत होत्या. पण सर आपले भाषण पूर्ण करूनच बसले. त्यांच्यातील ही ऊर्जा, मंत्रमुग्ध करणारे विचार व तो विचारपरिपूर्तीसाठी झटणारा कार्यकर्त्यांचा एक मोठा समूह त्यांच्याभोवती होता. कार्यकर्ते म्हणजे त्यांचा जीव की प्राण, त्यांच्या कार्यकर्त्यांच्या यादीत जायला मला तसा उशिरच लागला. आदीवासी आश्रमशाळेत आरोग्य शिबीर घे असे त्यानी सांगताच त्यांचा शब्द प्रमाण मानून महिन्यातून एकदा प्राचार्य बी. ए. पाटील व मी डॉक्टर्स घेवून साऱ्या आश्रमशाळात जात असू. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती याठिकाणी ते मुख्य सल्लागार होते. त्यांच्या व्याख्यानाना, पुरस्कारांना, कार्यक्रमांना हजर राहणे हा माझा नित्यक्रम होता. 'वृषाली आलीस' हा कार्यकर्त्यांच्या गराड्यातूनही आलेला त्यांचा शब्द मला कामाची ऊर्जा देवून जायचा.

सेझ, स्पेशल इकॉनॉमी झोन, तिसरी मुंबई सुरू करण्याचा घाट घातला गेला. शेतकऱ्यांच्या जमिनी मातीमोल भावाने घशात जाणार व या धनधांडग्याच्या बंगल्याच्या गेटला उभे राहण्याची नोकरी इथल्या भूमिपुत्राला करावी लागणार या विचारानेच अस्वस्थ झालेल्या एन. डी. सरांनी आक्रमक आंदोलन छेडले. प्रश्नांची सोडवणूक होईपर्यंत ठिय्या मारून बसणे ही त्यांची खासीयत होती. पेणमध्ये अनेक दिवस ते मुक्काम ठोकून होते. त्यांच्या आंदोलनात मीही एक दिवस सहभागी झाले. कार्यकर्त्यांची उठबस सरकारी यंत्रणांची लाचारी सारे पहात होते. वैशाली पाटील शेतकऱ्यांच्या कागदपत्रांची मान मोडून छाननी करत होती. सुरेखा दळवी कार्यकर्ते, यंत्रणा, शेतकरी साऱ्यांचा समन्वय करून सरांच्यापर्यंत नेत होती. माझ्यासाठी तो एक रोमांचकारी, अविस्मरणीय दिवस होता. एन. डी. सरांच्या सहवासात हत्तीचं बळ देणारी ऊर्जा मिळायची व कित्येक दिवस पुरायची. एन्रॉन वीज प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील शेतकरी उद्ध्वस्त होणार हे लक्षात येताच. त्यानी महाराष्ट्रात एक हजार सभा घेतल्या. महाराष्ट्र अक्षरशः पिंजून काढला.

संपूर्ण ताकदीनिशी या प्रकल्पाला विरोध करून राज्यकर्त्यांना हा निर्णय मागे घ्यायला लावला. महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशन हा एन. डी. सरांच्या नेतृत्वाखालील चाललेला लढा प्रदिर्घ होता. २ फेब्रु. १९९७ ला त्यानी प्राणांतिक उपोषण केले होते. दोन लाख शेतकऱ्यांचा विराट मोर्चा काढला होता. नागनाथ अण्णांच्या बरोबर ११ दिवसाचे धरणे आंदोलन मंत्रालयासमोर केले होते. साखर कारखानदाराकडून योग्य ऊसदर मिळावा म्हणूनही प्रदीर्घ लढा दिला होता. बेळगाव सीमाप्रश्नांवर १९७९ सालांपासून सीमावासियांबरोबर रहात अखंडपणे लढा दिला होता. सीमावासी यांच्या हिताचे ते विश्वस्त होते.

वाचन, चिंतन, मनन, व्यासंग प्रचंड होता. त्याना थकलेले, दमलेले मी कधीही पाहिले नाही. घरी गेले की एक तर ते कार्यकर्त्यांच्या कोडाळ्यात असायचे किंवा मराठी, इंग्रजी वर्तमानपत्राच्या गराड्यात पाहिले आहे. माई, सरोजताई पाटील शांत, सौम्य, समजूतदार, हसून सारे साजरे करणारे व्यक्तिमत्व एन. डी. सरांसारख्या वादळाला सतत सोबत असणारे व साथ करणारे व्यक्तीमत्व आहे. एन. डी. सरांच्या स्वभावात परखडपणा, रोखठोकपणा, बोलताना भिडभाड न ठेवता त्यांना योग्य वाटेल ते आक्रमकपणे व्यासपीठावरून व्यक्त करण्याचे धाडस होते. ९ मे ला रयत शिक्षणसंस्था अध्यक्ष म्हणून शरद पवार व चेअरमन म्हणून एन. डी. सरांची सरकारी यंत्रणा व त्यातील त्रुटी यावरची जुगलबंदी म्हणजे वैचारिक मेजवानीच असे.

शेतकरी, कामगार, कष्टकरी, समाजातील शोषित, वंचित घटकाच्या हक्कासाठी लढणारा विज्ञानाची कास धरून अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीला बळ देणारा, आंबेडकर अकादमीच्या माध्यमातून तरूणांची वैचारिक घडण घडण्यासाठी धडपडणारा. कार्यकर्त्यांचा आधारस्तंभ गरिबांचा पोशिंदा असा हा अविरत धडपडणारा बुलंद आवाज शांत झाला असलातरी त्यांच्या विचारांचा वसा व वारसा पुढे चालू ठेवणे हीच एन. डी. सरांना खऱ्या अर्थाने आदरांजली आहे.

❖❖❖

# कविता

## १

मी पुरुष अपूर्णांक
तू स्त्री अपूर्णांक
अपूर्णांक + अपूर्णांक = पूर्णांक
थोडक्यात काय सजीव सृष्टीतले भागीदार
तसं लैंगिक अवयववगळता शरीररचना सारखीच
पण आपल्याला घडवलं गेलं या लिंगत्वाच्या नजरेतून
पुरुष नरश्रेष्ठ आणि स्त्री कनिष्ठ
मानवी अंगालाच दुभांगलं
संस्कृतिरक्षकांनी
नकळत हे दुभंगलेपण आपण स्वीकारलं
संस्कारांच्या दबावाखाली
स्वेच्छेने बेडी गुंफून घेतली
'लक्ष्मीनारायणाचा जोडा' असे म्हणताच
आपलं अभिमानानं ऊर भरून यायचं
माझं तर जास्त, पुरुषी अहंकार.
मी माझ्या स्वार्थाकरता तुझ्या व्यक्तिमत्त्व
बदलवत गेलो
तूही निमूटपणे माझ्या सांगण्याप्रमाणे
स्वत:ला बदलवत गेली
पण तरीसुद्धा समाजाने डोळे वटारलेच
पायाची व्हाण पायात ठेवावी,
डोक्यावर घेऊन नाचू नये
असे सल्ले देण्यात विसरले नाहीत
प्रत्येक गोष्टीत मी तुला गृहीत धरले
तुझा हात खेचत खेचत
पुरुषी नशेत यशाचे शिखर चढतच गेलो
साधं मागे वळून पाहिलं नाही.
शिखरावर पोहोचलो तेव्हा
चारी बाजूस पाहिले, तोल जाण्याची भीती वाटली
आधार हवा होता तेव्हा
मागे पाहिले, तू नव्हती
आता तरी भीती वाटली.
भोवळ यायला लागली
डोळे बंद करून खाली बसलो
दुरून तुझी आश्वासक हाक कानी पडली
आवाज ऐकून धीर आला
हळूच आडवे होऊन खाली डोकावले
कोसो मैल तू दूर होती
नकळत मी खाली उतरलो
तू हळूहळू वर चढत होती
हजार पावले मी उतरल्यावर
आणि पाचशे पावले तू चढल्यावर
आधारासाठी दोघांनी हात पुढं केला
सहजीवनाचा हा हात पकडत
माणूस बनायला पहिलं पाऊल टाकलं
लक्ष्मीनारायण जोड्यापेक्षा
ज्योती सावित्रीचा जोडा बनणं
यात आम्हाला आनंद नक्कीच वाटेल.

●

## २ : असीफा

असीफा
(मला मुलगी नसली तरी)
तुझी वेदना
तुझा ठणका रक्ताळलेली योनी
आणि तुझे आक्रंदणे
तसेच तुझे वयही
त्याचप्रमाणे जन्मदात्यांचा
अस्पष्ट आणि कोरडा हुंदका
जाणवला आणि...नि:शब्द मी.

असीफा
अनेक वर्षे हेच चाललंय
गणती नाही.

अहिल्या, वृंदेपासून
निर्भया आणि तुझ्यापर्यंत...
अनेक किंकाळ्या हवेत विरल्या
आणि हुंदकाही.
नर की नराधम हा प्रश्न पडलाय
(दुर्दैवाने मीही नरच आहे. नराधमाचे रक्त माझ्यात
उतरले आहे)

असीफा
डार्विन म्हणतो,
'होमोसेपियन ते विवेकी माणूस
व्हाया आजचा माणूस
म्हणजे उत्क्रांती सुरुच'
माणसांची म्हणजेच नराची वाढ थांबली.
तो श्वापद राहिला.
मार्क्स म्हणतो,
''धर्म ही अफूची गोळी''
पण आता
श्वापद आणि अफू यांची अभद्र युती आहे.

असीफा
तू आठ वर्षाची पोर
आम्ही मात्र गृहित धरतो,
लहान आहेस
या श्वापदांनी तुझे वय गृहीत धरलं का?

असीफा
आता तुझ्या लक्षात आलं असेलच
त्यांनी
जात-धर्म-वर्ण-प्रांत वगैरे वगैरे
पाहिले नाही
पण पाहिले ते
तुझे व
त्यांचे लिंग
कारण
तुझ्यातली मादी ओळखून
दहशत माजविण्याचा
प्रयत्न केला
आणि
धर्माचा वापर केला गेला.
तुझ्या योनीतून ठिंबकणारे
दूषित रक्त पाहून
रक्तातला धर्म शोधतील
आणि ईट का जबाब फत्तर से...
न संपणारी मालिका आहे.
म्हणूनच
दोन कडव्याआधी
मी काय म्हटलं ते लक्षात आलं असेलच
''श्वापद आणि अफू यांची अभद्र युती आहे''

असीफा
हे कुठपर्यंत चालणार?
कायदे-मेणबत्त्या-निषेध
सारं फिजूल आहेत.
अगदी माझ्या कविताही
वांझोट्या.

जग बदलेल माहीत नाही
श्वापदाचा माणूस होईल सांगता येत नाही
पण
मी ठरवलं आहे
पिचलेल्या मनगटात जोर नसला तरी
हृदयात धुमसणारी आग आहे.
तुला न्याय मिळेपर्यंत
प्रत्येक निवडणुकीत
ईव्हीएममधलं शेवटचं बटण दाबून
नकारात्मक मत (नोटा) मार्फत
श्वापदांची लायकी सिद्ध करणार आहे.
आज सारे झोपलेले असतील
पण उद्याचा दिवस नक्की
न्यायाचा असेल.

असीफा
तोपर्यंत
हृदयातली ठिणगी जपून ठेवायची आहे...
●

## ३

माय,
सलाम.
जखमांना सलाम
सहनशक्तीला सलाम

माय,
आम्हाला कसलंही देणं घेणं नाही
आम्ही स्वत:च्या माय बापाची कदर केली नाही
माय बापाचे फोटो अडगळीत
स्वयंघोषित सम्राट आणि कुटुंबासहित
देवघरात विराजमान
अशा लोकांना तू माओवादी वाटणारच

माय,
तुझ्या पावलात टरारलेले फोड आणि जखम
पाहून आमचं मन कधीच पाघुळणार नाही.
महागाई भत्ता वाढला की
खिसा फुगतो आमचा
या दुनियेत तुझ्या श्रमांना स्थान नाही

माय,
जरा कान टवकारून ऐक
फटाके वाजतात ना
हुरळून जाऊ नको माय
तुमचा मोर्चा यशस्वी झाला म्हणून वाजत नाही
वाजताहेत ते, मुख्यमंत्री मोर्चा यशस्वी
हाताळला नां
आधी वाभाडे काढले आणि आश्वासन

माय,
आश्वासन कधीच पाळायचं नसतात
अशा सत्ताधाऱ्यांचा अलिखित नियम आहे

माय,
तुझ्या गावी जा.
पहिली जखमेवर मलमपट्टी कर
आणि धनुर्वाताचं इंजेक्शन घे
या कॅल्युलेटेड सामाजिक हिंस्रपणापासून
बचावण्यासाठी

माय,
एक लक्षात ठेव
ऐंशी वर्षांपूर्वी
एका महात्माने चिमूटभर मीठ उचललं आणि
कधी सूर्य न मावळणाऱ्या साम्राज्याची
सत्ता खिळखिळी झाली.

माय,
तुला सलाम
तुझ्या तळव्यातल्या जखमांनी
पिचलेल्या मनगटाच्या आता मुठी वळल्या आहेत.
आणि नपुंसक समाजातून बाहेर पडण्यासाठी
माझ्या सारख्या वेड्यांनी
हाळी दिली आहे...

●

## ४ : २६ जानेवारी : कॅमेऱ्याने न टिपलेले फोटो

एक गाव
छोटेसे
गावकुसाच्या बाहेरचे

झेंडावंदन
सलामी
आणि भाषण
गावे विकासाच्या गप्पा
त्यागाचा सल्ला
विखुरलेल्या आणि उष्टावलेल्या
थर्माकोलीन डिशेसमधून शोधताहेत
संतुलित आहार गावातील नागडी मुलं

गावकुसाबाहेरील गावात
शहरी कचरा डेपो
कचऱ्याच्या ढिगात
एका मुलीला सापडलाय
रक्ताळलेला तो नॅपकिन
आणि ती न्याहाळते
कारण त्या पीरियडपायी
शाळेतले पीरियड बंद झाले.

गावकुसाबाहेरच्या गावात
एकुलती एक शाळा
आता बंद... पटावर मुलं आणणार कुठून?
गावात जेमतेम वीस घरं
आणि घरात मुलं किती?

तरीसुद्धा पाच वर्षांतून एकदा
गावाचं भाग्य उजळतं
वीज येते, पाणी येते
रस्ताही...
दारू मटणांचा वास
पुरुषांना धोतर, बायकांना सुती साडी
नागड्या मुलांना चड्डी

वर्षानुवर्षे तसाच
गाव : गावकुसाबाहेरचा
कायम अंधारलेला
पण आता सुधारतोय...
शिक्याच्या जागी बटणं दाबावं लागतं
उमेदवार कोण हे शोधावं लागते
कारण
सगळ्या उमेदवारांचे सारखेच
चेहरे दिसायला लागले...
सध्या गोंधळाचे वातावरण आहे...

एक गाव
छोटेसे
गावकुसाच्या बाहेरचे

**शृंखला या कवळे यांच्या कविता संग्रहाच्या सौजन्याने**
कृपा निवास, भटवाडी रिस, पो. मोहोपाडा
जि. रायगड, ता. खालापूर, पिन : ४१०२२२

●

---

## बाहुली

मी बाहुली
मी तीच बाहुली
जिला तुम्ही काचा खायला देऊन मारून टाकली.
माझ्या साऊ माईला तुम्ही
शेण गोळ्यांनी माखवली
साऊ माईला तेव्हा फातिमा भेटली
आणि
पदर, बुरखा, हिजाब, घुंघट ह्यांच्या आत पहाट फटफटली.
शतकभराच्या अंतराने ही नाही शमली
तुमच्या धर्म - पुरुष सत्तेची काहिली
मलाला वर तुमची शक्ती पुन्हा बरसली
तिच्या हिजाबसह तिने झुंज दिली
अन् पुन्हा एक पहाट फटफटली.
तरीही
हिजाब विरुद्ध जय श्रीराम मीडियावर वाईरल केली
भगव्या लसलसत्या जिभांनी ग्रासली हिजाबमधली कळी
न डगमगता ती विद्यालयात गेली
ती गेली, विद्यामंदिरात गेली
ती हिजाब घालून गेली
ती बुरखा घालून गेली
ती घुंघट घालून गेली
ती बिंदी लावून गेली
पण
ती विद्यामंदिरात गेली
ती पुन्हा जाईल, पुन्हा पुन्हा जाईल
सरशी समानतेची होईल
सरशी समानतेची होईल

**डॉ. मेधा पुरव–सामंत**

●

# कविता

## उगवतीचे रंग

कधी कधी मला वाटतं...
कधी कधी मला वाटतं
विद्यार्थी व्हावं अन्
विंदा मास्तरांच्या वर्गात बसावं
'कोणाकडून काय घ्यावं..'
ते त्यांनी शिकवावं.
वर्गातून बाहेर पडताना
विंदांकडून कवितेची
हिरवी पिवळी शाल घ्यावी
आयुष्यभरासाठी समाधानाने
अंगावर ओढून घ्यावी. ॥ १ ॥

कधी कधी मला वाटतं
साने गुरुजींच्या वर्गात बसावं
श्यामची आई लिहिणाऱ्या
प्रेमळ श्यामला अनुभवावं.
त्यांच्या डोळ्यातलं
अपार प्रेम, माया अनुभवावी.
'खरा तो एकची धर्म'
शिकवण त्यांच्याकडून घ्यावी. ॥२ ॥

कधी कधी मला वाटतं
बोरकरांच्या वर्गात बसावं
त्यांचे सागरासारखे
सागरापरी गहिरे डोळे अनुभवावे
जे 'जीवन त्यांना कळले हो'
ते मलाही शिकवाल का विचारावं. ॥३॥

कधी कधी मला वाटतं
कुसुमाग्रजांच्या वर्गात जावं
'कशास आई भिजविसी डोळे'
त्यांच्याकडून ऐकावं
रात्रीच्या गर्भातील उषःकालाची
आशा जागवीत निघावं.
पाठीवर तात्यासाहेबांचा हात असावा
'लढ रे पोरा...' ऐकताना
'कणा' ताठ व्हावा. ॥४॥

कधी कधी मला वाटतं
शांताबाईंकडे जावं
ऋतू हिरवा, ऋतू बरवा
कुठे भेटला जाणून घ्यावं. ॥५॥

माझे जीवनगाणे लिहिणाऱ्या
पाडगावकरांच्या वर्गात
एक चक्कर मारावी
विचारावं त्यांना...
व्यथा असो आनंद असो
तुम्ही गात कसे राहता
आनंदाच्या रसात न्हात कसे राहता

त्यांच्या चष्म्याआडच्या
प्रेमळ, मिश्कील डोळ्यात
खोल खोल डोकावून बघावं
'शतदा प्रेम करावे'चं
रहस्य समजून घ्यावं. ॥६॥

कधी कधी मला वाटतं
ग्वाल्हेरला तांब्यांकडे जावं
'कळा ज्या लागल्या जिवा...'
त्या जिवाला भेटावं
दिवसभर त्यांच्याजवळ राहावं
पहाटे त्यांच्याकडून
'घनतमी राज्य करणाऱ्या शुक्राला' बघावं
'ते दूध तुझ्या त्या घटातले'चा गोडवा
त्यांच्याकडूनच अनुभवावा.
सायंकाळी त्यांच्यासोबत
'मावळत्या दिनकराला' प्रणाम करावा.
'तिन्ही सांजा सखे मिळाल्या...'
ऐकताना पुन्हा भेटण्याचं
'देई वचन मला...' म्हणावं. ॥७॥

कधी कधी वाटतं
जावं बालकवींच्या गावा
पाय टाकुनी जळात बसलेला
तो 'औदुंबर' अनुभवावा.
सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबून घ्यावे
'आनंदी आनंद गडे'च्या सड्यात
न्हाऊन निघावे. ॥८॥

कधी कधी वाटतं
सुरेश भटांना गाठावं
'चांदण्यात फिरताना'
त्यांच्याशी संवाद साधावा
दुभंगून जाता जाता
मी अभंग कसा झालो
त्यांच्याकडून ऐकावं. ॥९॥

कधी कधी मला
असं खूप काही वाटतं
कवी आणि कविता यांचं प्रेम
हृदयात दाटतं.
कवी असतात
परमेश्वराचेच दूत
घेऊन येतात प्रतिभेचं लेणं
तुमच्या माझ्यासाठी
ते असतं
नक्षत्रांचं देणं. ॥१०॥

**- विश्वास देशपांडे,**
चाळीसगाव
(मो. ९४०३७४९९३२)

# अन्नपूर्णा परिवार

■ **अंजली पाटील**

**संवाद मार्च २२**

**नमस्कार.**

**अन्नपूर्णा परिवार**

डिसेंबर २१ ते फेब्रुवारी २२ असा ३ महिन्यांचा आपल्या कामाचा आढावा आपण घेऊ या.

तुम्ही सगळ्या आपल्या डिसेंबरमध्ये स्टाफ मूल्यमापन ट्रिपला हजर होतात. या वेळी तरी आपण नेहमीची प्रत्यक्ष भेटीची ट्रिप करूया असे वाटले होते. परंतु कोरोनामुळे आपल्याला तसे नाही करता आले. या वर्षी ही आपली ट्रिम झूमवर आपल्या ब्रँचेसमधे बसूनच एन्जॉय करावी लागली. सर्वांचा कामाचा आढावा, पुढील योजना यासोबत तुमचे स्वतंत्र कलेचे सादरीकरण, कोणाचे विनोद, नृत्य, गायन, असे छान छान सादरीकरण आपण एन्जॉय केले. मस्त जेवण आपल्या ब्रँचेसमध्ये बसून आस्वाद घेतला. सर्व जणी मस्त मस्त साड्या, ड्रेस मस्त नटून आल्या होतात. आम्ही पण सर्व मूल्यमापन आढावा ऐकला व विविध गुणदर्शन छान एन्जॉय केले.

जानेवारी म्हटले की आपली धावपळ असते आपल्या वार्षिक मीटिंगसाठी. परंतु करोनामुळे तीही अशीच झूमनेच करावी लागत आहे. तुमची कामे भरपूर असतात. मेंबरकडे स्मार्टफोन हुडकावे लागतात, मेंबरला मीटिंग कशी अटेंड करायची, लिंक ओपन कशी करायची, शांतपणे ऐकत समजून कशी घ्यायची हे सर्व शिकवावे लागते. त्यांची मीटिंग होईपर्यंत सतत फॉलोअप घ्यावा लागतो.

या वर्षी २५ जानेवारीला पुणे आणि २९ जानेवारीला मुंबई येथे मोठी मीटिंग अर्थात वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्या. **मेधा पाटकर ह्या प्रमुख पाहुण्या होत्या.** त्या पाणी आंदोलनाला बसल्या होत्या तरीही झूमने मुंबई मीटिंगसाठी स्वत: हजर होत्या.

मेधा पाटकर ह्या आदिवासी भागात पाणी, पर्यावरण आणि जमीन हक्कासाठी आंदोलन करतात. नर्मदा प्रकल्प, त्यांची उंची अजून वाढवू नये ह्यासाठी त्या खूप लढल्या आहेत. अर्थात शांततामय मार्गानेच.

पर्यावरण वाचले तरच आपण वाचू. पाणी–जमीन गोष्टी प्रत्येकाच्या अत्यावश्यक गोष्टी आहेत. पण सगळे शहराकडे वळवले. फक्त शहरांचा विकास म्हणजे देशाचा विकास का... आदिवासी समाजासाठी कोण लढणार, त्यांना त्यांचे हक्क समजावून दिलेच पाहिजेत.

आपल्याला अथे संबोधित करतानाही ही मेधाताई पाटकर ह्याच विषयावर बोलल्या. पर्यावरण कसे वाचवले पाहिजे ह्यावर चांगली माहिती दिली. पर्यावरण वाचले तरच आपण जगू. त्याची काळजी नक्कीच घेतली पाहिजे.

तुमच्या लक्षात येते का बघा हं...

मागील वर्षीचे आपले पाहुणे साथी योगेंद्र जी यादव हे मागील वर्षी जवळजवळ वर्षभर चाललेल्या शेतकरी आंदोलनाचे नेते होते, आहेत. सरकार शेतकरी आंदोलनाला काहीच तोडगा काढत नव्हते. तरीही दिल्लीच्या थंडीत, ऊन पावसामध्ये शेतकरी, स्त्री, पुरुष, मुले ठिय्या ठेवून होती. सरकारला नमावे लागले. वर्षभरानंतर सरकारने तात्पुरते का होईना ते कायदे मागे घेतले.

त्या आधीच्या वर्षी, कागज नहीं दिखायेंगे... ह्या नागरीकत्वाच्या आंदोलनात कोथरुड पुणे आणि नेरूळ येथे शांततेने धरणे धरून बसलेल्या भगिनींनाही आपणही पाठिंबा दिला आणि नंतर त्यातही सरकारने तूर्त दोन पावले मागे घेतली आहेत.

NPR, NRC, CA ह्या आंदोलनात शाहीन बाग इथे हजारो मुस्लीम स्त्रिया, पुण्यातही कोंढवा इथे शेकडो स्त्रिया-पुरुष आंदोलनास बसले होते. ही सगळी आंदोलने शांततामय मार्गाने झाली. दंगा नाही काही नाही... सरकारला नमते घ्यावे लागते असा इतिहास आहे. म. गांधीजी कायम सत्याग्रहचा आग्रह का करायचे...

मेधा पाटकर ही अशाच शांततामय रीतीने आंदोलन करतात, पर्यावरण वाचविण्यासाठी.

अन्नपूर्णा परिवारानेसुद्धा आपली सामाजिक बांधिलकी जपत ह्या आंदोलनांना पाठिंबा दिला.

आपल्या दोन्ही मीटिंग अतिशय शांततेत पार पडल्या. दोन्हीकडे साधारण २५०० प्रत्येकी सभासद हजर होते. एन्जॉय करत होते. आपल्या मेधाताईंनी सांगितलेल्या गोष्टी, नियम नीट समजून घेत होते. तुमच्याही ते लक्षात आले असेल. COVID काळात आपले बदललेले नियम, कर्जाची रक्कम कशावर आधारित होती, हप्ते कसे येत होते, कर्ज आपण कशी केली...

मेधाताईंनी प्रस्तावना करताना असेही सांगितले की कोरोना काळात लोकांचे व्यवसाय गेले, हाताला काम नाही, कर्ज घ्यायचे कसे, फेडायचे कसे...

अन्नपूर्णामध्ये मेधा ताई आणि उज्ज्वला ताई, आरती यांनी खूप चर्चा करून कर्जामध्ये काही बदल केले.

टॉप अप लोन, स्पेशल रिलोन, रिशेड्यूल लोन अशा प्रकारे कर्जाच्या प्रॉडक्टमध्ये बदल केले. आधीचे कर्ज चालू असले तरी आत्ता आवश्यकता भांडवलाची म्हणून टॉप अप लोन...

मार्च २० ते ऑगस्ट २० RBI ने Moretorium देण्याचा सल्ला सर्व आर्थिक संस्थांना दिला. म्हणजे कर्ज फेडण्यास मुदतवाढ दिली. अन्नपूर्णानेही ती दिली. पुढील कर्जाला येताना हे हप्ते क्लिअर केले की पुढील टप्प्याचे कर्ज मिळत होते. त्याला स्पेशल लोन असे नाव दिले.

आणि ज्यांना आधीचा हप्ता मोठा होत होता, भरणे अवघड जात होते त्यांना कमी रकमेचा हप्ता बांधून दिला. ही Rescheduled loans. कर्ज पूर्ण भरले तर व्याजात सूट दिली.

ह्या संपूर्ण कालावधीमध्ये कर्ज घेण्याचे प्रमाण कमी होते. Recovery बऱ्यापैकी चालू होती. त्यामुळे बाहेरच्या Finacial institutions कडून आपल्याला कर्ज घ्यावी लागली नाहीत. उलट आपण बोर्डमध्ये हा विषय मांडला आणि सर्वानुमते असा निर्णय घेतला की ह्यांची आधीची कर्ज आपण संपूर्ण भरावीत, त्यामुळे इतक्या अवघड परिस्थितीमध्येही अन्नपूर्णा परिवार नफ्यात होता. जवळजवळ २ ते अडीच कोटीने आपला नफा झाला. त्यामुळे आपण मेंबर्सना ८% ने लाभांश ही जाहीर केला आहे.

जानेवारीपासून आपण १००% कर्ज रक्कम देणार आहोत. सध्या प्रोसेसिंग फी आपण कर्ज रकमेतून कापून घेत आहोत. पण सभासदांशी चर्चा करून ती त्यांनी भरावी असे आपण बहुतेक ठरवू. Moretorium मधील राहिलेले हप्ते सभासदाने भरूनच कर्जाला यायचे आहे. ते आपण कापून घेणार नाही आहोत.

ह्या संपूर्ण कोरोना काळात आपले आजारपणाचे दावे मात्र वाढले. HMF, FLMF आणि LMF मधील आपली गंगाजळी मात्र संपली. त्याकरिता सर्वानुमते व आपल्या विमातज्ज्ञांच्या सल्ल्याने असे ठरवतो आहोत की HMF ची वर्गणी आपण ५०% ने वाढवली. FLMF च्या वर्गणीमध्ये काही बदल नसतील आणि मागेही चर्चा केल्याप्रमाणे HMF नियम कोविडपूर्वी होते तसे करून ते न पाळणाऱ्या

पूर्वीप्रमाणेच पिंच लागेल. अर्थात हे सगळे आपण एप्रिल २२ पासून सुरू करू.

त्याचप्रमाणे आपले JLG म्हणजे कर्जासोबतच्या बचतीवरील व्याज दरात १% ने घट केली आहे. आरडी आणि एफडीचेही व्याज दर १ जानेवारीपासून कमी केले आहेत. हे सगळे रिझर्व्ह बँकच्या नियमानुसार करावे लागले. आधारपूर्णामध्ये मात्र व्याजदर तेच राहतील.

तुमच्या हे सर्व लक्षात आले ना. सभासदांना सांगताना कृपया नीट समजाऊन सांगा.

जानेवारी २२ पासून तुम्ही पाहता आहात की आपण आपल्या बलस्थानकडे जाण्याचा जास्त प्रयत्न करीत आहोत. काय आहे आपले अन्नपूर्णाचे बलस्थान...

''एक जूट, एक मूठ''... ५ जणींचा गट... कायम तसाच राहावा हा प्रयत्न. कोविड काळात गटांची मोडतोड प्रचंड झाली. त्यामुळे होणारे तोटे तुम्हाला नक्की माहीत आहेत. गटाची बळकटी... किती वर्षांपासून सगळ्या एकत्र आहेत हे नक्की पाहिले जाणार आहे. त्याचा फायदा नक्कीच तुमच्या कामालाही होणार आणि अन्नपूर्णा स्थिरावण्यालाही होणार आहे.

त्यातही सुखद गोष्ट अशी आहे की अन्नपूर्णा परिवाराला चांगल्या कामाचे पुरस्कारही मिळाले आहेत. मेधाताईंच्या कष्टाची नोंद बाहेरचे जग घेते आहे ही आपल्या सर्वांना आनंदाची बातमी आहे. आणि तुम्हाला ती नक्कीच कळायला हवी. महाराष्ट्र फाऊंडेशनचा पुरस्कार, मानाचा पुरस्कार अन्नपूर्णा परिवाराला मिळाला आहे.

कोरोना आता निघण्याचे तयारीत आहे. त्यामुळे आपल्या मीटिंग परत चालू होतील अशी आशा आहे. कम्युनिटी मीटिंग, क्लेम मीटिंग, CR मीटिंग.... प्रत्यक्ष भेटी सुरू होतील.

तशी जानेवारीमधे आपण CR मीटिंग एकत्रित घेतली. सावित्री जन्मोत्सव आपण साजरा केला. सर्वांनाचा त्याचा खूप आनंद झाला. तिथे ही खूपशा विषयांची चर्चा झाली. हळदी कुंकू समारंभ, तिळगूळ वाटणे असे मस्त प्रोग्रॅम ही झाले.

एप्रिलपासून एस. ई. व एल. एस. ओ. ताई टॅब वापरणार आहोत. तुम्ही त्याची प्रॅक्टिसही केली आहे. त्याचा आपल्याला ही आणि सभासदालाही खूप उपयोग होणार आहे. त्यांचा झेरॉक्स खर्च खूप वाचेल. तुमचा कागदपत्र गोळा करण्याचा वेळ वाचेल. ही सिस्टीम छान बसेल.

हा सगळा लेखाजोखा तुमच्या समोर मांडते आहे. नीट समजून घ्या. नवीन सिस्टीम ही सुरुवातीला अवघड वाटली तरी खूप फायद्याची आहे. हे नक्की लक्षात घ्या.

पाळणाघराचा प्रकल्प आता छान स्थिरावला आहे. मागच्या तिमाहीत आपल्या वात्सल्यपूर्णा संस्थेने १० पाळणाघरांमध्ये २५० मुलांचा सांभाळ केला. कोविडच्या सर्व काळज्या घेऊन, मास्क सॅनिटाझरचा वापर करून १ वर्ष ते ६ वर्षे वयाची २५० मुले पाळणाघरांच्या ताईंनी सांभाळली. सलग २ वर्षे फी वाढ न करता वस्तीपातळीवरील कष्टकरी पालकांना आपण मोठा आधार दिला.

जानेवारी महिन्यात सर्व पाळणाघरात मुलांचा health चेक अप कॅम्प घेतला गेला. पाळणाघर संचालिका, मदतनीस यांचे Regularly ट्रेनिंग घेतले जाते. SNDT कडून ह्यासाठी मदत होते ट्रेनिंग घ्यायला. त्याचा सुंदर उपयोग मुलांच्या वाढीसाठी होतो. गाणी, गोष्टी, त्याचे सादरीकरण असे ते असते.

विद्यापूर्णा म्हणजे अन्नपूर्णामधून कर्ज घेऊन चांगल्या प्रकारे फेडणाऱ्याला एकल मातांच्या मुलांसाठीची शैक्षणिक शिष्यवृत्ती. समाजातील आर्थिकदृष्ट्या सुसंपन्न नागरिक स्वत:ची मदत म्हणून काही रक्कम अन्नपूर्णाला देतात आणि त्यामध्ये जवळजवळ तेवढीच भर अन्नपूर्णा महिला क्रेडिट सोसायटीच्या दरवर्षीच्या नफ्यातून घातली जाते. साधारणपणे १००० मुलांना रु. २५००/- प्रत्येकी अशी मदत जून-जुलै महिन्यात दिली जाईल.

अन्नपूर्णा नेहमी आलेल्या कोणत्याही संकटाला सामोरे जाते. मार्ग काढते. मेधाताईकडे पाहता हे नक्की लक्षात येईल. १९९३ ते २०२२. कुठून कोठपर्यंत अन्नपूर्णा आली... आपण त्यासह नक्कीच आपले पाऊल पुढे नेऊ या.

**धन्यवाद**

**अंजली ताई**

❖❖❖

# अन्नपूर्णा परिवार बालदिन व प्रजासत्ताक दिन












Dr. Medha Samant
Anjali tai
Aarti Shinde
Trustee
Ujwala Waghole
Savita Bhor






















अन्नपूर्णा परिवारातर्फे श्री. सुरेश धोपेश्वरकर यांनी संवाद त्रैमासिक न्यू एज प्रिंटींग प्रेस,
८५ सयानी रोड, प्रभादेवी ४०००२५ येथे छापून घेतले.